REGISTERED N. No. 4

सहामाही „ ३ „ ८८
माल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास........................६४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आत ...
दर ओळीस........६१ ०१
दुसरे खेपेस .... .......०१

Annual in arrears 7 „ 1 R's 8 as
Six monthly .........3 .............. 8 as
Single copy .......................... 4 as
Advertisement
below 10 lines ...... 2 R's
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line ... 3 as

# वऱ्हाडसमाचार

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI — AKOLA MONDAY 1 DECEMBER 1902 — NO 46

वर्ष ३६ — आकोला सोमवार तारीख १ माहे डिसेंबर सन १९०२ इ० — अंक ४६

**Kadi** हें काय आहे ?

दाक्तर डी. एम. दस्तूर यांनी तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशात घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणें, ससनी, ब्रान्कायटीस इन्फ्लुएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यास एक हजार रुपयाच्या किंमतीचें वाटेल.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

### मुंबई बँकेची ठेव ठेवण्याची बँक

या बँकिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारी ... पासून तो डिसेंबरच्या ... फक्त एक हजारा पर्यंत पय ... जातील

दोन ... ठेव ... येईल व त्यांच्या ... हयातीत, तसेच त्यांचे मागें त्यांच्या ... एकास अथवा अधिक जणांस ... काढता येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम।
चोट ... की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती है।
ढूंढते फिरते हरेक ... कदरदां हैं हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान „ .... -॥-

दांतावर जाळें जमणें, त पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

पत्ता—
नन्दलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी मथुरा.

### सुद्दाम वैश्य लोकांच्या हिता संबंधानें

"लेख २"

मागील लेखांत म्हणजे तारीख २९ सप्तेंबरच्या अंकांत "सोज्वळ सूचने" च्या मथळ्या खालीं लिहिलें होतें कीं, या गोष्टी संबंधानें आमचे लोक काय चळवळ करितात हें पाहून कित्येक आणखी योग्य सूचना करावयाच्या आहेत या करण्याचें वचन देऊन लेख संपविला. तरी लिहिण्यास दुःख वाटतें कीं, त्या गोष्टीकडे अझून आमच्या लोकांचें लक्ष गेलेलें दिसत नाहीं कारण खर्च पूर्वीं प्रमाणेंच सुरूं आहेत. दुसरें अशा एक कीं दोन लेखानें काय सुधारणा व्हावयाच्या आहेत ? असे लेख वारंवार जेव्हां त्यांच्यापुढें ठेविले जातील व जेव्हां फार खर्चामुळें होत असलेले अनर्थ त्यांच्या अनुभवास येतील तेव्हांच कोठें त्यांचे डोळे उघडतील. जरी असे लेख वारंवार वर्तमानपत्रद्वारा छापवून त्यांच्या पुढें ठेवले तरी ते लक्षपूर्वक वाचून त्याबद्दल ते योग्य विचार करतील किंवा नाहीं याची शंकाच आहे. कारण मागील लेख छापून आल्यावर तो मी माझ्या एका नातीबांधवास वाचावयास सांगितला. त्याचें वाचणें झाल्यावर मी विचारलें कसें काय ! आपणांस हा लेख आवडतो कीं नाहीं. तो म्हणाला "नहीं जी इसमे क्या है, इसमे लिखा है कि खर्च मत करो" मला जरा मनांत वाईट वाटलें व त्याच्या कोत्या ज्ञानवृद्धी बद्दल थोडें हसूंही आलें. अगोदरच आमच्या लोकांत शिक्षण फारच कमी. जे थोडे फार शिकलेले आहेत ते अशा गोष्टीकडे लक्षच देत नाहींत. आमच्या लोकाची समजूत "मोत शीककर क्या करणा है, थोडीइ सरकारी नोकरी करना है, अपने काम पुरता आया तो बस है." म्हणजे कुणबी वगैरे लोकांपासून पैशाचे दोन पैसे कसे करून घ्यावें इतकें ज्ञान झालें कीं पुरे दुसरें जगांत काय चाललें आहे याची यांना परवा दखील नसते वर्तमानपत्रासंबंधानें तर विचारायलाच नको ! कोण वाचतो ! इतका रिकामा आहे कोण ? पत्रकर्त्यांना तर कसेंही पत्र भरून पैसे उपटावयाचें काम, अशी यांची वेडी समजूत ! पण आज काल व्यापारांत कशी ओढाताण चालली आहे, समाज सुधारणेच्या व तसेच इतर सुधारणेच्या मागें लोक कसे हात धुऊन लागले आहेत, राजकीय धोरण कसें काय आहे वगैरे इतर माहिती वर्तमानपत्र वाचून कळणें अशक्यच आहे. राजकीय धोरणा संबंधानें तर विचारायलाच नको. कॉंग्रेस वगैरे संबंधानें अक्षर सुद्धां माहीत नसेल. आमचा व्यापारी धंदा असल्यामुळें आपल्या व्यापाराचा राजकीय धोरणाशीं किती कसा निकट संबंध आहे हें मी पुढें एखाद्या लेखांत कळवीन. आपल्या नेटिवा पैकींच सुशिक्षित पारशी लोक व्यापारांत कसे पुढें सरसावलेले आहेत; दुसर आपले राज्यकर्तेच पाहाना; आज व्यापारामुळेंच सर्व जगभर ते वर्चस्व गाजवीत आहेत. परंतु आमच्यांत व त्यांच्यांत पुष्कळच फरक आहे. ते सुशिक्षित असल्यामुळें आपल्या व्यापारास अनुकूल पडतील असे कायदे बदलून आणण्यास राज्यकर्त्यांस भाग पाडतात. दुसऱ्या पक्षीं इकडे आम्हांला कायदेकानु आपल्या व्यापारा विरुद्ध आहेत किंवा कांय याची माहिती सुद्धा नसते! तरी शिक्षण हें व्यापारास मुख्य असेंच पाहिजे व आमचा धंदा मुख्य व्यापाराचा आहे त्यामुळें आमचे लोक जुनी वेडी समजूत सोडून देऊन आपआपल्या मुलांना होईल तितकें जास्त शिक्षण देण्याची रूढी प्रचलित करतील अशी आशा आहे.

खामगांव ता. २७।११।०२ } आपला एक मारवाडी (वैश्य)

वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष शु: २ शके १८२४

### शिक्षक समाज

(उपयुक्त संस्था)

विद्यादानाचें कार्य उत्कृष्टपणें चालावें, त्यांतील पुष्कळशा गोष्टी जुन्या नव्या करावा, होतील तितक्या अडचणी दूर कराव्या आणि एकंदरीनें विद्यादानाला चांगली प्रगती मिळावी म्हणून तद्विषयक गोष्टींचा उहापोह करण्यासाठीं शाळाखात्याची शिक्षक व परीक्षक मंडळी दरसाल एकत्र जमत असतात. ही संस्था स्थापित होऊन वीस वर्षें झालीं. इतक्या कालांत या समाजाच्या हातून पुष्कळशा उपयुक्त गोष्टी घडल्या आहेत. नाना गोष्टीं विषयीं भवति न भवति होऊन झालेल्या विवेचनाचा उत्कृष्ट परिणाम विद्यादानाच्या कार्यमालेंत चांगला दृष्टोत्पत्तीस पडतो. सर्व शिक्षक व परीक्षक मंडळींच्या विविध अनुभवाचा एक मेळ होऊन याचा एक अत्यंत गुणकारी परिपाक होत असतो. या समाजाच्या वादविवादापासून जे लाभ होत असतात ते काहीं थोडाने दाखविण्याचे नसतात. त्या लाभांच्या खाणाखुणा या खात्यांतील लोकच चांगल्या सांगूं शकतील.

विद्यादानाची आजकाल जी सुधारणा होत आहे तिचें पुष्कळसें श्रय या समाजाकडे देईल असा आमचा ग्रह आहे. जर कोणी दोषदृष्टीनें या समाजाचें कार्य निरर्थक म्हणूं इच्छील तर त्याची ती मोठी चूक आहे. या समाजासारखी संस्था म्हणजे शाळाखात्याची पार्लमेंटच होय. या पार्लमेंटाच्या वादविवादांत भावी कार्यमालेचीं पूर्व बीजें असतात; आणि यात दृष्टीनें वादाचे वादाच्या संस्थांची अभिवृद्धी करावी लागत.

पण अशा प्रकारच्या समाजावर आक्षप सहजीं घेतां येतात; परंतु या आक्षेपामध्यें कांहीं अर्थ नसतो असा थोडा खोल विचार केला तर कळण्यासारखें आहे. या समाजाचे प्रत्यक्ष लाभ त्या खात्याला पुष्कळच असतील परंतु त्या शिवाय या समाजाच्या अनुसंधानानें दुसऱ्या किमेक उपयुक्त गोष्टी घडत असतात. आकोला व उमरावती हीं दोन शहरें आमच्या प्रांताचीं मूळपीठें आहेत. येथें ज्या गोष्टी घडतात त्यांचा प्रसार सर्व प्रांतभर होत असतो. अशा मुख्य ठिकाणीं विद्याखात्याची मुख्य मुख्य मंडळी जमल्या पासून एका प्रकारें निरनिराळया विचारांची उत्क्रांती होते. आम्ही म्हणतों कीं, आमच्या प्रांताचीं सामाजिक सुधारणा या समाजाच्या आश्रयानेंच चालली आहे आणि म्हणूनच इकडील सुधारणेंत पुष्कळसा गोडसपणा आहे व कोणताच अतिरेकाचा प्रकार दृष्टीस पडत नाहीं. तसेंच हल्लीं या समाजाच्याच आश्रयानें शारीरिक शिक्षणाला मोठा जोर आला आहे. हल्लीं 'वऱ्हाड ॲथलेटिक मंडळी' म्हणून जी शाखा आहे ती या समाजवृक्षाचीच शाखा आहे म्हटलें तरी कांहीं बाध येणार नाहीं. गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं येथें मुले नानाविध खेळ खेळलीं, विद्यार्थी मंडळीमध्यें खेळाचे सामनें झाले, विजयी विद्यार्थ्यांस बक्षिसें वाटण्यांत आलीं इत्यादि सर्व आनंदकारक गोष्टी या समाजाच्या कृपेनेच घडल्या आहेत. या समाजाची मोहक शक्ती विलक्षण आहे आणि म्हणूनच तिनें परोक्ष किंवा अपरोक्ष आरंभलेल्या कार्यमालेला शाळाखात्याच्या बाहेरील पुढारी लोकांचा समान साह्यभूत होत असतो.

## शिक्षक समाज

( वार्षिक हकीकत )

या समाजाचा कार्यक्रम आम्ही पूर्वीच प्रसिद्ध केला आहे आणि या समाजाचे यंदाचे अध्यक्ष रा. रा. हरी रामचंद्र रोहिणखेडकर यांच्या हातून हा कार्यक्रम चांगला सिद्धीस गेला. गेल्या सोमवारीं प्रथम मि. क्यांडी साहेब डायरेक्टर यांनीं या समाजाच्या कामाला सुरुवात केली. त्यांची प्रकृती थंडीवाऱ्यामुळें अस्वस्थ होती तरी ते मुद्दाम आले आणि त्यांनीं जमलेल्या शिक्षक व परीक्षक मंडळीचें स्वागत मोठ्या प्रेमानें केलें आणि पुन्हां हा भेटीचा योग आला म्हणून आनंद प्रदर्शित केला.

गत वर्षीच्या गोष्टींचें सिंहावलोकन करितांना ते म्हणाले कीं, सर्व जगाच्या इतिहासांतील मुख्य गोष्ट म्हणजे आमचे पुण्यश्लोक एडवर्ड महाराज यांचा राज्यारोहणाचा समारंभ होय. हा समारंभ विलायतेंस फार मोठा व अपूर्व असा झाला आणि तसाच अपूर्व समारंभ येत्या जानेवारींत दिल्लीच्या दरबाराच्या वेळीं दृष्टीस पडणार आहे. हे दोन्ही समारंभ ब्रिटिश राज्याला अत्यंत बळकटी आणणारे आहेत. तेव्हां अशा गोष्टींची माहिती इतिहास शिकवितांना विद्यार्थ्यांस अगोदर करून दिली पाहिजे; तसेंच पुस्तकांतील धडे शिकवितांना वर्तमान काळीं चालू असलेल्या गोष्टींशीं त्यांचा संबंध शिक्षकांनीं दाखवून दिला पाहिजे. जगांतील चाललेल्या अगदीं ढोबळ ढोबळ गोष्टी देखील विद्यार्थ्यांस ठाऊक नसतात, तर हें अज्ञान दूर झालें पाहिजे.

या नंतर मे. क्यांडी साहेबानीं नुकत्याच भरलेल्या एजुकेशन कमिशना संबंधानें सांगितलें कीं, विद्याखात्याची एकंदर प्रगती दृष्टीस चांगली येत आहे. आणि या कमिशनाच्या रिपोर्टावर सरकारी अभिप्राय असा पडतो कीं सरकार या बाबतींत लोकांचे अभिप्राय ऐकण्याला अगदीं उत्सुक आहेत. या संबंधात मे. क्यांडी साहेबांनीं आपल्याही कांहीं कांहीं सूचना कळविल्या आहेत.

स्त्री शिक्षणाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं या प्रांतांत स्त्रिया पैकींच शिक्षका तयार करण्याची सोय नव्हती; ती आम्ही यंदा थोडीशी दूर केली आहे. आकोल्यास एक फिमेल ट्रेनिंग कॉलेज काढलें आहे. हा प्रारंभ फार लहान आहे तथापि या संस्थेची मोठी भरभराट होईल असा लोकाश्रय मिळण्याची उमेद आहे. आणि शेवटीं अखेरच्या दिवशीं माझे विचार मी खुलाशानें सांगेन असें अश्वासन देऊन मे. क्यांडी साहेब बोधाच्या शब्दानीं म्हणाले कीं हा समाज नुसत्या उपहारासाठीं किंवा गप्पा मारण्या साठीं न होतां अन्योन्य विचारांची परिस्फुटता होऊन विद्यादानाची प्रगती व्हावी.

---

यंदाच्या समाजाला शिक्षक व परीक्षक मंडळी मिळून जवळ जवळ २०० पर्यंत गृहस्थ जमले होते. प्रारंभीं पोट शिक्षक व मुख्य शिक्षक समाज यांचे वार्षिक समाज रिपोर्ट वाचण्यांत आले. नंतर पोट शिक्षकसमाजांकडील सुचना इंग्रजींत उतराव्या, समाजाचें साल आक्टोबर ते आक्टोबर पर्यंतचें असावें इत्यादि सूचना पसंत ठरल्या. नंतर सुनगांवचे मास्तर रा. शामराव जानजी यांनीं व्याकरणांतील शब्दांच्या मुख्य चार जाती फार उत्तम रितीनें समजावून सांगितल्या. नंतर इंग्रजी, मराठी व उर्दू पुस्तकें पाहण्यासाठीं परीक्षकांच्या कमिट्या नेमण्यांत आल्या. संस्कृत कवि कालिदास व भवभूती या संबंधानें रा. हरि बल्लाळ परचुरे बी. ए. यांनीं एक सुंदरसा निबंध वाचला. रा. श्रीधर रामचंद्र पिंपळखरे यांनीं वाचन व अर्थ कसा शिकवावा हें मार्मिक रितीनें एका वर्गास शिकवून दाखविलें. हे गृहस्थ उत्तम शिक्षकामध्यें नाणावलेले असल्या मुळें यांची शिकवणी सर्वांस फार आवडली. मोर्शीच्या पोटशिक्षकसमाजाकडून अशी सूचना आली होती कीं आठ वर्षांच्या खालील वयाच्या विद्यार्थ्यांस शाळेंत घेऊं नये म्हणजे अशा प्रतिबंधानें विद्यार्थीवर्गाची शरीरप्रकृती चांगली सदृढ राहील. ही सूचना नापसंत ठरली तरी तिच्या संबंधानें पुष्कळसा चांगला विचार व्हावयाला पाहिजे होता.

दुसरे दिवशीं रा. दत्तात्रय त्रिंबक भावे यांचा 'मुलांच्या मानसिक शक्तींचा विकास' या विषयावरील सुरसमा निबंध वाचण्यांत आला. रा. गुळवणी मुंडगांव यांनीं वर्गमूळाची उपपत्ति सांगितली. रा. हरी मोरेश्वर शेवडे यांनीं व्याकरणांतील कांहीं वादग्रस्त गोष्टी संबंधानें उत्कृष्ट खुलासा केला. हा निबंध शास्त्रीय असून सोप्या व सुगम मराठी भाषेंत लिहिलेला आहे. मलकापुरचे मास्तर रा. नारायण विठ्ठल गोळवलकर यांनीं अष्टावधानाचा प्रयोग फार सुंदर केला. गेल्या ८।१० महिन्यांच्या तयारीनें त्यांस हा गुण चांगला साधला आहे. स्मरणशक्तीचे असले चमत्कार फार मौजेचे असतात.

तिसरे दिवशींचा जो कार्यक्रम होता त्या मध्यें रा० लक्ष्मण गंगाधर परभुणे यांनीं 'शिक्षकाचें राज्यकर्तृत्व' या विषयावर एक चांगला निबंध वाचला. सर्व विवेचन फार चांगलें साधलें होतें. रा. गोपाळ गणेश परभुणे यांनीं मराठी तिसऱ्या इयत्तेला शुद्धलेखन शिकवून दाखविलें. त्या नंतर वाशिमच्या उर्दू शाळेचे उर्दू मास्तर मि० फकरुद्दीन यांनीं तिकडील जरीच्या कामाचे, तसेंच साध्या कापडाचे कांहीं उत्तम नमुने प्रदर्शनासाठीं आणिले होते. हीं सर्व कामें वाशिमच्या औद्योगिक वर्गांतील विद्यार्थ्यांनीं केलेलीं होतीं. हे नमुने पुढें मांडल्यावर मि० फकरूद्दीन यांनीं 'धंदे शिक्षणा' विषयीं पुष्कळशी माहिती निबंधद्वारा कळविली. केळिवेळीचे हेडमास्तर रा० सूर्यभान जानजी यांनीं 'खेड्यांतील शाळा सुधारण्याचा उत्तम उपाय' या संबंधानें एक मनोवेधक निबंध वाचला. या निबंधांतील पुष्कळशा गोष्टी यांच्या अनुभवांतल्या होत्या व त्या चांगल्या रितीनें त्यांनीं कळविल्या. मि. महमद हुसेन हेडमास्तर उर्दू शाळा मलकापूर यांनीं खेड्यांतील मास्तरानीं लोकप्रिय कसें व्हावें या संबंधानें एक उपयुक्त निबंध वाचला. त्या नंतर कोणकोणत्या शाळांतील पुस्तया पसंत ठरल्या हें सांगण्यांत आलें. ४ थ्या इयत्तेच्या मराठी पुस्तीमध्यें अकोटचा विद्यार्थी सनाउल्लाखा यांस बक्षीस मिळालें. त्या शिवाय पातुर्डा, जिमगांव बलढाणा, इलिचपूर, वणी, पारडी, मळावें, पुसद, वाशिम व मेहेकर या गांवच्या कोणाच्या इंग्रजी, कोणाच्या उर्दू, व कोणाच्या मराठी अशा पुस्त्याला बक्षिसें मिळालीं आहेत.

आकोल्याच्या मुलींच्या शाळेंतील कुमारी सुंदराबाई भागवत व यमूबाई वैद्य या दोघींस ६ व्या इयत्तेच्या पुस्तीबद्दल बक्षीस द्यावें असें ठरलें आहे. तसेंच बाळापूरच्या इंग्रजी–मराठी शाळेंतील विद्यार्थीण सुंदराबाई इनाही तिच्या विशेष कामाबद्दल बक्षीस देण्याची शिफारस झाली आहे. पुस्त्या संबंधानें लिहितांना आम्हाला हें कळविणें भाग पडतें कीं विद्यार्थ्यांच्या अक्षरा संबंधानें पुन्हां दुर्लक्ष्य होऊं लागलें आहे. राव बहादूर पटवर्धन साहेबाच्या कारकिर्दींत जी तरलता लेखनपद्धतींत आली होती तिचा थोडथोडा ऱ्हास होत चालला आहे. ही गोष्ट ठीक नाहीं हें आम्हांच सांगितलें पाहिजे असें नाहीं.

चवथे दिवशीं समाजांत रा. हरी अंताजी मराठे सिरसगांवबंड यांनीं 'आईबापांची मुलाविषयीं कर्तव्यें' या विषयावर निबंध वाचला. तसेंच रा० रामचंद्र सदाशिव लेले यांनीं 'कवी व कविता या विषयावर लिहिलेला निबंध वाचण्यांत आला राजश्री रामभाऊ लेले हे स्वतां कवी आहेत. अर्थात् त्यांचा निबंध फार उत्कृष्ठ लिहिलेला आहे. तो स्थळ विशेषीं कठीण वाटेल पण सहृदयपणा वाचकांत जसजसा असेल त्या मानानें त्यांच्या निबंधाची किंमत अधीक वाटेल.

शेवटीं अध्यक्ष रा. रोहिणखेडकर यांनीं उपसंहार करून शारीरिक, मानसिक व नैतिक शिक्षणा संबंधानें कांहीं विचार कळविले. शाळांच्या भिंतींवर उत्कृष्ठ म्हणी लिहून ठेवण्याविषयीं त्यांनीं मुद्दाम सूचविलें स्त्रीशिक्षण, धंदेशिक्षण, बालोद्यान शिक्षण इत्यादि गोष्टी प्रचलित करण्याविषयीं सर्वांनीं झटावें, व द्रव्यद्वारा मदत करावी असें त्यांनीं आग्रहपूर्वक सांगितलें.

या समाजापुढें रा. गोविंदराव खंडकर इनस्पेक्टर, पशुवैद्यकाचें खातें, यांनीं बकऱ्याच्या हदपा संबंधानें पुष्कळ उपयुक्त गोष्टी सप्रयोग समजावून दिल्या. कांहीं चित्रपट त्यांनीं मुद्दाम तयार केले होते. राजश्री खंडकर यांच्या या उत्कृष्ठ परिश्रमाबद्दल सर्वांनीं त्यांचे आभार मानले.

सायंकाळीं मे० क्यांडी साहेबांच्या हातून समाजाचें विसर्जन व्हावयाचें होतें परंतु त्यांची प्रकृती अस्वस्थ असल्यामुळें सर्वजणांची मोठी निराशा झाली. त्यांचें संभाषण ऐकण्यासाठीं रा० रा० विश्वनाथ नारायण दांडेकर व कचेरितील इतर पुष्कळ गृहस्थ जमले होते. डायरेक्टर साहेबांच्या आज्ञेनें रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर यांनीं सर्वांचे आभार मानले आणि आधळ्यास वाचनादि गोष्टी शिकविण्यासाठीं कैलासवासी व्हिक्टोरिआ सरकार यांचे स्मारक म्हणून विलायतेंत एक मोठी संस्था निघाली आहे; तर आपल्या कडील कांहीं गृहस्थांस तिकडे आंधळ्यांस शिकविण्याची विद्या शिकण्यासाठीं पाठवावें अशी एक सूचना डायरेक्टर साहेबांची आहे असें त्यांनीं सांगितलें व असें कार्य करण्यासाठीं वर्गणी गोळा करण्या विषयीं हि सूचविलें. मे० क्यांडी साहेब हे येऊं न शकल्यामुळें सर्वांच्या मनाचा मोठा विरस झाला.

## शारीरिक उन्नती

( विद्यार्थीवर्गाचे विविध खेळ. )

मे० क्यांडी साहेब हे शारीरिक उन्नतीचे पुरस्कर्ते आहेत. शरीर संपत्ति हा यांच्या आवडीचा विषय आहे. आणि ते वऱ्हाडांत आल्या पासून या विषयाला अग्रस्थान देण्यांत आलें आहे. प्रस्तुतच्या कालमानानें ही गोष्ट फार उत्तम होत आहे आणि आम्हांस उमेद आहे कीं विद्यार्थ्यांची शरीर संपदा रमणीय व मनोहर दृष्टीस पडूं लागेल. मानसिकश्रमाच्या अतिरेकामुळें जो अलिकडे

शरिराचा ऱ्हास होत चालला होता त्याला प्रतिबंध झाला आणि विद्यमान तरुण पिढी आपल्या पैलूदार शरिरांनी आयुष्यातील भावी लढाई चांगली जिंकतील. सध्याच्या काळाला शारीरिक व मानसिक या दोन्ही उन्नती सारख्या होत चालल्या आहेत आणि त्यामुळें त्या परस्परास चांगल्या पोषक होत आहेत. ही सुधारणा इष्ट दिशेनें होत आहे आणि तिचें श्रेय म. क्यांडी साहेबांस आहे.

विद्यार्थ्यांचा समुच्चय खेळाच्या पटांगणांत पाहिला म्हणजे मोठा अवर्णनीय आल्हाद वाटतो. खेळाच्या सुशोभित मैदानांत विद्यार्थ्यांच्या दोन दोन फळ्या होऊन ते परस्पराविरुद्ध खेळूं लागत तेव्हांची ती ईर्षा स्पर्धा व अहंपणा पाहून प्रस्तुतच्या पिढीच्या गृहस्थांना मोठा उल्हास वाटूं लागला आणि त्यांस विद्यार्थीदशेच्या स्वच्छाचारी खेळाडूपणाची आठवण होऊं लागली. उमरावतीचे विद्यार्थी पारलल बार, मलखांब, दोरीची ओढाताण, उंच उडी इत्यादि खेळांत पुढें गेले आणि टाळ्यां-च्या गजरांनीं त्यांचें सर्वांनीं अभिनंदन केलें, तेव्हां टाळ्या वाजविणाऱ्यांच्या अंगांत वीरश्रीचें वारें संचरत असे. तसेंच आकोल्याच्या विद्यार्थ्यांनीं लांब उडी, धांवपळ, चेंडूची फेंक, बटाट्याची शर्यत, क्रिकेटचा सामना इत्यादि खेळांत वर्चस्व मिळविलें तेव्हां त्यांच्या त्या विजयश्रीबद्दल पाठ थोपटतांना किती तरी नीरस गृहस्थांनाही परम आल्हाद वाटला गेल्या शनिवारीं बक्षिसे वाटण्यास ठाकुमार श्री हरभामजी उभे राहिले तेव्हांचा त्यांचा उपदेश मोठा बोधप्रद होता. इंडियन लोक नेभळे, कमजोर, दुर्बळ आहेत असें दूषण आहे तें दूर व्हावें, नवीन पिढीच्या अंगांत रक्त उत्कृष्ट असावी, त्यांचा उत्साह, व शक्ती वर्धमान व्हावी म्हणजे यांचीं पुढील आयुष्यें राष्ट्राला कल्याणप्रद होतील व नवीन मंडळी सरकारच्या सहाय्यानें व आपल्या दंडाच्या जोरावर कामें चालवितील. हा त्यांचा उपदेश फार कळकळीचा होता.

ज्या ज्या विद्यार्थ्यांचें प्राविण्य उत्कृष्ट ठरलें त्यास बक्षिसा दाखल नाना प्रकारच्या चिजा देण्यात आल्या. कोणाला चाकू, कोणाला नक्षीदार पेटी, कलमदान, चेंडूफळीची ब्याट इत्यादि पदार्थ वाटण्यांत आले. आमच्या मित्रमंडळीचा अभिप्राय असा पडतो कीं, लाख नगदी रुपये द्यावे आणि सर्व विद्यार्थ्यांस दूध साखर वगैरे देण्याची व्यवस्था निराळ्या मंडपात ठेवावी म्हणजे या पेक्षांही अधीक मौज दिसेल. शनिवारीं उपहाराची व्यवस्था नामी होती. एकंदरीनें प्रस्तुत शारीरिक विद्येचा होत असलेला बहुमान पाहून आम्हांस आनंद वाटतो आणि शाळा खात्यांतील मुख्य मंडळींचे तसेंच मेसर्स कुमार साहेब, डेके साहेब, दाढेकर, देशपांडे, भागवत, शेंबेकर, दाते, दामले, महाजनी इत्यादि गृहस्थांचे आम्ही आभार मानतों.

## सुधारणा.

( संभाषणांची रेलचेल )

'वऱ्हाड सामाजिक सभा, हें फार मोठें नांव आहे. या नांवाखालीं काल चाळीस पन्नास गृहस्थ जमले होते. अध्यक्षस्थानीं रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी हे होते. उमरावतीचे प्रसिद्ध गृहस्थ राजश्री जोशी व चिटणीस हे मुद्दाम आले होते. वऱ्हाडचा सामाजिक इतिहास म्हणजे या सभेचा वार्षिक ग्रंथ होय. तो पांच मिनिटांतच वाचून झाला. औषधांच्या जाहिराती प्रमाणें सामाजिक सभा ही एक जाहिरात आहे बुलियम पिंकच्या गोळ्या सर्व रोगावरच चालतात असें नाहीं तर त्यांचा उपयोग वाटेल त्या गोष्टीकडे सुखानें करावा. हाच प्रकार आमच्या सामाजिक सभेचा आहे. जी काहीं राहटी चालूं आहे ती सर्व या सभेच्या कृपाप्रसादानें चालूं आहे. पुराणप्रिय, सुधारक, दांभिक इत्यादि शब्दांची रेलचेल राजश्री जोशी, परचुरे व जयवंत यांच्या भाषणांत होती. राजश्री आण्णा साहेबांच्या भाषणाची श्री श्री म्हणजे सर्वत्र प्रगती ही होय. सारांश काहीं दिवसांनीं या सभेचे जे वक्ते तेवढेच श्रोते असा प्रकार होण्याची आम्हांस भिती वाटते. या सामाजिक सभेंत सहृदयता नाहीं. लोकांच्या हृदयांत सभेची उक्ती शिरत नाहीं आणि कृतीही भरत नाहीं. या सभेनें मौन धरलें तर पुष्कळ सुधारणा आपोआप होईल. लोकांच्या दारिद्र्याचा फाडा दूर होत चालला व त्यांस संपत्तीचीं सुखें आश्रय देऊं लागलीं म्हणजे आपोआप सर्व खऱ्या सुधारणा बरोबर नांदूं लागतील. सामाजिक सुधारणा हें निराळें अंग समजून ही सभा तें चेपित बसते ही चूक आहे. सर्व देश श्रीमान व सुखी होऊं द्या म्हणजे सामाजिकच काय पण सर्व बाजूंनीं सुधारणा दृष्टीस पडतील. प्रस्तुतची सुधारणा म्हणजे क्षयी माणसाच्या तोंडाला कृत्रिम तकतकी आणण्यासारखी आहे. अशा तकतकीनें समाजाचा देह नष्ट व्हावयाचा तो नष्ट झाल्या वाचून राहणार नाहीं.

एक

मुद्दाम गेलेला श्रोता.

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 1 1902

The education which our students receive in schools and Colleges is rather too general and too much of encyclopædic type. This is then the defect at the bottom of our educational system. It fails to fulfil its proper function of fitting up the young generation for the harder battles of life. What it does in the course of a long curriculum is more or less an indirect Anglicization of our people. The educational institutions in India are thus a failure in so far as they do not equip the student's world with proper qualifications for the present race of life. The English education is planted in place of the old standards of education which enabled a man to take upon his shoulders the duties of maintaining a family. The present course of education extends over about 20 years and as a student begins his school career at an age of 6 or 7 years he will be at least 26 or 27 years old when he has taken up a degree or two. This is true of students who have got the mental calibre and the physical stamina of passing year after year about two dozens of annual examinations. By the time one bids adieu to his school or college he is more than half his full period of life provided he is fortunate enough to live to the age of fifty or fifty-five. This is the general condition of our educated people. Even then they do not prosper in life as well as we would expect them to do with such a waste of years over education and such a vast expenditure of funds spent upon it. The prosperity to which the English education opens its portals is limited to a few professions such as government service, medical practitioners, lawyers and mechanical engineers. With the flourishing condition of these professions there was a run for the English education for some time. But this state of things cannot continue for years together. The markets of these professions are too much crowded and the last 20 years or so the present system has failed to qualify the young generation for the duties of life which are of course multiplying in numerous ways. Lord Curzon finds a similar defect in the course of instruction at the different RajKumar colleges. The stuff which education infuses into the native princes ought to qualify them for being great and successful rulers. But herein the system fails to discharge its proper function. What is true of Raja Kumar Colleges is equally true of our schools and colleges. Our system of education is a failure. There is no proper blending of Western and Eastern ideas. The love for English things and sports and for every thing that is foreign undermines our reverence for our own things and we have become fully Western in our ideals whereas we have lost all our Eastern greatness & our national aspirations. Our modern likings and longings for the Western ideals have made us utter strangers to whatever was good in our habits of the East. We are spendthrifts in purchasing the comforts of life after the European pattern. We are a sinking people in the depths of poverty to which we are brought down by our new habits of life. We are a dead people as an industrial and commercial nation. Our once past greatness lay in the national industries and commerce. These great springs of material property are now dried up in india. These springs of money we must reopen if we would stand as a nation in the course of time. Herein lies our greatest task and our national aspiration. If we fail in it we shall never hope to rise again. And for attaining this end we want our Government to improve the educational system on Western models. Techinical and specialized education we want on a large scale. Our schools and colleges must mend their course of instructions on the lines indicated above. Otherwise the present Anglicization in educational matters opens a wide door to our ruin as a nation. Let us hope that the danger is too apparent to our benign government and let us hope as well that India will regain her old footing in her own market and the markets of the world.

## वऱ्हाड

मि० फ्रान्सीस डायरेक्टर आफ लँड रिकार्डास हे रजेवरून परत आल्यामुळें त्यांच्या जागीं हल्लीं काम करीत असलेले मि० मार्शल साहेब हे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या जागीं परत, मलकापुरच्या कोर्टावर जातील.

आणि मलकापुराहून मि. प्राइस एक्स्ट्रा असि० कमिशनर हे आकोल्यांस स्मालकाज कोर्टावर येऊन रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. एक्स्ट्रा असि० कमिशनर हे यवतमाळास सिव्हिल जजाचे कामावर जातील.

मे० इलियट साहेब कमिशनर हे गेल्या शनिवारी येथें आले असून त्यांचा मुक्काम ८ दिवस होणार आहे.

कुमार श्री हरभामजी रावजी हे दवऱ्यातून तारीख २८ रोजीं आकोल्यास परत आले.

उमरावती जिल्ह्यांतील चांदूरच्या फ्याक्टरीला आग लागून सव्वा लाख रुपयांचा कापूस जळाला. आग विझतां विझेना.

परवां रात्रौ धुळेकर संगीत मंडळीनें 'भ्रमविकास' नाटकाचा प्रयोग करून दाखविला. दिलीप व सुदक्षिणा यांचीं कामें बरीं झालीं. नाटक नीटसें झालें नाहीं असें त्या मंडळीसच वाटलें !

शीघ्र कवी— रा. रा. नरहर गंगाराम गुजर, संगमनेर हे कटाव फार जलदी करितात आणि ते येथें आले आहेत. त्यांच्या गुणांचें प्रोत्साहन द्रव्यद्वारा यथायोग्य होईल असा येथील गुणज्ञ लोकांचा आम्हांस भरंवसा आहे.

---

### नोटीस

बेशमी— लोमागीर बाबा गोसावी वस्ती धाबे तालुके मेहेकर जिल्हा बुलडाणा यास.——

खालीं सही करणारीण इजकडून नोटीस देण्यात येते कीं, मी तुमची लग्नाची बायको असून तुम्ही मला १८९६ च्या १० आणे पायलीच्या दुष्काळा पासून मला विरें येथें सोडून न कळत चालते झाला. मी मोठ्या पराकाष्ठेनें व तुमच्या नांवावर कर्ज काढून आज पर्यंत दिवस काढले. यापुढें मला कर्ज मिळत नाहीं. माझा जन्म व्यर्थ चालला आहे. तुम्ही लबाड लोकांच्या फंदांत पडूं नये. तुम्ही जन रीतीप्रमाणें माझ्याशी संसार करण्या साठीं मला घेऊन जावें, सावकारी कर्ज देऊन टाकावें आणि ही सर्व गोष्ट आठ दिवसात पुरी करावी. असें न होईल तर हा लेख हीच फारकती समजून मी दुसरा घराठाव करीन. मग तुमचा मजवर नवेरपणाचा कोणताच हक्क राहणार नाहीं. सावकार फिर्याद करून कर्ज वसूल करील. या नोटिशीचा खर्च तुम्हावर पडेल. कळावें. तारीख २९ नोवेंबर सन १९०२ इसवी.

सही

गुनाबाई मर्द लोमागीर निशाणी

बांगडी राहणार विरें

तालुके बाळापूर.

## जाहिरात

मुलुक अमानी हैदराबाद यांतील सन १९०३-०४ साला करतां अबकारीचे हरास खाली लिहिलेल्या तारखेस आणि त्या पुढील दिवशीं होतील:—

| | वार | तारीख |
|---|---|---|
| वणी (येवतमाळ) | गुरुवार | १९।१।१९०३ |
| उमरावती | सोमवार | १९ ,, ,, |
| इलिचपूर | गुरुवार | २२ ,, ,, |
| आकोला | सोमवार | २६ ,, ,, |
| वाशीम | गुरुवार | २९ ,, ,, |
| बुलढाणा | सोमवार | २ २ ,, |

हल्लीं चालू असलेल्या पद्धती प्रमाणें, गांवठी दारू, अफू आणि गांजा यांची मंजूर केलेल्या दुकानात किरकोळ विक्री करण्याचे हक्क दिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींत हरासानें देण्यांत येतील.

उमरावती ता. ६।११।०२ } W. Hastings, Lt. Col. इन्स्पेक्टर जनरल ऑफ एक्सैज, मु. अ. हैद्राबाद

## नोटीस

खाली सही करणार याजकडून रामचंद्र बापूजी कुळकर्णी राहणार जामोद तालुके जळगांव जिल्हे अकोला यास :—

नोटीस देण्यात येते की आमची स्वतःची दुकान गणेश गड्याजी कुळकर्णी ह्या नावाची जामोद येथें असून त्या दुकानावर तुह्मांस आह्मी आपल तर्फे गुमास्ते नेमले होतें, हल्लीं तुह्मास त्या कामावरून बरतर्फ केले आहे सबब ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत दुकानाच्या चह्या आणि त्या संबंधी पुर्जे गहाणखतें व इतर दस्तैवज असतील ते व दुकानचें सामान वगैरे सर्व आमचे स्वाधीन करून द्यावें. व सर्व हिशोब आजपर्यंतचा आह्मास समजावून द्यावा. असें न केल्यास कायद्याप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें तारीख २६ माहे ११ सन १९०२

सही

गणेश गड्याजी कुळकर्णी राहणार गायगांव तालुके बाळापूर

विक्रीस तयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० नियमांची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड - (सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट (सन १८८२ चा १० वा) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकाची किंमत टपाल खर्चासुद्धा ८८४.

दिवाणी आक्टसंग्रह- (यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ९००) किंमत टपाल खर्चासुद्धा २८८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी, सदाशिवपेठ, पुना सिटी.

नारो अपाजी गोडबोले बुकसेलर बुधवार पेठ.

### मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट गोष्टी, सं० नाटकें व तत्वेवाईक विषयांसह येथ्या मासात निघत.

नावें नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा वर्षाचे वर्गणी ०० हं० स० आ ऊ २।

पत्ता- के. डी. फोटो आर्टिस्ट वर्धा सी. पी.

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवैद्यौषधालय- मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याच आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, [illegible], वातरोग, निद्रानाश, पित्तवि[illegible], मुष्टिमैथुनादि घातक [illegible] इत्यादि अनेक [illegible] शरीर [illegible] शक्ति व [illegible] रक्त [illegible] कामदीपन होते. [illegible] उत्साह येतो. [illegible] लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यास पाहिजे त्या दिवसात घ्याव्या अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयांचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयावर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ०६ आणे पडेल. अनुपान खर्च सावंत. रोगीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दर.—

३९ गो० १ रु०; ७९ गो० २ रु० ११९गो० ३ रु० १६९गो० ४ रु०; २७९गो० ६ रु० ५९०गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामाना चा मोठा क्याटलाग मागवावा, फकट देऊं टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३। वर्षें आंजलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिराती ऊत आला असून त्यांनीं आमच्याच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यात धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यास खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मु० मुर्डी ता० दापोली जि० रत्नागिरी-

*K. N. ESMAYAL & Co.*

यांची अनेक रोगावरील जगत प्रसिद्ध ३७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डीत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी. वर्धा. सी. पी.


## खरेदी करा !

### रास्कोपची पेटंट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें [illegible] वेळ दाखविणारें असून इतर [illegible] प्रमाणें यास नेहमीं रिपेरची जरूर नसून [illegible] बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणार लोकांचें तर हें [illegible] आहे असें अनुभवास आलें आहे. यासकरितां ज्यांला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, काँट्राक्टर, ऑफिसर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर मराठी लोकास हें वॉच वर्णे विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस........................४०
१९ ,, हंटिंग........................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचे

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कोप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ..................२२
१९ ,, हाफ हंटिंगचे..................२०
९ ,, हंटिंगचें ......................२०
१४ ,, रिस्ट वॉच ......................२०

इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपनफेस..............२०
१९ ,, हंटिंग..........................२०
१४ ,, रिस्टवॉच.........................१०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीच

१४ लाईन रिस्ट वॉच ............२०
१४ ,, हंटिंग..........................२५
१८ व १९ ,, ओपनफेस...............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ..............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ..................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें.....३५
१९ ,, हंटिंग ........................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत

सी. हिनीगर आणि कंपनी.

ओरिजिनल जिनीवन रास्कोप पटंट वॉचेसचे सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई

REGISTERED N. No. 4

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास........................६४

नोटिशी बद्दल
१० ओळी
दर ओळीस........८१ ८१
सरे खेपेस .... ....६१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly ........3 ............... 8 „
Single copy .......................... 4 as
Advertisement
below 10 lines ...... 2 R's
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line ...8 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 8 DECEMBER 1902 NO 47

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख ८ माहे डिसेंबर सन १९०२ इ० अंक ४७

## जाहिरात

मुल्क अमानो हैदराबाद यांतील सन १९०३—०४ साला करितां अबकारीचे हराज खालीं लिहिलेल्या तारखेस आणि त्या पुढील दिवशीं होतील:—

| | वार | तारीख |
|---|---|---|
| वणी (येवतमाळ) | गुरवार | १६।१।१९०३. |
| उमरावती | सोमवार | १९ „ „ |
| इलिचपुर | गुरवार | २२ „ „ |
| आकोला | सोमवार | २६ „ „ |
| वाशीम | गुरवार | २९ „ „ |
| बुलढाणा | सोमवार | २।२। ०३ |

हल्लीं चालू असलेल्या पद्धती प्रमाणें, गांवठी दारू, अफू आणि गांजा यांची मंजूर केलेल्या दुकानांत किरकोळ विक्री करण्याचे हक्क डिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींत हराजानें देण्यांत येतील.

उमरावती ता. ६।१।१९०२ } W. Hasting, Lt. Col. इन्स्पेक्टर जनरल ऑफ एक्सैज, मु. अ. हैद्राबाद

## प्रभुत्व प्रभुलाच द्या मनुष्याला देऊं नका.

( मागील अंकावरून पुढें )

कोणी ह्मणतील कीं, जगताच्या व ईश्वराच्या महत्वाविषयीं इतकें निरूपण कशास पाहिजे ? त्याचें महत्व आह्मी कमी मानतो काय ! या शंकेचें समाधान असें आहे.

सामान्य जनसमूह, व शिक्षित जनसमूह दोघेही, ईश्वर मोठा आहे, जग अनादि व अनंत आहे, अशीच समजूत धारण करितो हें खरें, तरी, या समजुतीस विपरीत अशा असंख्य गोष्टी त्याच्या अवलोकनांत नित्य येतात त्यावरून पूर्वोक्त समजूत ही भ्रांती, व धर्मरक्षण दिसतें, तें सत्य असा मनाचा ग्रह झाल्यावांचून राहत नाहीं. आणि मनावर प्रथमच जो ग्रह होतो तो टाकून शोधक बुद्धीनें पाहण्यास कोणासही आवडत नाहीं.

रात्रीच्या वेळीं, आपण एखाद्या मैदानांत, किंवा उंच जागी उभें राहून आसमंतात दृष्टि फेंकिली ह्मणजे पृथ्वीचें अफाट स्वरूप आपल्या दृष्टीस पडतें, व डोईवर हिऱ्या मोत्यांच्या झालरींचें, व ज्यास हिऱ्य, मोत्यांचे लक्षावधी चमकणारे घोंस लटकत आहेत असें नील वर्ण छत पसरून दिलें आहे व त्यांत एक भव्य दीप टांगून ठेविला आहे असें आपण पहातों. आतां मला सांगा कीं, आपल्या शृंगारिलेल्या गृहाप्रमाणें ही भी स्थिती भासते तिच्यात विक्षेप आणून, अव्यक्त स्थितीच्या शोधाकरितां बुद्धीची योजना करणें कोणास रुचणार आहे ? अशा स्थितींत आपण पहातों, तें दिसतें तसेंच आहे, व हें सगळें विश्व ह्या आपल्या एकट्या पृथ्वीकरिता निर्माण केलें आहे, ह्मणजे, पृथ्वीला शोभा येण्यास्तव, व तिचीं सर्व कार्यें नियंत्रित चालण्यास्तव साहित्य ह्मणून, उपकरणें ह्मणून अगणित वस्तूंचा सर्वत्र संग्रह केला आहे अशीच कल्पना आपल्या मनांत येते व आपण स्वस्थ बसतों. त्यांत अन्य हेतु आपणांस दिसत नाहीं. व अन्य हेतु कल्पावा व शोध करावा हें आपणांस बरें वाटत नाहीं.

एखाद्या मूर्तीची स्थापना करावी तिच्या स्नानादिकांची, पूजेची, नैवेद्य व धूपदीप यांची तयारी करून ठेवावी, तसेंच तिच्या दुरुस्तीचें साहित्यही—जसें, कांहीं हत्यारें, व रंगाचें सामान वगैरे संग्रहास बाळगावें, अथवा एखादें मंदिर उभारून त्याच्या मरामतीस्तव कांहीं साधनें, चुना, विटा, लांकूड, रंग, कापड इत्यादी जवळ ठेवावें, किंवा आपल्या मुलाचे उंची कपडे एखाद्या पेटींत घालून ठेवावे, तशींच ही सर्व उपकरणें ह्या एका पृथ्वी करिताच आहेत, असा भास, चांगल्या मनुष्याच्याही मनास होणें संभवनीय आहे. व यांत त्याचा तिळप्राय दोष नाहीं.

पण, जेव्हां कोणी त्याच्या नजरेस आणून देईल, किंवा तो स्वतःच कसोटी करून पाहील, कीं, अन्नाचे पर्वतप्राय ढीग, व सुगंध वृक्षांचीं वनें, व कोरण्याच्या हत्यारांचे, एकेक मणाचे दहा हजार गंड, व तीन लक्ष रंगाचे प्याले त्या मूर्तीजवळ ठेविले आहेत; लक्षावधि खंडी चुना व दुसरें तसेंच साहित्य त्या इमारतीजवळ पडलें आहे; व उंची वस्त्रांचे १९ हजार पेटारे, त्या मुलाच्या जवळ पास आहेत; तेव्हां सामान्य बुद्धीसही बोध होईल कीं, ती मूर्ती, किंवा तें मंदिर अथवा तो मुलगा यांहून या साहित्याच्या उद्देशाचें स्थान भिन्न आहे.

आणखीं, सामान्य बुद्धीस जर वाटलें कीं, ही पृथ्वी सपाट आहे, व ती कशाच्या तरी आधारावर टेंकली आहे तर यांत त्या बुद्धीचा दोष नाहींच. चोकस बुद्धीची एवढ्यानें खातरी होणार नाहीं. त्या आधाराचा आधार, व आधार परंपरा इकडे तशा माणसाचें लक्ष जाईल, व जेव्हां त्यास कळून येईल कीं, एका खटाटोपाचीं कार्यें नीट चालावीं ह्मणून दुसरा शुष्क खटाटोप प्रभु निर्माण करीत नाहीं, तर, चलनवलनाचीं व स्तिमिततेचीं दोनें पहिल्या खटाटोपाच्या घटनेंतच भरून ठेवितो, तेव्हां त्याचें समाधान होईल. नभो मंडलांत जे असंख्य गोल फिरत आहेत त्यांतच पृथ्वीचीही गणना असून गुरुत्वाकर्षण हें त्यांच्या नियमनाचें कारण आहे अशी कल्पना मनांत भरली ह्मणजे डोक्यावर मंडप आणि बसावयास बैठकी सारखी जागा ह्या कल्पनेचा पायाच डळमळून जाईल.

वर दिसतें, तें दिसतें तसेंच आहे कीं काय हें आणखीं पहावयाचें आहे. ("वर" हा शब्द येथें सापेक्ष आहे, वास्तविक वर अथवा खालीं कांहींच नाहीं.)

दूरत्वानें पदार्थांचें स्वरूप सूक्ष्मता धरितें, व समीपत्वानें विशालता पावतें हें सिद्धच आहे. असें कां होतें हें सांगणें, हा स्वतंत्र शास्त्राचा विषय आहे.

विमानांत बसून सुमारें दोन मैल उंच गेल्या वर मुंबई सारखें शहर पाहूं लागलों तर तें लहानशा बगीच्या एवढें व त्यांत फिरणाऱ्या माणसांचीं डोकीं अर्धा इंच परिघाचीं दिसतात. कांहीं अधिक वर गेल्यानें नकाशाचें स्वरूप शहरास येतें व माणसांचीं डोकीं, कीं टांचण्यांचीं डोकीं तें ओळखतां येत नाहीं. हा दोन तीन मैल उंचीचा प्रकार होय.

शुक्र काय आहे, व तो दिसतो तसाच लहान व लखलखीत तारा आहे कीं काय हें जाणण्याची एकाकाळीं, यंत्रशास्त्रविशारदांस ( मुख्यत्वें, आकाशयानगतिनिपुणांस ) इच्छा झाली, आणि त्यांनीं तेथ पर्यंत प्रवास करून ती इच्छा पूर्ण केली. या विषयींचा वृत्तांत चित्तवेधक असून आपल्या विषयावर प्रकाश पाडणारा आहे ह्मणून तो आपण येथें घेऊं.

या मंडळीचा प्रवर्तक ज्योतिष व यंत्रशास्त्र पारंगत होता आणि त्याचे सोबती त्या शास्त्रांत बरीच सिद्धी पावलेले असे होते व आणखी कोणी होते. शुक्राच्या ताऱ्याकडे जाण्याचा रोख धरून उड्डाण करण्यास विमान तयार होतांच, मुख्य चालक ह्मणाला, मित्रहो ! हा प्रवास धाकयाचा तर खराच, पण अनेक चमत्कृतींचा जनक आहे. आकाशयान चालू असता सूक्ष्मदर्शक यंत्रें हातांत धरून तुह्मी तयार असलें पाहिजे व पृथ्वी आणि तारा यांच्याकडे पाळीपाळीनें पहात गेलें पाहिजे. आपल्या दुर्बिणी पुसून साफसूफ करून ठेवा कीं. पहा ! पृथ्वी सुंदर खरा, तरी तिचें रूप अ[illegible] लखलखीत आहे, व लक्ष्य जो तारा त्याचें ताऱ्या प्रमाणें आहे हें ध्यानांत धरा.

कांहीं वेळ गेल्यावर तो आणखी ह्मणाला— विमानाला गति प्राप्त होऊन, आपण एकदम हजारों मैल प्रदेश मागें टाकिला. आतां पृथ्वी व तो तारा पहिल्या सारखा तुह्मास दिसणार नाहीं. तारा बहुधा कमी तेजस्वी, आणि पुष्कळच मोठा, ( लहानशा प्रदेशा एवढा ) आणि पृथ्वी पूर्वीं पेक्षां लहान व तिचें स्वरूपही मुग्ध दिसत आहे. तिचा आकार अद्याप बराच मोठा आहे खरा, तरी वृक्ष, जलाशय, गांवें शेतें, व घरें हीं आतां दिसत नाहींत.— मोठ मोठे पर्वत सामान्य उंचवटे दिसतात व पृथ्वीचा पृष्ठभाग आतां लडबडीत दिसत नाहीं.' पण एक चमत्कार, गड्यानों ! पाहाण्यांत येतो कीं, समुद्राच्या पृष्ठ भागावर पडलेल्या सूर्य किरणांचें परावर्तन होऊन, पृथ्वीगोल, आतां कांहींसा प्रकाशमान भासत आहे. पहा ! पहिल्याच मुक्कामांत कवढा हा फेरफार !

आपल्या आकाशयानास ईशकृपेनें कांहीं विघ्न न येतां, आणखी सहस्त्रावधि, किंबहुना लक्षावधि कोशांचा मार्ग आपण आक्रमिला. आतां पृथ्वीकडे पहावें आणि काय दिसतें तें सांगा. आतां पृथ्वी मोठ्या एका टेंकडीच्या आकाराची, परंतु गोल दिसत आहे. मोठ मोठे पर्वत लुप्त झाले आहेत व तिच्या अंगीं पुष्कळच तेज आलें आहे. तसाच तो तारा पहा ! तो तारा ( आतां तारा मुळींच नाहीं. ) आतां फार मोठ्या प्रदेशा सारखा दिसतो. त्याचा पृष्ठ भाग अस्पष्ट आहे खरा, तरी त्या वर नद्या पर्वत, ग्राम, गृहें ( असलींच तर, अथवा नसली तर अन्यस्थिति असेल ती. ) असावी असें भासत आहे.

बरें आतां आपला तिसरा मुक्काम, ह्मणजे प्रवासाचा शेवट आहे असें समजा. आतां काय दिसतें सांगा. सोबत्यांना वाटलें, शुक्रावर जाण्याचा आपला बेत होता खरा, पण विमानाला उलट गति मिळून आपण पृथ्वीवर परत आलों, तरी तेथील रचना, व प्राण्यांच्या स्थितीतील भिन्नता पाहून हा दुसरा लोक असावा असेंहि त्यांस वाटूं लागलें. त्यांनीं उत्तर दिलें कीं. आह्मी पूर्वीच्या दिशेकडे पहातो, पण पृथ्वी मुळींच दिसत नाहीं— तिकडे एक तेजोमय गोल दिसत आहे. यावरून समुद्रावर पडलेल्या सूर्य प्रकाशांत सांपडून ती आतां ताऱ्या सारखी चमकत आहे. व तसाच शुक्र नाहींसा होऊन आह्मी या प्रदेशांत येऊन पडलों आमच्या गतींत तर चलन झालें नाहीं कचीत. ह्मणून येथील पृष्ठभाग व प्राणी यांचा नवेपणा पाहून आह्मी शुक्र लोकांवर आलों अशी आतां खात्री होते. आतां ही स्थित आह्मास व्युत्क्रम दिसते. आह्मी आहों ही पृथ्वी, व अंतरिक्षांत ( आलों त्या दिशेस ) चमकतो तो शुक्र असा भ्रम होत आहे.—

पृथ्वीचें अंतर वाढत, व शुक्राचें कमी होतें चाललें. तशी सर्व स्थितींत विपरीतता भासूं लागली. यावरून दूर अंतरावर जीं नक्षत्रें व तारे चमकत आहेत, व जे बिंदु प्रमाणेंच केवळ भासत आहेत. ते चमकणारे हीं कदाचित नसतील असें त्यांस वाटूं लागलें. व एकेका ताऱ्यांत सहस्त्रावधि, लक्षावधि आमचे भूगोल गडप होतील अशी त्याची खात्रीच झाली.—

साधारण मनांत विचार व कल्पना उत्पन्न व्हाव्या ह्मणून व शिक्षित मनांत विचार शक्ति जागृत व्हावी ह्मणून तसेंच विद्वानांचे एतद्विषयक विचार कळून ज्ञान प्राप्त व्हावें याकरितां हा यत्न आहे.

( पुढें चालेल )

वि०

वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष शुद्ध ८ शके १८२४

## वयोमान.

गेल्या खानेसुमारीच्या रिपोर्टावरून कळतें कीं, साधारणपणें या प्रांतांतील पिढीचें वयोमान २५ वर्षे ६ महिने २३ दिवस येतें. ठोकळ आंकड्यामध्यें बोलावयाचें असल्यास सांप्रतच्या पिढीची इयत्ता २५।२६ वर्षांची दिसते. २५।२६ वर्षांत एक पिढी बदलते असें या प्रमाणानें निष्पन्न होतें. साधारण आपली समजूत अशी आहे कीं. एक पिढी म्हणजे ३३।३४ वर्षांनीं बदलतें. परंतु गेल्या खानेसुमारीच्या आंकड्यावरून सिद्ध होतें कीं लोकाची समजूत कशीही असो, या प्रांतांतील पिढी २५।२६ वर्षांनीं बदलते. इतर प्रांतांतील पिढीच्या वर्षाची इयत्ता आह्मा पाशीं नाहीं. आणि ह्मणून त्या संबंधानें आह्मी विशेष लिहूं शकत नाहीं. पण हें खरें कीं पिढीच्या वयोमानाची मर्यादा फार कमी आहे आणि ती या देशांतील जन्म मृत्यूच्या अतिरेकाची साक्ष देइल. जर लोक सुखी असले तर त्यांची शरीर संपदा चांगली असते. आणि शरीरसंपदा चांगली असेल तर आयुर्मर्यादाही मोठी असते. पण या तिन्ही गोष्टी संबंधानें न्हासदशा उत्तरोत्तर दृष्टीस पडत आहे.

लोकसंख्येच्या वयोमानाचे आंकडे पडताळून पाहतां असें आढळतें कीं गेल्या दोन दुष्काळांमध्यें मुलें पुष्कळच मरण पावलीं व तशींच म्हातारीं माणसेंही पुष्कळशीं मरण पावलीं. सानिटरी कमिशनर साहेबांचाही अभिप्राय असाच पडतो. ते ह्मणतात कीं मुलें दोन वर्षांचीं होईं पर्यंत त्यांच्या जिवाला मोठमोठे धोके असतात आणि त्यामुळें पुष्कळ मुलें मृत्युमुखीं पडतात.

गेल्या खानेसुमारीच्या दिवशीं पांच वर्षां खालील मुलें २,८७,९८६ होतीं व पांच वर्षां पासून दहा वर्षां खालील मुलें ३,६०,७२३ होतीं. या दोन आंकड्यामध्यें मोठें अंतर दिसत आहे. या अंतराचें मुख्य कारण असें आहे कीं १८९१ पासून १९०१ पर्यंतच्या दहा वर्षांच्या काला पैकीं पहिलीं पाच वर्षें धनधान्य समृद्धीचीं होतीं आणि ह्मणून त्या सुखसंपन्न काला मध्यें जन्मलेली प्रजा आजच्या मित्तीला ५ पासून १० वर्षांच्या वयोमाना खालीं मोडत आहे. याच्या उलट प्रकार गेल्या अखेरच्या पांच वर्षांत दिसून येतो. दोन दुष्काळ झाले आणि ह्मणून लोक अन्नाला मोताद झाले होते; या मुळें प्रजोत्पत्ती फार मंदावली व जी कांहीं झाली तिचा मोठासा भाग संहारही पावला.

दहा वर्षां पुढील वयोमानाचे कांहीं आंकडे तपासले तर असें आढळून येईल कीं १८९१ सालीं जी लोकसंख्या चाळीस वर्षांच्या वया पर्यंतची होती तिनें गेल्या दहा वर्षांत फार चांगला टिकाव धरला आहे. १० वर्षां पासून ५० वर्षांपर्यंत वयाची १९०१ च्या खानेसुमारींत जी लोकसंख्या दाखविली आहे तिची संख्या त्याच वयाच्या मागील १८९१ च्या खानेसुमारीतल्या संख्येपेक्षां मोठी आहे. या संबंधी कांहीं आंकडे असे:—

| वयोमान | १८९१ ची लोकसंख्या | १९०१ ची लोकसंख्या |
|---|---|---|
| १५–१९ | ३,००,०५२ | ३,४५,८०९ |
| २५–३० | २,६३,९०२ | २,६६,९२६ |
| ४०–४५ | २,०७,८४१ | २,०२,१३० |

साधारण मान असें दिसतें कीं आमच्या मुलुखांतील लोकांची कर्तृत्वशक्ति १० वर्षांपासून ४५ वर्षां पर्यंत टिकते. त्यानंतर त्यांच्या आयुष्याचा न्हासकाल लागतो कार्यशक्तीचा उदय, मध्यान्ह व अस्त हीं १० वर्षें व ४५ वर्षें या दोन मर्यादेच्या आंतच होऊन जातात. अर्थात् या उदयास्ताच्या वयोमानानें पाहतां ४५ वर्षांच्या वया पुढील लोकसंख्या फारच न्हास पावत चालली आहे. हा न्हास दहा वर्षां पूर्वी होताच. पण या न्हासाला वर्तमानकालच्या दारिद्र्यानें मोठीच विलक्षण गती दिली आहे. या ह्मणण्याचें प्रत्यंतर खालील आंकडे देतील.

| वयोमान | १८९१ | १९०१ |
|---|---|---|
| ४५–५० | ९७,२९४ | ९७४७० |
| ५०–५५ | १,४७,८७८ | १,३९,६२८ |
| ५५–६० | ४०२८७ | ३१,८३४ |
| ६० पुढील | १,७५,२२६ | १,२७,९९३ |

या आंकड्या वरून असें दिसतें कीं आमच्या पैकीं म्हातारे व अनुभवी लोक एकदां मरण पावले म्हणजे त्यांची भरती करण्या इतकी नवीन पिढी दीर्घायु नाहीं. पूर्वीं प्रमाणें म्हातारीं माणसें पुष्कळशीं दृष्टीस पडत नाहींत. लोक संख्येतील वयोवृद्ध लोक आमच्या राष्ट्राला उत्तरोत्तर कसे कमी लाभत आहेत हें देशाचें दुर्भाग्य होय.

## दिल्लीचा दरबार.

अलिकडे दिल्ली शहराचें भाग्य उदयास आलें आहे. जेथें जुन्या बादशाहीचें वैभव गाजत होतें तेथूनच नव्या बादशाहीचें वैभव दिगंत पसरणार आहे ही आनंदाची गोष्ट होय. दिल्ली शहराची भाग्यलक्ष्मी खरोखर फार मोठी आहे. भावी राज्यारोहणाच्या समारंभांनीं दिल्लीचें आकाश गजबजून गेलें आहे. राज्यलक्ष्मीच्या विलासमंदिराची अनुपम शोभा त्या शहराला येत चालली आहे. जेथें लक्षावधी रुपयांचा खर्च होत आहे तेथें श्री आपली सर्व सौभाग्यसृष्टी निर्माण करीत आहे हें ऐकून कर्णांची साफल्यता वाटत आहे. नित्य सकाळीं दिल्लीची वर्धमान श्री इंग्रजी पत्रांतून डोळ्यापुढें चित्रित होत असते. हा चित्रांत उमटणारा दिल्लीचा समारंभ ज्या नरश्रेष्ठास दृष्टीस पडणार आहे ते आमच्या राष्ट्रांतील निवडक निवडक अमोल्य रत्नें होत. त्यांच्याच द्वारानें राज्यारोहणाची मंगलवार्ता सर्व राष्ट्रभर प्रसृत व्हावी अशीच सरकारी योजना आहे हें उत्तम होय.

दिल्लीच्या या धन्य नगरींत ब्रिटिश राज्यलक्ष्मी आपलीं सर्व वैभवें एकत्र करणार आहे इंडियांतच काय पण पृथ्वीवर वैभवाच्या शिखरावर चढलेली दिल्ली सारखी नगरी दिल्लीच होय. सर्व ब्रिटिश साम्राज्याची ज्योती तेथें प्रकाशमान होईल.

या दिल्ली दरबाराविषयीं लार्ड कर्झन साहेबांनींच फार उत्कृष्ट बोध केला आहे कीं देशी कारागिरीला प्रदर्शन द्वारा उत्तेजन मिळेल, राज्यारोहणाची मंगल गोष्ट लोकांच्या दृष्टीपुढें चिरकाल राहील, इंडियनांपैकीं राजेरजवाडे व मुख्य मुख्य माणसें एकत्र जमून यांच्या द्वारानें राज्यकर्त्यांचा व प्रजाजनांचा एक जीव होईल इत्यादि गोष्टी कोणीही विसरणार नाहीं. आनंदाच्या मंगलकार्याला प्रारंभ केला ह्मणजे त्या संबंधीं विधिनिषेध सांगू नये असा आमच्या राष्ट्राचा परिपाठ आहे. त्याला अनुसरून आह्मी ह्मणतों कीं, हा दिल्लीचा समारंभ फार उत्कृष्ट होवो आणि आमचे श्रीमान एडवर्ड बादशहा चिरकाल राज्य करोत!

## आनंदाची वांटणी.

आनंद ही अद्भुत कला आहे. विभागानें मूळची वस्तु कमी कमी होते परंतु आनंदकलेची गोष्ट विलक्षण आहे. आनंद विभागानें वाढतो. आनंदाच्या वांटणीनें मूळचा आनंद द्विगुणित होतो. ही गोष्ट आमच्या राज्यकर्त्यांसही मान्य आहे. सरकारांचें ह्मणणें कीं दिल्लीच्या दरबाराच्या आनंदाची लूट सर्वत्र होऊं द्या. सर्वच राष्ट्र राज्यारोहणाच्या आनंदाचें भागीदार झालें पाहिजे. ही आनंदाची वांटणी फार उत्तम आहे. प्रजासमूह अशा मंगलकार्याला मनोभावानें उत्सुक आहे. सरकाराची सांगणी सर्वत्र मान्यच आहे परंतु त्या सरकारी गोष्टीला मनाची सुप्रसन्नता होण्यासाठीं सरकारी देणगी तशीच मोठी पाहिजे. आनंद सर्वत्र करा ह्मटल्यानें आनंदाला पाझर फुटत नसतो. तो खरोखर उत्पन्न होण्याला लोकांची मनोदेवता संतुष्ट पाहिजे ही संतुष्टी चक्रवर्ती कृपाप्रसादांतली आहे. शाळांतील विद्यार्थ्यांस नाना खेळ खेळूं द्या, त्यांस खाऊं वांटा, गोरगरिबांस अन्नवस्त्र द्या, आतषबाजीचे उत्सव करा, दीपोत्सव होऊं द्या इत्यादि गोष्टी सरकारानें कर्तव्य आहेत आणि त्या घडवून आणण्यासाठीं सरकारापाशीं कार्यकर्ती मंडळी पुष्कळ आहे. बाहेरचा देखावा जसा पाहिजे तसा मनोरम होईल असा आह्मांस भरंवसा आहे पण या आनंदाच्या नाटकाला राजकृपेची जोड मिळणार नाहीं तर तो आनंद नाटकांतच राहील आणि मनोमय रंगणाच्या आनंदाचा अनुभव प्रजेला मिळणार नाहीं. व हा खरा आनंद होण्यासाठीं दिल्लीदरबाराच्या समारंभाची चिरकाल आठवण देणारी अशी श्रीमान एडवर्ड साहेबांची देणगी पाहिजे. आमची ही आशा सफल होईल काय?

भावी आनंदाच्या भरांत आमची सरकारी मंडळी वर्गणीची झोड उठवीत आहे. वर्गणीची रक्कम मोठी जमली तर ती त्या त्या अधिकाऱ्याची कार्यशक्ती दाखवील. परंतु हें विसरतां कामा नये कीं अलिकडे वर्गण्यांनीं लोकांस मेटाकूस आणून सोडलें आहे. किंबहुना हा काळ वर्गणीचाच आहे. वर्गणी हा शब्द सर्व चळवळीचा श्रीकार होऊन बसला आहे. दिवाळी आली ह्मणजे तो सण यथाशक्ती साजरा करावा पण त्या साठीं दिवाळें काढण्याचा प्रसंग येऊं नये. सरकार आपल्या कुबेराच्या हातून व्हावा तितका खर्च करीत असे ह्मणण्याला आह्मी सिद्ध नाहीं. तर लोकांवरील वर्गणी माफक असावी आणि अतिरेकाची पायरी कोणीही अधिकाऱ्यानें चढूं नये असें आह्मी मुद्दाम सुचवीत आहों.

## नेटिव संस्थानें

( ब्रिटिश राज्याचे आधारस्तंभ )

थोडे दिवसापूर्वीं लार्ड कर्झन साहेब रजपुतान्यात फिरत होते तेव्हां त्यांनीं निरनिराळ्या प्रसंगीं नेटिव संस्थानां विषयीं आपले गोड विचार प्रगट केले. लार्ड कर्झन हे मोठे मुत्सद्दी आहेत आणि त्यांचे विचारही अत्यंत उदात्त असतात. त्यांचें वक्तृत्व देखील मोठें सुरस व मोहक असतें. यांच्या गोड विचारांचा प्रसार व्हावा आणि त्यांच्या विचारांचा कित्ता सर्व इंग्लिश अधिकाऱ्यांनीं आपल्या क्रियेंत गिरवावा इतके ते उत्कृष्ट विचार आहेत. त्या विचारमालेंतील कांहीं उत्तम रत्नांचा परिचय आमच्या वाचकांस करून देण्याचा संकल्प आह्मी केला आहे.

जयपुरास असतांना दरबारी मेजवानीच्या वेळीं जयपूरच्या महाराजास संबोधून लार्ड कर्झन साहेब ह्मणाले कीं, नेटिव संस्थानिक ह्मणजे मी माझ्या बरोबरीचे राज्यकर्ते व साह्यकारी मंत्री असें समजतों. आणि याच दृष्टीनें मी त्यांच्याशीं वागत असतो. मी राजेरजवाड्या बरोबर त्यांच्या संस्थानांच्या लोकस्थिती विषयीं व राज्यकारभाराच्या गोष्टी विषयीं पुष्कळदां बोलणें केला आहे आणि माझ्या कारभारांतही मी त्यांचा सल्लामसलतही घेत असतों. नेटिव संस्थानें कायम राहिल्यापासून इंडियन समाजाचा फायदा आहे; प्रस्तुत काळीं सर्वत्र सर्व व्यक्ती समसमान आहेत हें तत्व फार वाढलें आहे आणि शास्त्रीय पद्धतीवर चालविलेला ब्रिटिश राज्यकारभार कंटाळवाणा वाटणें साहजिक आहे; या दोन्ही गोष्टी नेटिव संस्थानांत नसतात व हें नसणें समाजाला मोठें फायदेशीर आहे असें मी वारंवार कळवीत असतों. नेटिव संस्थानांतून जुने सांप्रदाय व चाली रिती कायम राहतात, यांची जुनी मर्दुमकी जमून दृष्टीस पडते, आणि जुन्या रणशूर उदार हिंदु लोकांचे विलक्षण सद्गुण हीं संस्थानें लयाला जाऊं देत नाहींत. हाच देश संस्थानिकांची जन्मभूमी असल्यामुळें ते आपोआपच लोकांस आवडतात. हा नैसर्गिक प्रेमळपणा कोणालाही वर्णन करितां येणार नाहीं. शिदीनाद जी चार बराणीं आहेत त्यांतील गुणी लोकांचा मुत्सद्दीपणा नेटिव संस्थानांतून दृष्टीस पडतो आणि नेटिव धुरंधरपणा व बुद्धिमत्ता हीं संस्थानांतच

निदर्शनाला विशेष येतात. सर्वां मध्यें श्रेष्ठ गोष्ट ह्मटली ह्मणजे रजपुतान्यांतील शिष्टाचार मोठे अनुकरणीय आहेत. ते नेटिवां च्याअंगीं जसे पाहिजेत तसेच युरोपियनांच्या अंगींही असले पाहिजेत. हे शिष्टाचार संस्थानिकांमध्यें पाहिले ह्मणजे त्यांचा थोर कुलीनपणा व्यक्त होऊन तो त्यांच्या उदार व उदात्त विचारांची आठवण देतो; त्यांचे जुन्या चालीचे पण निस्सीम निर्वाहाचे आचार विचार त्यांच्या सार्वजनिक कल्याणकारी स्वभावाची साक्ष देतात आणि खानगी वर्तनांत विनयशीलपणा तर पदोपदीं या जुन्या रजवाड्यांच्या हाडामासांतच खिळला आहे. हे सद्गुण विलयाला जाऊं दिले तर वादळांत सांपडून शीड नाहींसें झालेल्या तारवा प्रमाणें इंडियन समाजाचे तुकडे होऊन जातील." नंतर लार्ड कर्झन साहेबांनीं अगदीं निक्षून सांगितलें कीं संस्थानांतील आमचा पोलिटिकल एजंटचा कारभार हा संस्थानाला मजबुती आणणारा आहे पण या शिवाय त्याचा उपयोग नेटिव संस्थानांस साहेबी इंग्रजी आणण्याकडे होऊं नये असा त्यांचा पक्का आग्रह आहे. राज्यकारभारांत सुधारणा करणें, योग्य काटकसर असूं देणें, लोककल्याणार्थी सार्वजनिक कामें उभारणें, गरीब प्रजेला विश्रामृत पाजणें, त्यांच्या सुखाची अभिवृद्धी करणें, राज्यांतील लांच लुचपतीचे प्रकार नाहींसे करणें इत्यादि गोष्टी नेटिव संस्थानांत चालू करण्या पलिकडे ब्रिटिश सरकारच्या पोलिटिकल खात्याचा निराळा हेतु नाहीं. नेटिव संस्थानांत इंग्रजी धर्तीचा कारभार व्हाइसराय साहेबांस नको आहे आणि युरोपिअन अधिकारी ह्मणजे नेटिव संस्थानांतील रक्त शोषणाऱ्या जळवा नव्हेत असें त्यांनीं निक्षून सांगितलें आहे.

## राजारामीयन.

राजारामीयन ह्मणजे कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचा विद्यार्थी होय. या राजारामीयनासंबंधानें अलीकडे वऱ्हाडच्या शाळा खात्यांत मोठा बोभाटा ऐकूं येतो. मे० कॅन्डी साहेब हे कोल्हापुराहून आलेले आहेत आणि ते इकडे येण्यापूर्वी राजाराम कालेजचे प्रिन्सिपाल होते. इकडे त्यांनीं या प्रांताचीं विद्यासूत्रें हातीं घेतल्या नंतर कोल्हापूरच्या मंडळींना या खात्यांत पुष्कळशा जागा देण्यांत आल्या असा त्या बोभाटाच्या मुख्य आशय आहे. हा आक्षेप खरा किंवा खोटा हें सांगण्या इतकी आमच्या जवळ पुरेशी माहिती नाहीं. वऱ्हाडच्या विद्याखात्याचें असें एक सरक्युलर आहे कीं, बाह्य प्रांतांतील लोकांस होतां होईल तों कमी जागा द्याव्या, ह्मणजे अर्थात् या प्रांतांतच शिकलेले लोक शाळाखात्यांतील जागांना लायकसे दिसले तर त्यास प्रथम जागा द्यावी, असा त्या सरक्युलरचा अर्थ दिसतो. राजारामीयनांच्या नेमणुका या सरक्युलराला बाजूला सारून करण्यांत आल्या असा मुख्य अपवाद आहे. तो यथार्थच आहे असें आह्मी ह्मणण्यास तयार नाहीं. पण ही गोष्ट खरी कीं असाच प्रश्न माजी पटवर्धनशाईंतही मे० कमिशनर साहेब यांनीं काढला होता. त्या वेळीं राव बहादुराविरुद्ध असें लोक सांगत असत कीं, पुण्याकडील पुष्कळशा लोकांची त्यांनीं भरती केली. ह्या संबंधांत आह्मी असेंहि ऐकलें होतें कीं, तशी भरती न करण्या विषयीं राव बहादुरास वरिष्ठांकडून हुकूम आले होते. प्रस्तुतचा राजारामीयनांचा प्रश्न विशेष नेटाला पोहोंचला तर आह्मांस भिती वाटते कीं, मे. कॅन्डी साहेबांसहि असाच मनाईचा हुकूम धाडण्यांत येईल. हल्लीं या खात्यांत शिरलेल्या राजारामीयनना या मनाईची भिति बाळगण्याचें प्रयोजन नाहीं, हें आह्मी ओळखून आहों, पण वरील प्रकारचा हुकूम पुढील राजारामीयनांस अपायकारक होईल. अशा प्रकारचा आक्षेप घेण्याला या पुढें स्थळ मिळणार नाहीं अशी आह्मी उमेद बाळगतो. या आक्षेपाचें खंडण वा मंडण करण्याचा आमचा हेतु बिलकुल नाहीं. तो वाद व प्रतिवाद अगदीं उत्तान आहे. पण आह्मांस या स्थळीं हें लिहिल्यावांचून राहवत नाहीं कीं, मे. कॅन्डी साहेबांनी जी गोष्ट केली आहे असें लोक ह्मणतात ती कांहीं मोठीशी निंद्य आहे असें नाहीं. मनुष्य स्वभावाला अनुसरूनच तो कार्यक्रम आहे. मे. कॅन्डी साहेबांची आपल्या शिष्यवर्गाविषयीं कळकळ व प्रेम हीं ह्या प्रकरणांत घेण्यासारखी गोष्ट होय. ज्याला अशा प्रकारचा आपलेपणा वाटत नाहीं तो मनुष्य तरी कसचा! असा आपलेपणा सर्व जग जाणतीत आहे आणि जर कोणी यथाकाल आपल्या अधिकाराचा किंवा उच्च स्थानाचा लाभ आपलेपणाच्या वर्तुळांत येणाऱ्या व्यक्तींस होऊं देणार नाहीं तर तो मनुष्य आह्मांस निदान फारसा पसंत नाहीं. अर्थात् ज्याचें आपलेपणाचें वर्तुळ दीर्घ व विस्तृत असेल तो साधूच्या योग्यतेला चढणारा माणूस आहे असें आह्मी मानतों.

## The Berar Samachar

MONDAY DECEMBER 8 1902

The sessions of the National Congress are close at hand. A fortnight hence there will be a splendid assemblage of Indian people a Amadabad. the capital of Gujarath. This year's Congress promises to be a grand success. In connection with the Delhi Durbar it is hoped that the number of delegates as well as of distinguished visitors will far excel the number of the last seventeen years. The Reception Committee have had to make special arrangements on a larger scale and have resolved under the stress of financial deficits to raise the fees for delegates to double the usual amount. Each delegate will have to pay Rs. 20. Similarly they have laid down a scale of fees for visitors ranging from Rs. 5 to 30. By these details we intend to point out that this year's Congress will be a grand thing. After seventeen years of continuous deliberations guided by the best statesmanship of the leading patriots of this vast nation, we think that the stage of transition has arrived. From the world of polimics we think that our people are entering upon a new life of activity. Our defeats and reverses in the past have been our instructions and the National Congress will open a new chapter of History in which the people will rely more on self—half than on the support of the Government. People have lost relience in the initiative which they thought the Government would take in improving the lot of the Indian people. The Congress does not now hope for any substantial support from the Government. And the Congress has chalked out for itself its new lines of building up the material prosperity of India. The educative effect of these 17 years' sessions has been very great indeed. We have unlearnt the lessons of depending too much on the patronage of the government. In that direction we have been the dupes of false hopes. There is not one movement which has received the cordial support of the government. All our resolutions have been almost a cry in the wilderness. And it is this state of things that has driven us to find out new channels of working up our nationality. We have to build up our nationality and such an edifice is alone possible upon the solid foundations of the material wealth. For this purpose we have to interpret well the lessons of history. An English man in India is like a working bee. He builds up a hive and collects honey therein. In this work of collecting honey he has made a common cause with the people of this country in so far as their joint action will help him to augument the size of the hive and facilitate the collection of honey. An Englishman thus exploits India to his own advantage. Against his growing demands we have now to raise a barrier. Our people will have to walk in the wake of an Englishman. We have to build a—new a hive on the old foundation of material wealth. We have to put up something like a siege upon the English manufacture and English industry, provided we can have some native industries instead of the foreign ones. Henceforth the policy of our people will be something of a protective character. We shall do well if we protect our industries and and commerce by all possible means. "My conuntry's manufacture shall be mine and nothing shall be like it, irrespetive of its quality and price." This should be our motto and we think that the Congress wants to inaugurate some such process when it is going to hold under its anspiciese an Exhibition of Indian arts and industries. In this light we read the programme of the Congress and we shall not be far off from translating that programme into positive action if we succeed in perpetuating an era of Indian industries and commerce in competetion with the foreign ones.

—:0:—

"The political morality, the rules of which must be strictly observed among the white races, have very little or no application in the case of races which are not white. And this political immorality begets in its turn an individual immorality which is effectually sapping the manhood of Europe. And we in India, are trying to follow, as it lies in our power, in the wake of Europe. In our blind admiration for the outwordly splendid civilization of the West, with our eyes blinded by its misleading education, we have all but abandoned the national ideals, by following which our ancestors in the past had raised themselves almost to the level of the gods. The quite and simple dignity, so characteristic of our Oriental life, is gradually giving place to vulgar and feverish rush after wealth. The poetic grace which beautified our lives in the past is disappearing with our recognition of the burdensomeness of the customs which used to illustrate it. Charity is disappearing from our lives as we progress day by day in selfishness and we are learning gradually to envy and then to hate our more fortunate neighbours. Our trust in the goodness of God which had made us so indifferent to the ills of life, and which the superficial thinkers of Europe had called our Asiatic fatalism, is fast leaving us. And our life is losing all the colour, all the poetry, all the unselfishness which used to render it so beautiful and so sublime in the past."

## वऱ्हाड

हवामान— गेल्या दोन दिवसापासून हवा बिघडली आहे. ढग बरेच जमूं लागले. आणि शेवटीं थोडथोडा पाऊसही पडूं लागला आहे. हवेंत गारठा पुष्कळ आला असून ताप खोकल्याची दुखणीं जोरावर आहेत. खामगांव, शेगांव, बुलढाणा इत्यादि भागाला प्लेग चालूच आहे. ईश्वर करो आणि हा प्राणहारी रोग शांत होवो!

मे० इलियट कमिशनर साहेब यांचा मुक्काम आठ दिवस आकोल्याचा होता. येथील वार्षिक तपासण्या झाल्या. आज पासून साहेबांचा तळ हालणार असून स्वारी आकोटाकडे जाईल.

द्यूत विपाक--- हें संगीत नाटक रा. रा. धोंडो रंगनाथ शेंबेकर यांनीं रचलें आहे. याचा प्रयोग रंगभूमीवर धुळेकर संगीत मंडळीनें परवां रात्रौं करून दाखविला. प्रयोगाची उभारणी थोड्या वेळांत चांगली झाली. नल व दमयंती या दोन्ही पात्रांनीं आपलीं कामें चांगलीं केलीं या नाटकाची भाषा प्रौढ असून विचारांची संगती नाना रसाला पुष्टी आणणारी आहे. मूळच्या कथानकाचा हृदयंगमपणा या 'द्यूत विपाकांत' पुष्कळसा कायम राहिला आहे, ही गोष्ट या नूतन संगीत काव्य कर्त्याला भूषणावह आहे. संगीतांत हा पहिलाच प्रयत्न खरा पण तो चांगला वर्णनीय साधला आहे.

कुमार श्री हरभामजी रावाजी डिप्टी कमिशनर, आकोला हे किरकोळ रजेवर काठेवाडाला गेले आहेत. सात दिवसांनीं परत येतील; आणि पुन्हां २९ वे तारखे पासून दरबारा निमित्त दिल्ली कडे जाणार आहेत.

## वर्तमानसार

लोकांस ज्ञानामृत देण्याची युक्ती— अमेरिकेंत बुकें प्रसिद्ध करणारांचीं व बुकें विकणारांची अशी पद्धत आहे कीं, नामांकित लेखकांचीं बुकें बरोबर घेऊन, गांवोंगावीं जाऊन, घरोघर फिरून, लोकांना बुकें विकून त्यांना बुकें वाचण्याची अभिरुची लावून द्यावयाची. त्याच धर्तीवर कलकत्याच्या बंगाली लोकांनीं नामांकित बंगाली लेखकांचीं बुकें बरोबर घेऊन बंगाल प्रांतांत फिरून लोकांना बुकें विकून त्यांना बुकें वाचण्याची अभिरुची लावून दिली आहे. बहुधा केशवचंद्रसेन व राम मोहनराययांचीं धार्मिक पुस्तकें अशा पद्धतीनें फार विकलीं जातात. युक्ती सोपी व चांगली आहे.

दुर्दिन संपण्याचीं सुचिन्हें— चीन देशांतील शेंकडों मुलें जपानांत जाऊन विद्याभ्यास करीत आहेत. व जपान देशांतील शेंकडों विद्वान लोक चीन देशांतील कॉलेजांत प्रोफेसरचें काम करीत आहेत. सारांश थोड्याच दिवसांनीं चीन देशचे लोकही जपान देशच्या लोकांप्रमाणें विद्वान होऊन चीन देशाचा उर्जित काळ आणण्यास पात्र होतील अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत.

नवी वैद्यकी— एका इटालियन वैद्यानें रोग्यास पुष्कळ हसवून बरें करण्याच्या नवीन पद्धतीनें खोकल्याचे पांच रोगी बरे केल्याचा अनुभवही कळविला आहे. ही अगदीं चतुराईची सुधारणा होय.

थकण्याचे पूर्वी विसावा घ्या— मनुष्यानें आपल्या शक्तीचें रक्षण करण्यासाठीं अत्यंत थकवा येण्यापूर्वीच कामामध्यें विसावा घ्यावा. व विसावा घेऊन नंतर काम सुरू करावें, थकवा येई पर्यंत काम करण्यानें गात्रें शिथिल होतात. तें शैथिल्य नाहींसें होण्यास मोठें कठीण पडतें, असें आरोग्य शास्त्रज्ञ पंडितांचें म्हणणें आहे.

ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय, पंडुरोग, मुळाची ज्वर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तमन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ०६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दर:—

३६ गो० १ रु०; ७१ गो० २ रु० ११६गो० ३ रु० १६१गो० ४ रु०; २७१गो० ६ रु० ६६०गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगावर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूची भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व साधनाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.


सूचना— अलीकडे २।३ वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधुस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.

## खरेदी करा!
## रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस
## नकली मालास भुलून पैसे खर्चु नका!!!

रेलेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अगदीं उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच वगैरे विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यात येते, व या बद्दलची जोखीम सारी आमचे शिरावर आहे.

सूचना:—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस ........................४०
१९ ,, हंटिंग ........................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे .........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............१५०

मेटलचें तीन वर्षं ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह ............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें ................२०
१९ ,, हंटिंगचें ......................२०
१४ ,, रिस्ट वॉच .....................२०

इनॅमलमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपनफेस ............२०
१९ ,, हंटिंग ....................२०
१४ ,, रिस्टवॉच ....................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग ......................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३६
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचे....३५
१९ ,, हंटिंग ................४९
लेडीज वॉचेस १४, १८, क्यारेटगोल्ड रुपये ६९–२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.

आरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचें
सोल एजंट.
९ हार्नबी रोड, मुंबई.

---

विक्रीस तयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड - (सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट (सन १८८२ चा १० वा) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुने व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेले घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धा ८८४.

दिवाणी आक्टसंग्रह- (यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चासुद्धा २८८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.
नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

---

मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नाटकेस, नं० नाटकें व तत्वाईक विषयांसह येत्या मार्गात निघेल.

नांवे नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० ३० सह आगाऊ १।.

पत्ता— के. डी. फोटो आर्टिस्ट
वर्धा सी. पी.

---

K. N. ESMAYAL & Co.

यांची अनेक रोगांवरील जग प्रसिद्ध ३७ प्रकारची औषधें विक्रीस तयार आहे. कार्डावर पत्ता लिहून कळवा म्हणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजानुरा इस्मायल
आणि कंपनी.
वर्धा सी. पी.

REGISTERED N. No. 4

[illegible] ,, २ ,,
साल अखेर ,, ७ ,, १
किरकोळ अंकास........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
सरे खेपेस .... .... ....०१

# वऱ्हाडसमाचार.

Town 1
Six monthly ........3 ............... 8 a
Single copy .............................. 4 as

Advertisement
below 10 lines ...... 2 R
Per line over 10 ......4 as
Repetition Per line ...3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 15 DECEMBER 1902 NO 48

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १५ माहे डिसेंबर सन १९०२ इ० अंक ४८

## Kadi हें काय आहे ?

डाक्टर डी. एन. दस्तुर यांनी तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, बशांत घाघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणे, ससनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यास एक हजार रुपयांच्या किमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याचा बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।१०२ } J. Kinniburgh एजंट

### NOTICE

The Indian Police Commission will visit Amraoti in January next. Any person resident in Berar who desires to furnish evidence to the Commission on the subject of its enquires is requested to apply to the undersigned, who will forward to him a copy of questions on the subject of the Commission's enquires. The replies to these questions should be forwarded to the Secretary with the least possible delay, and they should, in any case, reach him not later than the 25th December 1902. If, on a perusal of these replies, the Commission consider that it is desirable to examine the witness orally he will be informed in due course of the date of such examination.

All communications for the Commission should be addressed "The Secretary, Indian Police Commission, Camp" without the addition of any post town.

Indian Police Commission Camp 24-11-1902 } (Sd.) H. A. Stuart. Secretary, Indian Police Commission.

## १० आणे तें किं० रु० १५ चें फुकट.

कंपनीचें दहा आण्याचें तिकीट विकत घ्या. त्याबरोबर रु० २॥ पाठवून ४ तिकिटांसह हक्काचे सरटीफिकीट मिळवा. ( किंवा एकदम तीन रुपये दोन आणे पाठवा. ) तीं चार तिकिटें दुसऱ्यास विकून आपले अधीष रुपये वसूल करून घ्या. विक[illegible]रांकडून अगर तुमचे मार्फत प्रत्येक तिकिटासह रु० २॥ प्रमाणें एकंदर रु० १० पाठवून तिकिटांसह ४ सरटीफिकिटें व फुकट चांदीचे पॉकेट वॉच किंवा भिंतीस लावण्याचे ८ दिवसाच वाजणारें मेंठ क्लाक मागवा. अर्थात् दहा आण्यांत १५ रु० चें फुकट !!!

जी. बी नाईक आणि कंपनी.
ठाकुरद्वार रोड मुंबई.

## अति स्वस्त ! ज्ञानविलास अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळत, शिवाय प्रत्येक वर्षारंभीं उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही. पी० नें मागवा.

पत्ता–संपादक, ज्ञानविलास, खणदाळ; पो० गडइंग्लज; इ० कोल्हापूर.

### नोटीस

चि. रा. नारायणभट बिन दादंभट जोशी वाघमारे राहणार जामोद ता० जळगांव यांस:—

नोटीस देणार सरस्वतीबाई जवजे गोविंद भट जोशी वाघमारे हल्लीं राहणार चितोडे ता० खामगांव इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझे प्रत्यक्ष दीर आहांत. माझा भ्रतार, तुह्मी व सासरा दादंभट हे एकत्र हिंदु कुटुंबांतील असून आपली सर्वांची वडिलोपार्जित स्थावर जंगम इस्टेट व तसेंच माझे भ्रतारानें आणखी जास्त मिळविलेली इस्टेट आहे. दुर्दैवानें माझे भ्रतार मरण पावल्यापासून कांहीं दिवस मी आपले समाईक कुटुंबांत राहून आपलें समाधान मानून घेतलें परंतु आज कित्येक वर्षांपासून मजला घरांतील बहुतेक माणसाकडून फार जाच होऊं लागला. परंतु मी माझे कमनशिबाकडेस बोल लावून बरींच वर्षें कालक्रमणा केली. गेल्या तीन चार वर्षांपासून तुह्मी व तुमचे कुटुंबाकडून मजला अनिवार त्रास होऊं लागला. मी तुह्मांस मुळींच नकोशी झाले आहे. मजला तुह्मी फारच क्रूरतेनें वागवून गेल्या तीन चार महिन्यापासून मजला माझे हक्काचे घरादारांतून व इस्टेटींतून तुह्मी हाकूनही लावलें. त्यामुळें माझा निरुपाय होऊन मी हल्लीं माझे बहीणीचे घरीं राहत आहे. तुह्मी माझे अन्नवस्त्राची योग्य कांहीं तरी तजवीज कराल अशी आजपर्यंत मी आशा करीत बसलें. परंतु तुह्मी कांहींच लक्ष घातलें नाहीं माझे पोषण करण्या सारखा कोणी नाहीं. मी अगदीं दीन झालें आहे. माझे नवऱ्याची व तुमची एवढी मोठी समाईक जिनगी असून तुह्मी मजला अशा दीनवाण्या स्थितींत राहू द्यावें हे तुह्मांस व विशेषें करून आपले ब्राह्मण धर्मास शोभण्या सारखें नाहीं. शेवटीं नाइलाज होऊन तुह्मांस या नोटीशीनें कळवितें कीं ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत तुह्मी तुमचे व आमचे इस्टेटीचे मानानें योग्य ती माझे अन्नवस्त्राची सोय करून द्यावी. तसेच माझे अंगावरील सोन्याचांदीचे दागीने किंमत रुपये ५०० चे दागीने, जे माझें स्त्रीधन ह्मणून मजपाशीं होते, तें तुह्मी मजपासून घेतलें तें माझें माझ्या हवालीं करून माझा निकाल करावा. वर लिहिलेले मुदतींत तुमचे कडून तजवीज न झाल्यास मजला योग्य कोर्टांत अन्नवस्त्राचा व स्त्रीधनाबद्दल दावा करणें भाग पडेल व तुह्मापासून कोर्ट खर्चेही भरून घेतला जाईल. सबब तुह्मास अगाऊ नोटीशीनें कळविलें आहे, कळावें ता० ९ माहे डिसेंबर सन १९०२ इ०

( सही )
सरस्वतीबाई जवजे गोविंदभट जोशी वाघमारे हल्लीं राहणार चितोडे तालुके खामगांव निशाणी हातची बांगडी.

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती है।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंवणें, हलं लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, वांकडे तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दातानीं फोडतां न येणें, दात मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दात स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

पत्ता—
नन्दलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अॅण्ड कंम्पनी मथुरा.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य १ शके १८२४

## राष्ट्रीय सभा.

यंदा अमदाबादेस अठरावी राष्ट्रीय सभा भरणार आहे. आज पासून आठ दिवसांनीं ही नगरी अगदीं गजबजून जाईल. यंदाची सभा फारच प्रेक्षणीय होईल असा सुमार आहे. दिल्ली दरबाराच्या निमित्तानें घरा बाहेर निघणारे पुष्कळसे श्रेष्ठ व मोठे गृहस्थ या सभेला प्रथम येतील असा अदमास आहे. या वर्षीचा समारंभ मोठा अप्रतिम होईल असा बहुत जणांचा तर्क आहे. राष्ट्रीय सभेच्या आश्रयाखालीं जें जंगी प्रदर्शन भरणार आहे त्याच्यामुळेंही लोकसमूह मोठा जमेल असा रंग दिसतो. राष्ट्रीय सभेला प्रारंभ पुढील सप्तकांतील मंगळवारीं होईल. या सभेपुढें वादविवादासाठीं जे प्रश्न मांडण्यांत येणार असतात त्यांचा खर्डा अगाऊ तयार होत असतो. असा खर्डा स्वागत-मंडळीचे मुख्य चिटणीस रा. रा. गोविंदराव प. पाटील यांनीं तयार केला आहे. हा सर्व मसूदा ठरावाच्या रूपानेंच लिहिलेला आहे. हा आगाऊ वाचून ठेवण्यापासून फायदा दुहेरी आहे. राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमाची थोडीशी अटकळ अगोदर येईल आणि त्या त्या विषया संबंधानें आपण मनन करूं तर आपणांस राष्ट्रीय सभेंत होणाऱ्या वादविवादाची खरी किंमत कळून येणार आहे. यापैकीं कांहीं विषय जुने आहेत आणि कांहीं अगदीं नवीन आहेत.

सर्वच विषयांची मांडणूक निरनिराळे वक्ते किती उत्कृष्टपणें करितात आणि तें काम करण्याला किती तरी माहिती लागते, नाना गोष्टीं विषयीं अनुभव निरनिराळ्या भाषणांतून कसा उतरला असतो, आणि कोणत्या साधक बाधक गोष्टींनीं पृथक् पृथक् खंडन मंडन करितात इत्यादि गोष्टी आपल्या पूर्व अवलोकनाचा व परिशीलनाचा कमजोरपणा दर्शवितील आणि आपल्या विचाराचें लघुत्व व संकोचित दृष्टी हीं पाहून आपल्या ज्ञानभांडारांत नवीन ज्ञानरत्नांची भर पडेल इतकेंच नाहीं तर राष्ट्रीय सभे सारख्या परिषदेंतील वाग्विलास आपली लालसा तृप्त करितील.

सभेंत निघणाऱ्या विषयांचें पूर्व मनन केल्या पासून निरनिराळे युक्तिवाद मनाला चकित करितात. सरस्वतीचा प्रसाद ज्यांच्या घर आहे अशांच्या मनोहर वक्तृत्वाची पारख आपल्या मनाला उत्तम प्रकारें करितां येईल. राष्ट्रीय सभेचा वृतान्त ह्मणजे या देशाच्या राजकीय उन्नतीचा ग्रंथ होय. या ग्रंथांतील वक्तृत्वाचे उत्कृष्ट वेचे आपल्या देशाच्या मुत्सद्दीपणाची, व उदात्त विचारांची साक्ष देतील आणि भावी कार्यशालेची दिशा दाखवतील. यंदाच्या ग्रंथांत समावेश पावणाऱ्या विषयांचा मसूदा आह्मी आज मुद्दाम दुसरीकडे दिला आहे.

## गजान्त लक्ष्मी

दिल्लीच्या दरबाराची कार्यपत्रिका नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. तिचें वर्णन वाचतांना कांहीं अदृष्टपूर्व चमत्कार दृष्टीस पडतील असें वाटतें. दिल्लीची शोभा अपूर्व होत असून तेथील लक्ष्मीचे उत्कृष्ठ विलास नेत्रांचें साफल्य करितील. लक्ष्मीची परमावधी झाली ह्मणजे गजान्त लक्ष्मी गृहा आली असें ह्मणण्याचा परिपाठ आहे. या ह्मणीचा खरेपणा दिल्लीच्या दरबारांत दिसून येणार आहे. गजान्त लक्ष्मीचा अर्थ कांहीं कोशांत असा दिला आहे कीं, इतकी पुष्कळ संपत्ती कीं तिच्या भारानें हत्तीही वांकेल पण आमच्या दृष्टीनें हा अर्थ बरोबर नाहीं. गजान्त लक्ष्मी ह्मणजे ज्याच्या राजद्वारीं हत्ती झुलत आहेत त्याला गजान्त लक्ष्मी प्राप्त झाली असें ह्मणण्याचा लौकिक न्याय आहे. आमच्या चक्रवर्ती एडवर्ड बादशाहा संबंधानें हा लौकिक दृष्टान्त अगदीं अक्षरशः खरा आहे; किंबहुना त्या गजान्त लक्ष्मीची कल्पना दिल्ली दरबाराच्या समारंभावरून होण्या सारखी आहे. आजपासून पंधरा दिवसांनीं लॉर्ड कर्झन साहेबांच्या द्वारें श्रीमंत चक्रवर्ती एडवर्ड सरकारांस दिल्लीच्या पादशाहीच्या तक्तावर राज्याभिषेक होईल. या राज्यारोहणानिमित्त लॉर्ड कर्झन साहेब शृंगारलेल्या हत्तीच्या अंबारींतून, हत्तींच्या दुतर्फा रांगेमधून दिल्ली मध्यें गाजत मिरवीत जातील. हा गजान्त लक्ष्मीचा देखावा फार प्रेक्षणीय होईल असें ह्मणतात. ही गोष्ट, २९ सांवे तारखेला होऊन नंतर १ ले तारखेला दिवसा बारा वाजतां राज्यारोहणाचा समारंभ होईल. या दिवशीं तोफांची सरबत्ती नाना वाद्यांचा गजर, व लोकांचा जयघोष यांनीं हा समारंभ उत्कृष्ट होवो आणि आमचे श्रीमंत चक्रवर्ती एडवर्ड बादशाहा चिरकाळ सुखानें राज्य करोत !

## प्रजेची संपदा.

जेथें राजाची गजान्त लक्ष्मी तेथें प्रजेच्या संपदेला काय कमी ! राजा ह्मणजे राष्ट्ररूपी देहाचें उत्तमांग होय, त्या उत्तमांगाला शोभणारा असाच प्रजारूपी अवशिष्ट भाग पाहिजे. गजान्त लक्ष्मीला शोभणारी प्रजेचीही संपदा पाहिजे. पण या दृष्टीनें इंडियन प्रजा आमच्या बादशाहाला शोभणारी नाहीं. इंडियनाची संपदा ह्मणजे त्या लोकांचें घोर दारिद्र्य होय. राजानें आपली प्रजा सुखसंपन्न केली नाहीं तर त्याच्या वैभवाला प्रजा ती काय शोभणार ! दिल्लीचा दरबार हा राजकीय भाग झाला आणि या महा आनंदाच्या दिवशीं सर्वत्र आनंद दर्शविण्यासाठीं महोत्सवही करण्यांत इंडियन प्रजा अगदीं तल्लीन आहे. प्रजेची निष्ठा व राजभक्ती या आनंदोद्गारानें व्यक्त होईल. पण या राजभक्तीला जोडगोळी ह्मणजे प्रजेविषयीं राजाची सहानुभूती होय. जेथें दारिद्र्य अठरा विस्वे आहे तेथें संपत्ति वाढली आहे ह्मणून स्टेट सेक्रेटरी चक्रवर्ती राजेसाहेबांस कळवीत आहेत. अशा राजकीय वातावरणांत प्रजेविषयींची सहानुभूती ती कोठची ! कोट्यावधी रुपयांचा खर्च दिल्लीला होत आहे. हा खर्च बाह्यतः नवीन बादशाही जगभर विदित करील. पण या वैभवशाली बादशाहीला अंतःपुष्टी प्रजेच्या सुखसमृद्धीनें आली पाहिजे. या अंतरंग पुष्टीविषयीं अधिक कळकळीचा प्रयत्न सरकारांनीं करावा आणि इंडियन प्रजेला प्रस्तुतच्या दास्य धर्मांतून मुक्त करावें एवढीच प्रजेची मागणी आहे. इंडियनांची विपदा दूर होण्या साठीं काळा गोरा हा भेदाभेद दूर केला पाहिजे, ब्रिटिश प्रजेचे सर्व हक्क व अधिकार इंडियनांस दिले पाहिजेत. आणि त्यांची प्राचीन संपदा परत आणणारे त्यांचे उद्योगधंदे व कारखाने चांगले चालतील अशी सरकारनें व्यवस्था केली पाहिजे.

( पान ६ वरून पुढें )

( इ ) गावोगांव जी सावकारी चालते तिला चांगलें स्वरूप आणण्यासाठीं व तसेंच लायक शेतकऱ्यास माफक व्याजानें कर्ज देवविण्यासाठीं शेतकीच्या पेढ्या स्थापित झाल्या पाहिजेत.

४ था ठराव —— इंग्लंडांत 'फ्यामिन युनियन' नावाची संस्था आहे. तिनें स्टेट सेक्रेटरीला विनंती केल्या प्रमाणें कांहीं मासलेवाईक जिल्ह्यांतून सरकार मार्फत लोकस्थितीची चौकशी व्हावी. ह्मणजे पुष्कळसे गैरसमज दूर होऊन योग्य उपाय योजण्याचा मार्ग खुला होईल. मागील दोन्ही दुष्काळानंतर अशी चौकशी फार महत्वाची आहे. तसेंच लार्ड इलगिन यांच्या कारकिर्दींत या देशाच्या सांपत्तिक स्थितीविषयीं झालेल्या चौकशीचें कागदपत्र प्रसिद्ध व्हावेत.

५ वा ठराव-दक्षिण आफ्रिकेंत वसाहतीला गेलेल्या इंडियनांच्या दुःखद स्थिती संबंधानें आहे. इंडियनांची राजनिष्ठा व गेल्या आणीबाणीच्या लढाईंत इंडियाकडून मिळालेलें उत्कृष्ट पाठबळ हीं लक्ष्यांत घेऊन इंडिया सरकारानें इंडियन प्रजेच्या हक्कांचा यथान्याय विचार होईल अशा विषयीं सत्वर उपाय योजावे. सध्यां ब्रिटिश कॉलनी मध्यें नव नवे कायदे इंडियन विरुद्ध होत असून अशी झोटिंगशाही चालली आहे कीं इंडियनास त्या वसाहतींत राहणें मोठें संकटमय झालें आहे. त्यांचे सार्वजनिक हक्क काढून घेतले आहेत.

या बाबतींत राष्ट्रीय सभा आनंद प्रदर्शित करिते कीं स्टेट सेक्रेटरींनीं नुकतेंच कांहीं मंडळींपाशीं अभिवचन दिलें आहे कीं बोअर लोकांच्या मुलुखांत इंडियनास वन्दाच सवलती व हक्क देण्यात येतील.

६ वा ठराव—लार्ड कर्झन साहेबांनीं राजघराण्यांतील पुरुषासाठीं लष्करी कारकीर्द काढली आहे त्या संबंधानें राष्ट्रीय सभा कृतज्ञ आहे आणि चीनच्या लढाईंत व दुसऱ्या पुष्कळशा लढायांत नेटिव पलटणींनीं राजभक्तीपूर्वक आपला रणशूरपणा दिगंत पसरला तो लक्ष्यांत घेऊन सरकारांनीं नेटिव लोकांस लष्करी खात्यांतील उच्च उच्च दर्जाच्या जागा द्याव्या आणि लष्करी कॉलेजें स्थापित करून इंडियन लोकांस लष्करी शिक्षण द्यावें ह्मणजे इंडियनांस लष्करी खात्यांत घेण्यासाठीं इंडियन कमिशंड व नान-कमिशंड आफिसर तयार होईल.

७ वा ठराव— स्टेट सेक्रेटरींनीं नुकतेंच जें कथन केलें आहे कीं इंडियन लष्करांत गोऱ्या लोकांची भरती बहुधा आधिक करण्यांत येईल त्या कथनाविषयीं राष्ट्रीय सभा दुःख प्रदर्शित करीत आहे. दक्षिण आफ्रिकेकडे व चिनाकडे ब्रिटिश पलटणी इंडियातून तीन वर्षे पर्यंत बाहेर पाठविण्यांत आल्या होत्या तरी सर्वत्र शांतताच होती. अशा स्थितींत गोरी फौज वाढविणें मोठें अन्यायाचें आहे. किंवा ही फौज वाढविणेंच असेल तर तिचा खर्च विलायत सरकारानें सोसावा इतकेंच नाहीं तर विद्यमान लष्करी खात्याचा पुष्कळसा खर्च विलायत सरकारावर पडणेंच न्याय्य होईल.

आतां गोऱ्या शिपायांचा पगार वाढविण्याची सूचना पुढें आली आहे, तिच्या विरुद्ध राष्ट्रीय सभेचा मोठाच आक्षेप आहेत. प्रस्तुतचा लष्करी खर्चच इंडियन तिजिन्याला भारी जबरदस्त आहे आणि शांततेच्या व स्वस्थतेच्या आबादानींत असा लष्करी खर्च वाढविल्यामुळें आवश्यक अशा राष्ट्राच्या अंतस्थ सुधारणा अगदीं बाजूला पडल्या आहेत.

८ वा ठराव— मुलकी खात्यापासून न्यायखातें स्वतंत्र करण्या विषयींची सूचना जुनीच असून पुनःपुन्हां पुढें आणावी लागत आहे. सध्यांचा सरकारी कल अगदीं उलट असून मुलकी खात्याला न्यायखात्यावर अधिकाधिक वर्चस्व देण्या कडे आहे.

९ वा ठराव—'पब्लिक सरव्हिस कमिशन' चा खटाटोप व्यर्थ गेला. कामन्स सभेनें १८९३ च्या जून २ तारखेला केलेल्या ठरावाला अनुसरून 'इंडियन सिव्हिल सरव्हिस' च्या परीक्षा एकाच वेळीं इंग्लंडांतल्या प्रमाणें इंडियांतही झाल्या पाहिजेत. या परीक्षा ह्मणजे सिव्हील सरव्हिस, मेडिकल सरव्हिस, तसेंच पोलीस, एंजिनिअरिंग, टेलीग्राफ, फारेस्ट व आकौंट या खात्यांतील सर्व्हिस साठीं इंग्लंडांत होणाऱ्या परीक्षा होत. निरनिराळ्या खात्यांतील मायनॉर सर्व्हिस पैकीं उच्च जागा नेटिवांस मिळूं नयेत अशीच इंडिया सरकारची राज्यपद्धती आहे. ही पद्धती कमिशनाच्या सूचना झुगारून देते इतकेंच नाहीं तर मुख्य सरकारच्या व व्हाइसरायाच्या वेळोवेळेच्या अभिवचनांस तिळांजली देत आहे ही मोठी दिलगिरीची गोष्ट होय.

१० वा ठराव— सरकारी नाण्याच्या कायद्यासंबंधानें आहे. रुपयाच्या नाण्याची चांदी कमी किंमतीची असून त्या नाण्याला कृत्रिम कायद्यानें शेकडा ३० या प्रमाणानें किंमत जास्ती आणिली आहे. या रितीनें लोकांवरील करांचा बोजा भरमसाट वाढला. आणि सरकारी वार्षिक शिल्लक वाढत गेली तरी शेतकऱ्यांची व इतर उद्योगधंद्याची मोठी हानी आहे.

११ वा ठराव— मिठावरील कराविरुद्ध आहे. हा कर जबर असून वाईट आहे. लोकांस मीठ मुबलक न मिळाल्यामुळें रोगांची वाढ मोठी दिसत आहे आणि खनिज्या

ची शिल्लक पुष्कळ वाढती आहे त्या अर्थी हा कर निदान कमी तरी झाला पाहिजे. १८८८ पासून याची वाढ मोठी जंगी आहे. ती वाढ छाटली गेलीच पाहिजे.

१२ वा कंठाळी ठराव– आहे यांत प्रिव्ही कौंसिलांत इंडियन कायदे पंडितास शरीक करणें, हुंडणावळीचा भत्ता बंद करणें, हत्यारांचा कायदा सुधारणें, व्हालंटीअर पलटणीची मंजुरी देणें, पंजाबाला हायकोर्ट देणें, शाळा खात्यातील उच्च जागी नेटिव पदवीधरांस नेमणें, कूपर हिल्ल कॉलेजांत दोन्ही पेक्षां अधिक नेटीव घेणें, ज्यूरीची पद्धती चालू करणें, नेटिव अपराध्यांस निदान निम्मे नेटीव ज्यूर किंवा असेसर देणें, व जंगलखात्याचे नियम शेतकऱ्यांच्या सोयीचे करणें या नाना कामांसाठीं सरकारापाशीं राष्ट्रीय सभा सूचनांची अनेक वेळां आवृत्ती करीत आहे.

१३ वा ठराव– मेडिकल सरव्हिस संबंधाचा आहे. या वैद्यक चाकरीच्या दोन शाखा आहेत. पहिल्या मिलिटरी शाखेंत युरोपिअन लष्करांतल्या जागा गोऱ्यांस पण नेटिव पलटणींतील जागा नेटिव पदवीधरांस मिळाव्या, दुसऱ्या सिव्हील शाखेंत नेटिवांस उच्च उच्च जागा वैद्यकाची परीक्षा घेऊन देण्यात याव्या. जो अधिक गुणवान् तोच हुद्याला चढला पाहिजे. या रितीनें असिस्टंट सर्जन व हास्पिटल असिस्टंट यांस त्यांच्या लायकीनें उच्च चाकऱ्या मिळतील.

१४ वा ठराव—रेल्वेचे खातें सरकारी पब्लिक वर्कस खात्याचें उपांग आहे. यात २०० रुपयावरील पगारांच्या चाकऱ्या गोऱ्याच लोकांस दिल्यामुळें खर्चाचा बोजा मोठा होतो आणि नेटिवांच्या न्याय्य हक्कांची पायमल्ली होत आहे तर हे दोन्ही अनर्थ दूर केले पाहिजेत.

१५ वा ठराव–– देशी कारखान्यांतून यंत्राच्या साह्यानें काढलेला कपडा लँकाशायरच्या कपड्याशी सामना करूं शकत नाहीं असा खरा प्रकार असूनही देशी कापडावर शेंकडा ३॥ टक्के प्रमाणें जो कर बसविण्यांत आला आहे त्यापासून देशी कारखानदार अन्यायानें बुडत आहेत व [illegible]णी कापडाचा उद्योग कमी कमी होत चालला आहे. ही गोष्ट सरकारांनी लक्ष्यात घ्यावी. व वरील कर माफ करावा अशी सभेची विनंता आहे.

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 15 1902

We never dreamt that a proof would be ever needed of the existing extreme poverty in India. But to our suprise the discussion on the India Budget in the Parliament points to the necessity of such a strong proof. From the full reports which we have of the several speeches in the Parliament, it seems that there were two sets of opposing arguments adduced to prove the poverty as well as the prosperity of India. Optimism of the highest type prevails in the official circle and the Secretary of State exults in the revival of prosperous times after the last faminesand points with a feeling of satisfaction to the large surplus of 11 millions of sterling over and above the expenditure of the last 3 years. The rosy picture of prosperity is no doubt a happy ideal but facts are most stern and stubborn and do not stand to certify the likeness of such a picture. The arguments deduced from the soundness of the financial position of the Government are always faulty in so far as they do not take into account the increase in the burden of the public taxes and the corresponding inability of the people to pay off these taxes. If the increase in taxation be commensurate with the growing ability of the people to pay the larger demands of the Government we shall be at one with the Government in arguing that the Indian finances are most elastic and resourceful and that the people also show signs of improvement and prosperity and that they do not mind the growth in taxation. But such is not the state of things. The experiences of the last two famines are most conspicuous, and none can afford to mis-read the lessons they teach. There is the patent fact that the existing industries of the country are fast dying away and in the face of foreign competition they will soon be numbered along with so many other industries that have already lost ground. This means that India will sooner or later collapse as an industrial nation and there will be a dead—look in the present industries of India if the Government do not come to the rescue by removing, for example, the excise duty on Indian yarn and by protecting with special concessions the existing industries against the foreign ones. The industrial revival of India is the only way to secure her material welfare. If we fail herein for want of help from the Government we need not predict the doomed future of this vast nationality. The fatal downfall of the native industries has congested too much the agricultural profession. It is over—manned and unless we remove the extra pressure of the people that are thrown upon it we think that the agriculture occupation will lose its time—honoured superiority over other professions. Misfortunes multiply in unknown ways. The artificial value of the Rupee is also another source o a great loss to the nation. The Currency legislation has maintained the Rupee at 16*d* whereas its actual price in the foreign market is 10*d* a rupee. The high level which the exports of India have reached is no longer an indication of prosperous times. It will be noted that these exports do not carry sufficient prices so as to bring prosperity to the spinning and other industries of India. The currency problem has up—set the prosperity due to the increase in exports. Another main argument of India's prosperity is the largest imports of India that have eclipsed all previous records. It is presumed that the people do spend lots of money in purchasing these heavy imports and that they cannot be said to be otherwise than prosperous as long as they afford to consume them. But these optimists fail to notice that it is the European community and not the masses of India that contribute to purchase the imports. Besides it does not stand to reason that with the growth in the population there should not be an iota of increase in the total consumption of salt if the people are rich enough to spend on articles brought from foreign countries. Some people have made much of the argument that the average income of our countryman has been raised from Rs. 18 to Rs. 20 a year in the course of the last 20 years. Granted that there is this rise in the average income per head of population but we have not noticed at first the heavy fall in the purchasing power of the Rupee. This decrease in the purchasing power demolishes the argument of the increase of the average income per head. This equally answers the argument of the rise in the standard of comforts. We do not perceive such a general rise in the standard of comforts. In normal times, those who live from hand to mouth lapse into abject helplessness in hard times. There is then the extreme poverty of the people, and it is dangerous to minimize or belittle its real extent. It is a great destructive canker at the very bases of the Indian Society and the sooner it is removed the better for the rulers and the ruled.

## वऱ्हाड

हवामान— या सप्तकांत पावसानें अगदीं त्राहि त्राहि करून सोडलें. पिकांची मोठी नासाडी झाली आहे. सामान्य ताप खोकला वगैरे आजार वाढलेच आहेत, परंतु प्लेगाच्या वृद्धी विषयीं मोठी भीती पडली आहे. ईश्वराची मर्जी खरी! काल पासून ऊन पडलें असून हवा लवकर चांगली होईल असा रंग दिसता.

मि० प्राइस साहेब एक्स्ट्रा असि० कमिशनर यांनीं गेल्या शनिवारीं येथील स्माल काज कोर्टाचा चार्ज घेतला. आणि रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. ए० असि० कमिशनर यांची स्वारी दोन तीन दिवसांत यवतमाळाकडे जाणार आहे.

कुमार श्री हरभामजी रावजी डेपुटी कमिशनर साहेब यांची स्वारी किरकोळ रजेवरून काल रोजीं परत आली.

रद्द झाली–– प्लेगाची वर्दी न दिल्याबद्दल मे० तहशिलदार, बाळापूर यांनीं फार कडक शिक्षा दिल्याचें आम्ही मागें लिहिलें होतें. चौकशी बरोबर न झाल्याच्या कारणानें ती शिक्षा अपिलांत रद्द झाली हें उत्तम झालें. पण या खटल्यावरून प्लेगाची वर्दी देण्याविषयीं लोकांनीं अवश्य काळजी घेण्यास शिकलें पाहिजे.

औद्योगिक मंडळी–कुमार श्री हरभामजी यांच्या आश्रयाखालीं स्थापित झालेल्या औद्यागिक मंडळीची सभा येत्या २२ सावे तारखेला सकाळीं ७ वाजतां भरणार आहे. त्यावेळीं या मंडळीच्या कायदेकानूचा खर्डा मंजूर करण्यांत येईल.

### नोटीस

परशराम वल्लद संभाजी सळोकार कुणबी राहणार आकोट यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं अजमास १० दाहा वर्षे झालीं तुमची आणि माझी दलालीचे व्यापारांत शेराकत आहे. दरसाल हिशाचा पैसा संवत १९५६ या साल पावतो चुकते हिशोब दिले आहेत. तो जमाखर्च वहीवर आहेच. संवत १९५७ तथा १९५८ ह्या दोन सालचा हिशोब अद्यापपावेतो केला नाहीं व पैसाही दिला नाहीं. तुह्मी माझे नातलग साक्षात आतेबंधु व दाहा वर्षां पासून शेराकतदार आहा, यामुळें आतां पावेतो तुमचेकडेस पैसा ठेवला. आज उद्या एक दोन दिवसांत हिशोब करून पैसा देतों असें सांगितलें. सालमजकरी सुरू हंगामापासून तारीख १०।१२।१९०२ इ० पावेतो मागून दरसाल चालत आल्या प्रमाणें मी काम करीत आलों, सदहू तारखेस तुह्मी सांगितलें कीं आज तारीख पावेतो तुह्मी माझे हिशेदार होते. आतां लायसेन्स घेऊन स्वतंत्र दलाली करावी. सबब ह्या नोटीशिनें असें कळवितो कीं, मागील दोन सालचा हिशोब करून माझे हिश्याचा पैसा व सालमजकुरी तारीख १०।१२।१९०२ इसवी पांवतो हिशोब करून माझा पैसा मला द्यावा. याकरितां नोटीस पावल्यापासून ८ दिवसाची मुदत दिली आहे. असें करण्यास चुकूं नये. जर तुमचे कडून मुदतीचे आंत असें न होईल तर कोर्ट मार्फत व्याज व खर्चासुद्धां पैसा घेतला जाईल. असें खास समजावें. शिवाय सालअखेर न होतां मध्येंच अर्धवट हंगामांत हिस्सा काढल्याचे सांगितलें त्या अर्थी ह्या सालास जी नुकसान उत्पन्नाची होईल ती तुमचे जवळून भरून घेतली जाईल. कळावें. ता. १४।१२।०२ इ०

सही

शिताराम वल्लद भोनाजी महाले,

राहणार आकोट दस्तुर खुद्द.

### नोटीस

वेशमी मारुती वल्लद बापूजी कोळी रहाणार हातरून ता० बाळापूर यांस:––

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमची शुद्धवऱ्हाडी पत्रांतील नोटीस पोंचली त्यांतील, मजकूर मला मान्य नाहीं. तुह्मी माझ्याकडे आपली शेती ६-२-९९ रोजीं माझ्याकडे १०० रुपयांस ताबेगहाण ठेवली, व्याजा ऐवजीं पीक मीं घ्यावें ही गोष्ट खरी आहे. परंतु दुष्काळाच्या सालीं ह्मणजे १३०९ फसली साली ते शेते तुह्मी वहितीला घेतलें. आणि ते रुपये दिले नाहींत. ह्मणून ५० रुपयाचा कर्जरोखा लिहून दिला. तेव्हां पहिल्या सालाचे व्याजाचे रुपये अजून येणें आहेतच. १३१० सालीं आह्मीच शेत वाहिलें तेव्हां दुसऱ्या सालच्या व्याजाचा पैसा तुह्माकडे येणें नाहीं. १३११ सालीं तुह्मी शेत वाहवयाला घेतल्यामुळें स्वामित्वाचे पैसे तुह्मी अजून दिले नाहींत. चालू सालीं मीच शेत वाहिलें ह्मणून चवथ्या सालच्या व्याजाचे पैसे तुह्माकडे येणें नाहींत. तुह्मी चार लोक मध्यस्ती घातले ह्मणून नथमल डालुराम सावकाराच्या समजावणी वरून मी पहिल्या व तिसऱ्या सालाबद्दल तुह्माकडून येणें असलेल्या रकमेचा निकाल १०० रुपये घेऊन करण्याचे ठरविलें. आणि तुमचा आमचा असा ठराव झाला कीं, मुद्दल रुपयें १०० आणि मागील ठरावाचे रुपये १०० मिळून २०० रुपये तुह्मी दिल्यावर तुह्मास शेत खालीं करून द्यावें. पण या ठरावा प्रमाणें तुह्मी २०० रुपये आज ८।९ महिने होत आले अजून आणून दिले नाहीत. तर मागील ठरावा पैकी १०० रुपयावर तुह्माला. दोढी त्रा प्रमाणें व्याज द्यावे लागेल. या व्याजाची रकम आणि १०० रुपये नोटीस पोहचल्या पासून ८ दिवसाचे आंत आणून पोहचते करावें. ह्मणजे तावे गहाणाचा हक्क सुटेल नाहीं तर ९ वर्षे पुरी होई पर्यंत तावे गहाणाचा हक्क सोडला जाणार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. कळावे. तारीख १४।१२।१९०२

सही

गणपत गंगाजी नाथ राहणार

हातरूण. दस्तुर खुद्द.

## नोटीस

वेशमी नैनसुक बलदेव मारवाडी राहणार आकोला ताजनापेठ यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, तुह्मी ताजनापेठेंतील माझ्या मालकीचे लोलेश्वराचे नजीक जागेवर सुमारे चार वर्षांपासून भाड्यानें राहून घोडे बांधीत असता व त्याच ठिकाणीं तुह्मी लोहारखान्याचें काम चालवीत आहा. पण मी पांच सहा महिन्यापासून तुह्मांस समक्ष तोंडीं सांगत आलों कीं मी ती जागा दुसऱ्यास भाड्यानें देण्याचें ठरविलें आहे व ह्मणून तुह्मी ती जागा खालीं करून द्यावी. व भाड्याचा हिशोब चुकता करून टाकावा. तुह्मी जागा खालीं करून देतों असें नुसतें सांगतां पण मुळींच करीत नाहीं. तुमची कांहीं दिवस वाट पाहून जागा खालीं करण्याविषयीं एक हस्तलिखित नोटीसही दिली होती. पण तुह्मी तिलाही जुमानलें नाहीं. सबब जाहीर नोटिस देणें भाग पडलें. आतां ही नोटीस पोचल्या पासून आठ दिवसांत जागा खालीं करून द्यावी. आणि भाड्याचा हिशोब करून सर्व राहिलेलें भाडें चुकतें करावें. मी तुह्मांला या जागेंत या पुढें ठेवूं इच्छित नाहीं. ती जागा मीं दुसऱ्यांस भाड्यानें दिली आहे. वरील मुदतींत तुह्मी जागा खालीं न कराल व भाड्याचा निकाल न कराल तर कोर्टामार्फत जागा खालीं करून घ्यावी लागेल, व भाड्याचे पैसेहि वसूल केले जातील. शिवाय कोर्ट मार्फत निकाल होई पर्यंत तुह्मांस नोटीस पावल्या दिवसांपासून त्या जागेचें भाडें दर महा १० रुपये पडतील. आणि मी ती जागा भाड्यानें दुसऱ्यास दिली आहे त्या बद्दल जें माझें नुकसान होईल तें, कोर्ट खर्च व या नोटिशीचा खर्च वगैरे सर्व तुह्मांस द्यावा लागेल. कळावें. तारीख ८ माहे डिसेंबर सन १९०२ इसवी.

सही
शेख इब्राहीम वलद महमद
अमीर कान्ट्राक्टर आकोला.
दस्तुर खुद्द.

---

विक्रीस तयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड - (सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट (सन १८८२ चा १० वा) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८८४.

दिवाणी आक्टसंग्रह- (यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ९०० ) किंमत टपाल खर्चासुद्ध २८८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.
नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

---

### मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नाव्हेल्स, सं० नाटकें व तत्वेवाईक विषयांसह घेतल्या मासांत निबंध.

नावें नोंदण्यास लिहा. बि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० हं० सह आगाऊ १।.

पत्ता– के. डी. फोटो आर्टिस्ट
वर्धा सी. पी.

---

*K. N. ESMAYAL & Co.*

याची अनेक रोगांवरील जग प्रसिद्ध २७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजानुरा इस्मायल
आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.

---

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या शास्त्रीय औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जड अन्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ०६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दर:—

३५ गो० १ रु०; ७५ गो० २ रु०
११५गो० ३ रु० १६५गो० ४ रु०;
२७५गो० ६ रु० ५५०गो० १०रुपय.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. प. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे रात्रंदिवस आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूंस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावी.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.

---

## खरेदी करा !


### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. यानकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉन्ट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांत हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों आमची

**रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कोप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

### इनॅमलमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपनफेस............२०
१९ ,, हंटिंग....................२०
१४ ,, रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग....................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ....................४९
लेडीज वॉचीस १४. १८, क्यारटगोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.
ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचसचे
सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

REGISTERED N. No.

साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास........................ ६४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस .... ......०१

Six monthly ........3 ............. 8
Single copy ........................ 4
Advertisement
below 10 lines ...... 2
Per line over 10 ......4
Repetition Per line ...3

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 22 DECEMBER 1902 NO 49

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २२ माहे डिसेंबर सन १९०२ इ० अंक ४९

## प्रभुत्व प्रभुलाच द्या. मनुष्याला देऊं नका.

(४६ व्या अंकावरून पुढें.)

नंबर (३)

जें सत्य आहे तें चिरकाळ टिकेल. पण सत्य कथन करण्यास विघ्नें फार ह्मणून असत्याचीच बहुधा प्रवृत्ति असते. सत्य सदोदित गोड असतेंच असें नाहीं. आणि तत्काळ मोहपाशांत बद्धकरून टाकण्याची गोडी किंवा सामर्थ्य असत्याचे अंगीं फार असतें, ह्मणून ही असत्याची प्रवृत्ति फार. असत्याची माधुरी पुढें होते आणि कडूपणास मागें लोटिते तरी शेवटीं आशेचा भंग तोच करितो. असत्याचा वेग आणि तेज इतकें असतें कीं त्या पुढें सत्य नकोसें वाटतें. तरी शेवट पर्यंत सत्य असतें तेंच टिकतें व हितकारी होतें. असत्य ह्मणजे भ्रांति व सत्य ह्मणजे ज्ञान होय.

मनाची हौस किंवा आवड अथवा शक्ति किंवा भावना, असते तिच्याशीं सत्य केव्हां केव्हां ऐक्यांत असतें, तरी बहुधा तें द्वैतांत राहतें. ह्मणजे आवडी प्रमाणें नेहमीं सत्यास्थिति असते असें नाहीं, पण बहुधा ती नसते असें आहे हौस असते तशी सत्यस्थिति नसेल तर ती ऐकावयास गोड वाटत नाहीं. मनाला वाटतें कीं, वास्तव प्रकार जसा आहे ह्मणतात, तसा नसता तर बरें होतें. असें वाटून होसेनें उत्पन्न केलेल्या मृगजळा मागें ते धांवतात, पण, अर्थात तृषा कांहीं शांत होत नाहीं. कोणा कोणास वाटतें कीं, अप्रिय सत्य जर एकदम समजेल तर तें मान्य आहे, पण भ्रांतिमय गोड आशा आपणास नकोत. अशा लोकांचें पुष्कळ हित झालें आहे.

अयोध्याधीश दाशरथीराम, व द्वारकाधीश गोपाळकृष्ण, यांजवर आपलें मोठें प्रेम आहे खचित. हे देव होते असें प्रमाणांनीं सिद्ध व्हावें अशी आपली आवड आहे. आणि या आवडीच्या आड सत्य येईल तर ते सत्य आपणास नको आहे. पण सत्य नको ह्मटल्यानें त्या आवडीस दुराग्रहाचें ह्मणजे हट्टीपणाचें स्वरूप येतें. पण दुराग्रह व हट्ट हवासा वाटणें, आणि सत्य नकोसें वाटणें, हें कशाचें लक्षण आहे? असो.

* * *

पूर्वींच्या दोन लेखांत जें कांहीं सांगितलें त्यावरून भूगोल व खगोल यांच्या विस्ताराची व तुलनेची बरीच कल्पना आपल्या मनांत भरली आहे. आतां ही आपली पृथ्वी ह्या विराट स्वरूपांत कोणत्या जागीं आहे हें आपण शोधूं लागलों तर ह्या गोष्टीचा ठाव ठिकाण लागावयाचा नाहीं. कोणत्या तरी एकाद्या ताऱ्यावर (गोलावर, लोकांवर) उभें राहून पहावें ह्मणजे डोक्यावर आकाश दिसेल, व त्यांत असंख्य नक्षत्रें दिसतील, त्यां पैकीं हें एक नक्षत्र समजावें.

आतां, आपलें भरतखंड हें कांहीं विश्व नव्हे, पृथ्वी नव्हे, व चार खंडां पैकीं एक खंडही नव्हे. ह्मणून वर निर्दिष्ट केलेल्या विश्वाचें आदिकारण जो परमात्मा, तो आपल्या सामर्थ्याचें हेंच केंद्रस्थान करून येथें अवतीर्ण होईल व तुह्मां आह्मां क्षुद्र जंतूस विस्मयांत पाडण्या करितां लीला करून दाखवील आणि तेणें करून धन्यता मानील, हें युक्तीस, विवेक बुद्धीस, व प्रत्यक्ष प्रमाणास संमत नाहीं.

× × ×

रावणा सारखे, कंसा सारखे, व दुर्योधनासारखे दुष्ट असुर भूतमात्रास पीडा देतात ह्मणून भूभार हरण्याकरितां देव अवतार घेतो असें आपण ह्मणतों. पण पूर्वीं वर्णन केलें आहे त्या प्रमाणें विश्वस्वरूप ध्यानांत येतांच आपल्या ह्मणण्याची निःसारता कळून येईल. देवाला आपल्या कृतींत नवीन बंदोबस्त करावा लागत नाहीं. कां कीं तशी योजना उत्पत्ति काळींच त्यानें करून ठेविली आहे. ती योजना आपलें कार्य करिते व वस्तुमात्रास त्या त्या परिणामाप्रत पोंचविते. मानवांला विस्मित करण्याला देखील नवीन खटपट त्याला करावी लागत नाहीं. त्यांस विस्मित करण्यास सूर्यचंद्राचीही गरज नाहीं. गवताच्या काडीपासूनही, ही विस्मितता आपणांस प्राप्त होईल, ज्ञान मिळेल व आपलें कर्तव्य समजेल. एखाद्या सचेतन अथवा अचेतन वस्तूंत प्रवेश करण्याचा देवाला गरज तरी काय? पण तशी गरज पडणें संभवनीय असेल तर अनेक कारणामुळें मनुष्यशरीरांत प्रवेश करण्यापेक्षां सूर्यासारख्या विशुद्ध तेजोराशींत तो प्रवेश करील हें अधिक संभवनीय आहे.

× × +

या पृथ्वीवर देव जेव्हां हत्तीची जात उत्पन्न करितो, तेव्हां तीस हत्तीचाच स्वभाव, हत्तीचेंच सामर्थ्य, व हत्तीचीच बुद्धि देतो. या प्रमाणेंच व्याघ्रादिक उग्र वृत्तीचे पशु, व निरुपद्रवी जीवजंतू यांची गोष्ट समजावी. आंब्याच्या वृक्षास फणस किंवा कडू भोंपळे लागत नाहींत, व बाभळीच्या झाडांस द्राक्षांचा बार येत नाहीं. त्यांची अंतर्बाह्य रचना तत् तत् धर्मानुसारच असते. त्यांच्या अंतर्भागांत विरुद्ध गुण लपवून ठेविला नसतो. मनुष्याचेंही असेंच आहे. ह्मणजे बाहेर दिसण्यांत मनुष्याचें सोंग, आणि आंतील अंगास पक्ष, राक्षस अशी रचना नसते. देवाचे हे अबाधित नियम आहेत. जेव्हां विचार जागृति नसते, तेव्हां मनुष्यांच्या आकृतींत देव अथवा दैत्य आणि वृक्षपाषाणांच्या आंत यक्ष किन्नरादिक आपण पाहतों. पण या प्रकारास अज्ञान, आणि अज्ञानाचें अज्ञान हीच संज्ञा शोभते.

\+ × ×

श्रीरामचंद्रासारखे, श्रीकृष्णा सारखे, व युधिष्ठिरासारखे, सूर्यवंशीय व सोमवंशीय राजे, आणि ज्ञानवान ऋषि, यांस देव मानिल्यामुळें, मनुष्यें बुद्धिहीन, पराक्रमहीन, व कर्तव्यशून्य झालीं आणि अनर्थ परंपरे खालीं चिरडून गेलीं. असें नसतें तर या पुण्यश्लोकांचे अनुकरणाचा अभाव कां होता, व कालानुरूप नियम व शास्त्रें करण्याची शहाण्या व दूरदर्शी ऋषींची परिपाठी कां मोडली असती.

एक वेळ असत्याचा आश्रय केला ह्मणजे कोणत्याहि क्रमांत किती विसंगतपणा येतो व मनुष्य कसा पेंचांत पडतो, हें सर्वांस समजण्यायोग्य आहे. ज्यामुळें तो विसंगतपणा जाईल व पेंच नाहींसा होईल तें सत्य.

\+ × ×

वरील पुण्यश्लोक राजांस देव समजून चालल्यानें कसा विसंगतपणा उत्पन्न होतो, व आश्चर्य तें आश्चर्य नव्हत, हर्षशोक तो हर्षशोक नव्हे, उत्साह तो उत्साह नव्हे, असें होऊन आपली अवस्था ठकलेल्या माणसा सारखी कशी होते हें दाखविण्यास रामायणांतील कांहीं गोष्टी आपण येथें घेऊं. त्याच पुण्यश्लोकांस आपण मनुष्यदृष्टीनें पाहिलें ह्मणजे हें अनियमित समीकरण सोडविणें किती सुलभ जातें व आपलें इष्ट कसें साधतें तेंही या कथांवरून समजेल.

× × ×

रामलक्ष्मण लहान असतांच त्यांस मखरक्षणार्थ विश्वामित्रानें मागून नेलें. वाटेंत त्या सुकुमार बालकांनीं जिचें वर्णन रघु-वंशसर्ग ११ श्लोक १५।१६ यांत :—

"ज्या निनादपथ गृण्हती तयोः प्रादुरास बहुलक्षपाछावि॰ ॥ ताडका चलकपालकुंडला कालिकेव निबिडा बलाकिनी ॥ १५ ॥ तीव्रवेगधुतमार्गवृक्षया प्रेतचीवरवसा स्वनोग्रया ॥ अभ्यभावि भरताग्रजस्तया वात्ययेव पितृकाननोत्थया ॥ १६ ॥

अथवा

त्यांच्या चापरवास ऐकुनि तईं ये
ताटिका शीघ्र ती ।
जी कां काळिकभिन्न कर्ण युगुळीं
मुंडें जिच्या हालती ॥
आकाशीं निबिडा घनावलि जशी
काळी बकीं वेष्टित ।
येते गर्जत तत्समान दिसली ही
राक्षसी निश्चित ॥ १५
जीच्या तीव्रजवें पथांतिल तरू
कांपावया लागले ।
प्रेतांच्या वसनें जिणें निज वपू
विक्राळ गुंडाळिलें ।
उत्पन्ना पितृकाननीं बहु जशा वाम पाी
तेथवां
ती रोधी रजनीचरी निजबळें रामामधें
राघवा ॥ १

असें केलें आहे, ह्मणजे जिच्या स्वरूपाल ढगांच्या राशीची उपमा दिली आहे ताटकेचा वध केला, ह्मणून त्यांच्य धैर्याचें, रामतेजाचें, व उत्तम शिक्षे गौरव करण्यास व त्यांचे धन्यवाद गा लागण्यास तुह्मी जाल तों कोणी त तुमच्या कानांत सांगेल कीं ते देव होते हें ध्यानांत आणों!

जनकाच्या सभामंडपांत त्यांस विश्वामित्र घेऊन गेला. जनकानें प्रचंड दुर्धर चापाचा पण लाविला होता, ते आठवून व रामाची रम्य पण कोमल मूर्ति पाहून जनक दुःख विव्हल होऊन ह्मणाल हाय हाय! असा जांवई आपणांस कस मिळणार! जनकाच्या दुःखानें तुह्मी दुःखी व्हाल, तर कोणी तरी तुह्मास इशार देईलच कीं तो जीवन्मुक्त व विदेही होत हें ध्यानांत धरा!

कैकेयीनें युद्धांत मोठा पराक्रम केला तेव्हां अबला ह्या समजुतीनें तिची तारीफ करावयास जाल, व तिनें रामाकरितां वनवास आणि भरता करितां राज्य मागितलें ह्मणू संतापून तिला निर्दय व निष्ठुर मानावयास लागाल, तर तुह्मास ह्मणतील कीं, कैकेयी, व जिच्या पोटीं साक्षात भगवान अवतरले ती कौसल्या, ह्या कोण होत्या हें तुह्मी विसरलां वाटतें.

बरें, कैकेयीच्या निष्ठुरपणामुळें दशरथानें प्राण सोडिले, हें ऐकून तुह्माला अत्यंत दुःख वाटेल कीं वृद्धापकाळीं मोठा यज्ञ करून संपादिलेल्या ईश्वरप्रसादानें ज्यानें पुत्र लाभाचें किंचित सौख्य अनुभविलें तितक्यांत पुत्रवियोगदुःखानें माशा प्रमाणें तळमळून प्राण सोडावे हें त्याचें केवळ दुर्भाग्य! तोंच कोणी तरी त्यांच्या पूर्व संकेतांची तुह्माला आठवण देईल! तेव्ह असें मानावें लागेल कीं, दशरथानें हें स वर वर केलें व प्राणांचा देहाशीं वियोग होतांना जी यातना जीवांस होत असेल ती खरोखर त्यास झाली नसावी. आणि असें समजणें भाग पडेल कीं, असल्या हृदयभेदक कथा ऐकून श्रोत्यांच्या मनास शंकू प्रमाणें दुःख टोंचतें, व हर्षशोकादि विकारही प्रसंग परत्वें, स्वभावेंच त्यांच्या हृदयांत उत्पन्न होतात, व त्यापासून ते बोध घेतात तसा बोध घेण्याचें हें स्थळ नव्हे. का हे सर्व पूर्व संकेत होते, व जें जे दिसलें ते सगळें दंभ होतें. रामायणांत अशीं स्थळें

अनेक आहेत. सारांश, हा सर्व भूतचेष्टा पाहून, कोणी माणूस भांबावून जाऊन, भ्रमाच्या जाळ्यांत असा अडकेल कीं, त्यांतून त्याची सुटका होणें दुरापास्त. आणि अडकेल तरी कसा ? सगळे ह्या जाळ्यांत अडकलेलेच आहेत. ह्यांच्याशीं युक्तीनें वाद करून त्यांची समजूत घालण्याचें काम दुर्घट दिसतें. काय हा गोंधळ !

× × ×

वर नामनिर्देश केलेल्या राजांची "देव" या पदवीनें योग्यता किती होती हें मापून सांगण्यास आमच्या जवळ साधनें नाहींत, पण मनुष्य या पदवीनें तिजविषयीं कांहीं सांगतां येईल. तें हें कीं, विद्यमान काळीं जे कोणी बुद्धिमान, पराक्रमी, व प्रजावत्सल भूमिपाळ असतील, व जे चतुर आणि कार्यदक्ष मंत्री असतील, आणि न्यायनीतिनिपुण पंडितवर्य असतील, त्यांची योग्यता एकत्र केली तर ती यांच्या योग्यते बरोबर येईल.

× × ×

गुणवानांची तारीफ गुणज्ञ, परीक्षक व रसिक जनांनीं थोडी केली तरी पुरते, पण अज्ञान्यांनीं गुणवानांच्या डोकीवर स्तुतीचा पाऊस पाडला तरी तो त्यांस नकोसा असतो.

\+ × ×

" ह्या नृपवर्यांस देव ह्मणून आह्मी त्यांची भक्ति करितों व त्यांस मान देतों " असें लोक ह्मणतील तर ह्मणोत, पण त्यांची योग्यता ते जाणत नाहींत. ह्मणूनच ह्यांच्या योग्यतेनुरूप यांच्या कडून त्यांस मान मिळत नाहीं. त्यांची योग्यता, अंध भक्तीनें लोक समजतात त्याहून फार मोठी आहे हें दाखविण्याचा या लेखाचा हेतु आहे.

सर्व शक्तिमान परमेश्वर, ज्याच्या स्वरूपाची कांहीं कल्पना यावी ह्मणून या लेखांत एकठिकाणीं प्रयत्न केला आहे, त्याच्या तुलनेनें या राजांची योग्यता कांहींच नाहीं ही तुलना करूं जाणें हें कृतघ्नच अपराध आहे, असें जरी आहे, तरी त्यांची स्वतंत्र योग्यता किती थोर आहे तें वर दाखविलें आहे.

वि.

( अपूर्ण )

---

## वऱ्हाडसमाचार

मित्ती मार्गशीर्ष वद्य ९ शके १८२४

---

## तहनामा

( वऱ्हाड प्रांताची वहिवाट )

वऱ्हाड प्रांताची वहिवाट सन १८५३ पासून ब्रिटिश सरकाराकडे आहे हीच वहिवाट ब्रिटिश सरकाराकडे कायमची करण्यांत आली. पुष्कळ दिवसापासून ज्या गोष्टीचा खल चालू होता ती एकदां शेवटास लागली ही आनंदाची बातमी आहे, हा नवीन तहनामा तारीख ५-११-०२ रोजीं झाला आणि त्याला तारीख १६ डिसेंबर रोजीं इंडिया सरकारची अखेरची मंजुरात देण्यांत आली.

हा नवीन करार ब्रिटिश सरकार व हैदराबाद दरबार यांच्यां मध्यें झाला असून त्या करारावर ब्रिटिश सरकारा तर्फे, लेफ्टनेंन्ट कर्नल सर. बार साहेब यांची सही असून निजाम सरकारचे वतीनें महाराज किसनप्रसाद बहादूर दिवाण साहेब यांची सही झाली आहे. या कराराच्या उपोद्घातांत असें लिहिलें आहे कीं, ता. २१ मे. १८५३ व ता. २६ डिसेंबर १८६० या दोन तारखांच्या तहनाम्याअन्वयें हैदराबाद कॉंटिजंन्ट फौजेच्या खर्चा निमित्त वऱ्हाड प्रांत ब्रिटिश सरकाराकडे वहिवाटीला होता आणि राज्यकारभाराचा खर्च वजा जातां जी शिल्लक राही ती निजाम सरकारला दिली जात असे. पण ह्या वहिवाटींत सुधारणा करण्या करितां आणि वऱ्हाड प्रांताचा राज्यकारभार स्वतंत्रपणें ठेवल्यामुळें व तसेंच हैदराबाद कॉंटिजंट फौज निराळी स्वतंत्र ठेवल्यामुळें खर्च अधिक पडत असे तो कमी करण्या करितां, आणि तसेंच दरसाल ह्या प्रांतापासून निजाम सरकाराला जी शिल्लक ह्मणून देण्यांत येत असे तो अगदीं अनिश्चित व कमजास्त होणारी होती ह्मणून एक निश्चित रकम मुकरर करून निजाम सरकारचा विशेष लाभ करण्यासाठीं खालील अटीवर नवीन तह करण्यांत आला आहे:-

( १ ) या अमानी मुलुखावर निजाम सरकारची राजसत्ता आहे असें ब्रिटिश सरकारांनीं पुन्हां कबूल केलें आहे. निजाम सरकारांनीं हा प्रांत ब्रिटिश सरकाराला कायमच्या कौलपट्ट्यानें दिला आहे आणि निजाम सरकाराला दरसाल २५ लक्ष रुपये या पट्ट्यांतील स्वामित्वाबद्दल दिले जातील.

( २ ) १८५३ व १८६० च्या तहाप्रमाणें या अमानी मुलुखावर एकट्या ब्रिटिश सरकारचाच अंमल व अधिकार पूर्णपणें चालत आलेला आहे, व तो तसाच चालू राहील आणि या दोन्ही तहांतील कोणत्याहि विरोधी कलमांचा बाध न येतां, यापुढें ह्या प्रांताचा कारभार ब्रिटिश सरकारास योग्य वाटेल तसा करितां येईल आणि १८५३ च्या तहांतील ३ रे कलमा प्रमाणें निजाम सरकारच्या राज्याच्या सुरक्षितपणासाठीं योग्य ती तजवीज ठेवून हैदराबाद कॉंटिजंट फौजेची निराळी वर्गावर्गी करण्यास, फौजेची संख्या कमी करण्यास, व ह्या फौजेच्या कारभारा संबंधानें फेरबदल करण्यास ब्रिटिश सरकार पूर्णपणें मुखत्यार आहे.

---

## राजचिन्ह

वऱ्हाड प्रांतासंबंधानें नवीन तहनामा झालेला आहे आणि त्यांत ह्या प्रांताचें स्वामित्व निजाम सरकाराकडेच ठरण्यांत आलें आहे. पण वऱ्हाड प्रांत कायमचा ब्रिटिश सरकारच्या हवालीं केल्यामुळें निजाम सरकारच्या प्रभुत्वाच्या खाणाखुणा कांहींच शिल्लक राहण्याचा संभव नाहीं, आणि यापुढें कालगतीनें 'अमानी मुलुख' हीहि संज्ञा लोकांच्या आठवणींतून जाईल. तथापि ब्रिटिश सरकारची अशी पूर्ण मर्जी आहे कीं, निजाम सरकारचें स्वामित्व ह्या प्रांतांत चिरकाल चालावें. हें स्वामित्व दरसाल दिल्या जाणाऱ्या २५ लक्षांच्या रकमेनें व्यक्त होतच आहे, पण एवढ्याच गोष्टीवर ब्रिटिश सरकार थांबत नाहीं. ह्या रकमेच्या देववेवी शिवाय निजाम सरकारची राजसत्ता सर्वत्र लोकांच्या डोळ्यापुढें एक सारखी रहावी असा ब्रिटिश सरकारचा फार मानस आहे आणि ह्मणून निजाम सरकारचें स्वामित्व व्यक्त करण्यासाठीं एक निराळीच युक्ति योजण्यांत आली आहे कीं, वऱ्हाड प्रांताच्या मुख्य सदर ठिकाणीं निजाम सरकारचा बावटा दरसाल एक दिवस फडकत राहील, आणि हा दिवस ह्मणजे निजाम सरकारचा वाढदिवस होय. ह्याच दिवशीं निजामसरकारचे नांवानें तोफांची सलामी देण्यांत येईल. ही योजना खुद्द व्हाईसरॉय साहेबांनीं सुचविली असून वऱ्हाड प्रांताला अगदीं नवीन आहे. आणि अशी योजना दुसऱ्या कोणत्याहि प्रांतांत नाहीं आहे. यापुढें आमचे प्रांताचें राजचिन्ह वर लिहिल्या प्रमाणें दरसाल एक दिवस दाखविण्यांत येईल.

ही वरील युक्ती योजतांना ब्रिटिश सरकारनीं निजाम सरकारचा प्रेमळपणाहि लक्ष्यांत घेतला आहे. वऱ्हाड प्रांताच्या प्रश्नाचा विचार करितांना निजाम सरकारांनीं चांगला स्नेहभाव दाखविला आणि सरकारची इच्छाहि फारशी न मोडतां दोन्ही सरकारच्या सलोख्यानें हा प्रश्न लौकर निकालास लाविला. ह्या नाजूक प्रकरणीं जो प्रेमळपणा निजामांनीं व्यक्त केला त्याचा गौरव करण्या साठींच हीं वरील राजचिन्हें त्यांस ह्यांनीं आपण होऊन अर्पण केलीं आहेत.

हें नवें राजचिन्ह निजाम सरकारास चांगलें आवडो असें आह्मी मनापासून इच्छितों. या प्रांतावरील निजाम सरकारची सत्ता अगोदरच नामशेष उरली होती तेव्हां तिला या योजनेनें फार शोभा येईल हें उघड आहे. लार्ड कर्झन साहेबांच्या या अप्रतीम युक्ती बद्दल निजाम सरकार जितके उतराई होतील तितके थोडेंच आहे. ह्या नव्या राजचिन्हाच्या देणगीबद्दल निजाम सरकार हे लार्ड कर्झन साहेबांचे धन्यवाद गातीलच पण स्वतांसहि एका प्रकारें कृतकृत्य व धन्य समजतील असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

---

## बिल्हेवाट

वऱ्हाड प्रांता निमित्त २५ लक्षांची रक्कम निजामास द्यावी ह्मणून नवीन ठराव झाला आहे, त्या अन्वयें ही रक्कम दरसाली एप्रिलच्या १ ले तारखेस देण्यांत येईल. ही रकम देतांना ब्रिटिश सरकारनीं आपलें कर्ज वसूल करण्याची नामी युक्ती काढली आहे. ही युक्ती काढतांना देखील ब्रिटिश सरकारांनीं निजाम सरकारावर मोठे उपकार केले आहेत. निजाम सरकाराकडे आज मित्तीस ब्रिटिश सरकारचें ३ कोटी ९५ हजार ६०८ रुपये कर्ज आहे, त्याची फोड अशी:—

प्रत्यक्ष वऱ्हाड प्रांतासंबंधानें १ कोटी १६ लक्ष ९५ हजार ६०८ रुपये आहेत, आणि हैदराबाद दरबारला ह्मणून दिलेलें कर्ज १ कोटी ८५ लक्ष आहे. हीं दोन्हीं कर्जें व्याजानें आहेत. वऱ्हाड प्रांताचें कर्ज ह्मणजे गेल्या दुष्काळांत ब्रिटिश सरकारनें दिलेलें कर्ज होय. हीं कर्जें सव्याज फेडून घेण्याची व्यवस्था ब्रिटिश सरकारनेंच करून दिली आहे. ती अशी कीं, २५ लक्षांपैकीं १० लक्ष रुपये रोख निजामास द्यावेत. बाकीच्या १५ लक्षां पैकीं ७ लक्ष वऱ्हाडच्या कर्जांत वजा करावेत आणि ८ लक्ष हैदराबाद दरबारच्या कर्जाच्या फेडींत घ्यावेत. या ८ लक्ष शिवाय निजाम सरकारनीं दरसाल ३ लक्ष रुपये आपल्या खजिन्यांतून रोख देण्याचें ठरविलें आहे. म्हणजे एकंदर ११ लक्ष दरबारच्या कर्जाचें फेडींत द्यावयाचे आहेत. हा वजावाटीचा व्यवहार सुमारें तीस वर्षें चालेल. ही वजावाट मोठी ध्यानांत धरण्यासारखी असून ब्रिटिश सरकारांनीं निजाम सरकारावर कर्जाचा बोजा एकदम फार पडूं नये ह्मणून मुद्दाम योजिलेली आहे. दरसाल १० लक्ष रोख द्यावयाचे व ३ लक्ष परत घ्यावयाचे असा द्राविडी प्राणायाम करण्याचा मुद्दा असा दिसतो कीं, निजाम सरकारनीं ब्रिटिश कृपाळूपणा विषयीं पूर्ण आदरबुद्धि ठेवावी आणि ह्मांना आपल्या राज्याच्या खजिन्या संबंधानें वसूल बाकीचे आकडे नीटपणें कळावेत.

वऱ्हाडचें कर्ज १ कोटी १६ लक्ष ९५ हजार ६०८ रुपयांचें आहे, ह्या कर्जापैकीं सुमारें ४० लक्षांची निजाम सरकारास सूटच मिळणार आहे. ही सूट अशी कीं, वऱ्हाडचा राज्यकारभार चालविण्यासाठीं नेहमींची ४० लक्षांची शिल्लक असावी लागते आणि नवीन तहनामा आक्टोबरच्या १ ले तारखे पासून अमलांत आलेला आहे तेव्हां त्या तारखेला जी शिल्लक असेल ती निजाम सरकारानें आपणांस मिळावी ह्मणून मुद्दाम विनंता केली होती. निजाम सरकारची ही मागणी युक्तिवादाला नीट नाहीं. कारण, निजाम सरकारांनीं हा प्रांत कांहीं सर्वथैव सोडला नाहीं आणि नवीन व्यवस्था फक्त राज्यकारभाराच्या सोयीसाठींच केलेली आहे. तो कारभार चालविण्यासाठीं नेहमींची शिल्लक ब्रिटिश सरकाराकडेसच असायास पाहिजे होती. तथापि हा वाद सरकारांनीं न घालतां निजाम सरकाराला तेवढी रक्कम सूटच दिली आहे. ही सूट वजा जाता बाकीचें ७६ लक्षांचें कर्ज देणें शिल्लक राहतें. दरसाल ७ लक्षा प्रमाणें फेड केली असता १४ वर्षांत वऱ्हाडच्या कर्जाची व्याजासुद्धां फेड होणारी आहे. ह्या १४ वर्षां नंतर दरसालची ही ७ लक्षांची रक्कम निजाम सरकारास देण्यांत येईल ह्मणजे १७ लक्ष त्यास मिळूं लागतील. हैदराबाद दरबारचें कर्ज १ कोटी ८५ लक्ष आहे हें फिटण्यास सांपतच्या व्यवस्थेनें २९ वर्षें लागतात ह्मणजे वरील १४ वर्षां नंतर १५ वर्षांनीं निजामास संपूर्ण २५ लक्ष मिळतील.

अशा बिल्हेवाटीनें कर्जाची वजावाट करून घेण्यामध्यें निजाम सरकारावर ब्रिटिश सरकारचे कोटिशः उपकार आहत. हे उपकार करण्याला मुख्य प्रोत्साहन ह्मणजे वऱ्हाड प्रांताचा निकाल ब्रिटिश सरकारच्या मताप्रमाणें लावण्यांत निजाम सरकारनीं दाखविलेली तत्परता होय. निजाम सरकार आपल्या मनात फार आनंद मानत असतील कीं, ह्या एवढ्या मोठ्या ३ कोटीच्या कर्जा निमित्त वऱ्हाडसारखा आणखी एखादा दुसरा

मुलुख निराळा तोडून मागितला नाहीं सर्व गोष्ट वऱ्हाडावरच संपविली ही खरोखर आनंद मानण्या सारखीच गोष्ट आहे.

The Berar Samachar

MONDAY DECEMBER 22 1902

The Industrial Exhibition at Ahmedabad promises to be the forerunner of a great national movement. Such a movement is of course destined to be successful and pregnant with the greatest possibilities of improving the material condition of this country. A movement of this nature derives an additional force of reviving the industrial greatness of this country when His Highness the Gaekwar of Baroda presides at its opening and lends to it the support and vigour which his august personality and his statesmanlike leadership are able to secure in the eyes of the public. The Ahmedabad Exhibition is the beginning of a great industrial future that will await us, provided we do learn the excellent lessons that His Highness practically writes down in his admirable inaugural speech. The Gaekwar is one of the most enlightened rulers of premier states in India and from his speech we get an insight into his deep convictions and his honest efforts at solving the great and momentous problem of the day. He is a great believer in the *industrial* greatness as the real and solid foundation of a nation. A nation that shows no signs of a prosperous industrial life must be a nation that is dead to all practical purposes. Take away the industry and the commerce of a nation, and we see that it is doomed to sink and die in no distant future. An industrial and commercial movement is really the life—pulse of a nation. Feeling this life—pulse of our nation we must admit that India has seen the worst days of her decline, and if our people do not read well, in the awakening of the day, a stern call to positive action we shall be extinct and effaced from the face of the world. So we must stir ourselves in right earnestness and the Gaekwar exhorts us to rise above the restrictions of bad customs and usages, to depend on self—help pure and simple and to make the most of the present opportunities. In this dismal state of Indian industries there is still a ray of hope; and the Gaekwar puts a suggestive question. "Can we not again claim to have had an important share in the establishment of that mighty structure—the Indian empire—erected indeed by the clear—sighted energy and practical genius of England but on the foundations of Indian patience, Indian blood and Indian capital?" In the answer to this question lies the real key of our future success. The Gaegwar goes the length of freely advocating the policy of protection for developing industries and commerce in India. The nascent manufactures of India need a solid protection from the Government; but the latter will not come to help us in time, when we stand in the need of such a relief. Unless and until, in the strength of self—reliance we assert our rights to demand a redress of our disabilities and disfranchises, all our hopes of future political life are dead and our government are deaf to our grievances. The moral of the Exhibition is that we must take to action and active cooperation and our difficulties will disappear as we face them boldy and try to secure by all possible means the revival of India as an industrial and commercial nation. We have the National Congress at our back to formulate the public opinion in this direction and we hope that the initiative which the Gaekwar has taken in this matter will infuse in the people the new spirit to rise to the greatness of the new awakening of a a national life.

---

The Final stage is reached in the history of the Hyderabad Assigned Districts. His Highness the Nizam leases them in perpetuity to the British Goverment and with this act there is an end to all discussions about the troublesome question of the restoration of Berar. It is only left to us now to welcome the changes that we shall have in store for us in the economic administration of the province as an adjunct of some big presidency as that of the Central Provinces. Here we reproduce below the agreement between His Highness the Naizam and the Faramount Government.

"Whereas by the Treaties concluded between the British Government and the Hyderabad State on the May 1853 and the 26th December 1860, the Berar districts were assigned to the British Government for the maintenance of the Hyderabad Contingent, the surplus, if any, from the Assigned Districts being paid to His Highness the Nizam.

And whereas the British Government and His Highness the Nizam desire to improve this arrangement.

And whereas it is inexpedient in the interests of economy that the Assigned Districts should continue to be managed as a seperate administration or the Hyderabad Contingent as a separate force.

And whereas it is also desireable that His Highness the Nizam should receive a fixed instead of a fluctuating and uncertain income from the Assigned Districts.

The following terms are hereby agreed upon between the Viceroy and Governor—General of India in Council and the Nawab Mir Sir Mahbub Ali Khan Bahadur Fateh Jung, Nizam of Hyderabad:—

(i) His Highness the Nizam, whose sovereignty over the Assigned Districts is re-affirmed, leases them to the British Government in perpetuity in consideration of the payment to him by the British Government of a fixed and perpetual rent of 25 lakhs of rupees per annum;

(ii) The British Government, while retaining the full and exclusive jurisdiction and authority in the Assigned Districts which they enjoy under the Treaties of 1853 and 1860, shall be at liberty, notwithstanding anything to the contrary in those Treaties, to administer the Assigned Districts in such manner as they may deem desirable, and also to redistribute, reduce, reorganise and control the forces now composing the Hyderabad Contingent, as they may think fit, due provision being made as stipulated by Article 3 of the Treaty of 1853 for the protection of His Highness's Dominions."

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— या आठवड्यांत पुष्कळ ठिकाणीं खंड वृष्टी झाली. वारंवार अभ्रे येतात. आणि त्यामुळें हवा बरीच बिघडली आहे. किरकोळ रोगराईचें मान अधिक आहे. मागील पावसानें खरीपाच्या पिकाची बरीच नासाडी झाली.

सुट्टी— येत्या तारीख २४ पासून तों जानेवारी ८ अखेर सरकारी कचेऱ्या बंद राहतील. ही मोठी सुट्टी नाताळची सुट्टी व राज्याभिषेकाची सुट्टी मिळून संबंध एका पंधरवाड्याची सुट्टी होय.

प्लेग—खामगांवास व शेगांवास प्लेगाचा आजार अद्याप कांहीं कमी नाहीं. ता. ६ दिसेंबर पर्यंतच्या आठवड्यांत अकोल्या जिल्ह्यांत १२१ लोक व बुलढाण्या जिल्ह्यांत १३३ लोक प्लेगानें मेले.

बाळापुरास शेगांवाहून व मुंबईहून कांहीं प्लेगाचे रोगी आले व त्या पैकीं ४–५ जण मरण पावले. ही गोष्ट गेल्या शुक्रवारीं घडली. तसेंच धामणगावांस प्लेग सुरू झाला असून उमरावतीलाही कांहीं प्लेगाचे रोगी आढळलें असें समजतें. बाहेरून येणाऱ्या लोकांमुळें हा रोग एकदा गावांत शिरला म्हणजे तो पुढें बाढवां वाढतां कायमचा होतो. अशा अनुभवामुळें दिवसानुदिवस प्लेगाच्या फैलावाची फार भीति वाटत आहे.

जन्म मृत्यु— गेल्या आक्टोबर महिन्यांत १६०७७ माणसें जन्मलीं व ११२९३ मरण पावलीं.

मि० शेख महमद इस्मायल साहेब ए० अ० क० हे आपल्या रजेंत मक्केच्या यात्रेला जाण्यासाठीं येथून आपल्या कुटुंबांतील माणसांसह मुंबईकडे गेले.

मि० महमद अबदुल कदुस तहशिलदार वर्ग ४ यांची तहशिलदारी काढून घेऊन खास कारकून केल्यामुळें तारीख ११ नोव्हेंबर पासून रा० रा० दत्तात्रय विठ्ठल सरंजामे बी. ए. यांस १५० रुपयांची कायमची तहशिलदारी मिळाली व त्यांच्या, ९० रुपयांच्या नायब तहशिलदारीवर रा. रा. रामकृष्ण अमृत देशपांडे यांस नेमिलें.

मि. महमद रहिमुतुल्ला तहशिलदार वणी यांनीं ता. २० डिसेंबर पासून २० दिवसांची हक्काची रजा घेतल्यामुळें त्या रजेंत रा. रा. रामकृष्ण अमृत देशपांडे यांस आक्टिंग तहशिलदार नेमण्यात आलें आहे.

मि. शाहा महमद इशाक ना० तहशिलदार जळगांव यांस तारीख २४ पासून २० दिवसांची हक्काची रजा दिल्यामुळें रा. रा. हरी बळवंत शहानवीस यांस नायब तहशिलदार केलें आहे.

रा० रा० हरी मोरेश्वर शेवडे प्रिन्सिपाल ट्रेनिंग कालेज आकोला हे तारीख १ जानेवारी पासून पेनशन घेणार असल्या कारणानें खालील प्रमाणें बदल्या करण्यांत आल्या आहेत:–

रा. रा. अनंत परशराम खरे दिपुटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांस १६० रुपयांच्या वर्गाची बढती मिळाली. रा० रा० रामचंद्र सदाशिव लेले बी० ए० हेड मास्तर यांस त्यांच्या प्रस्तुतच्या १२५ रु० पगारावरच दिपुटी इन्स्पेक्टरच्या लायनींत घेतलें आणि रा० रा० शिवराम हरी गोखले एम. ए. सेकंड असिस्टंट आकोला हायस्कूल यांस १२५ रुपयांवर दिपुटी इन्स्पेक्टर नेमून त्यांस ट्रेनिंग कॉलेजचे प्रिन्सिपाल केलें आहे.

कुमार श्री हरभामजी रावजी दिपुटी कमिशनर आकोला हे काल रोजीं दिल्ली-दरबाराला जाण्यासाठीं येथून रवाना झाले.

मिस्टर मौलवी महमद निजामुद्दीन हसनखान दिपुटी कमिशनर वर्ग ३ हे परत वऱ्हाडांत येत असल्या मुळें खालील प्रमाणें वर्गा वर्गी झाली आहे:—

मेजर आर. पी. कोलंब दिपुटी कमिशनर हे असिस्टंट कमिशनर वर्ग १ चे होऊन, मेजर एफ. आर. एम. सी. डी. आर. माडवी अ. क. वर्ग १ चे अ. क. वर्ग २ होऊन, मि. बी. क्ले. अ. क. वर्ग २ हे अ. क. वर्ग ३ होतील.

यंदाच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेला ३८८७ उमेदवार होते पैकीं ११०७ पसार झाले त्यामध्यें आमच्या वऱ्हाडांतील उमरावती हायस्कुलांतून २६ पैकीं १४ व प्रायव्हेट हायस्कुलांतून ७ पैकीं १ व आकोले हायस्कुलांतून १९ पैकीं ९ पास झाले. रिझल्ट एकंदर बरा झाला पण प्रायव्हेट हायस्कुलांतील लोकांनीं विशेष दक्षता ठेवणें अत्यंत जरूर आहे.

रा० रा० रामचंद्र नारायण देशपांडे बी. ए. ए. अ. क. हे गेल्या गुरुवारीं यवतमाळांस डिव्हिजन जज्जाच्या जागेचा चार्ज घेण्यासाठीं गेले. हे गृहस्थ ह्या जिल्ह्यांतील बहुतेक लोकांच्या चांगल्या परिचयाचे आहेत. यांची येथील ३।४ वर्षांची कारकीर्द सर्वांस फार पसंत पडली. यांचा लौकिक प्रतिवादी तर्फेचे न्यायाधीश असा आहे, तत्रापि मर्मज्ञ लोक यांच्या न्यायाला विशेष चाहतील. हे न्याय फार चांगला देत. व कोणत्याहि खटल्यांतील अंतर्गत गोष्टींचा शोध लावण्यांत ह्यांची चांगली हातोटी आहे. हे मोठ्या हुषार व अनुभवी असून लोकांस मोठ्या गोडीगुलाबीनें व ममत्वानें वागवीत.

आजच्या अंका संबोत वे. शा. सं. रा. रा. कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मुक्काम मुर्डी यांची जाहिरात वाटली जात आहे तिचा फायदा गरजू लोकांनीं अवश्य करून घ्यावा.

स्तुत्य देणगी— उमरावतीच्या प्रायव्हेट हायस्कुलाला रा. रा. लक्ष्मणराव दहिहांडेकर वारंजा यांनीं वीस हजार रुपयांची देणगी दिली आहे. अशा देणगी विषयीं करावी तितकी स्तुती थोडीच आहे!

लक्ष्य द्या— ४ थ्या पानावर पोस्टाची जाहिरात छापली आहे त्यांत ज्या लोकांना दिल्लीला पत्रें पाठविण्याचीं असतील त्यांनीं ही गोष्ट ध्यानांत धरावी कीं नुसती 'दिल्ली' हीं अक्षरें लिहिल्यानें दिल्ली दरबारला गेलेल्या मित्रमंडळींना पत्रें वेळच्या वेळीं मिळणार नाहींत. आणि अशी चूक होऊं नये म्हणून त्यांनीं दरबारला गेलेल्या मंडळींच्या पत्यावरील नांवाखालीं नुसतें दिल्ली असें न लिहिता 'दिल्ली दरबार' असा ठिकाणा लिहावा.

राष्ट्री

...ला प्रदर्शनाची संस्था काढली आहे.

## POSTAL NOTICE

*DELHI CORONATION DURBAR*

In order to facilitate the early delivery of postal articles intended for persons residing in any of the camps at Delhi during the Coronation Durbar, the public are requested to specify clearly in the address the name of the particular camp in which the addressee is residing and to add the words "Delhi Coronation Durbar" or "Delhi Durbar" as the *last* words of the address. It is particularly requested that the name of the post town "Delhi" may not be added as the last word of the address, as articles intended for the camp which are so addressed will in the first instance have to be sent to the permanent post-office at Delhi and will consequently be delayed.

H. M. Kisch,
Calcutta, 27/11/1902 } *Offg. Director-General of the Post Office of India.*

## पोष्टाची जाहिरात

दिल्ली येथील राज्यारोहण निमित्त भरणाऱ्या दरबारांत जे जे लोक जातील त्यांचीं पत्रें वगैरे लवकर व बिनचूक त्यांस मिळावीं ह्मणून सर्व लोकांस खालील सूचना करण्यांत येत आहे.

पत्रावर पत्ता लिहिते वेळीं ज्यास ते मिळावयाचे असेल ते गृहस्थ ज्या क्यांपामध्यें असतील त्यांचें नांव किंवा नंबर चांगलें सुवाच्य असून शेवटीं गांवाचें नांव "दिल्ली कॉरोनेशन दरबार" ( delhi coronation Darbar ) किंवा "दिल्ली दरबार ( Delhi Darbar ) असें असावें. कारण नुसतें दिल्ली असें लिहिल्यानें पत्रें तेथील मुख्य टपालांत पाठविलीं जाऊन तकासिमीस विलंब होईल. उदाहरणः—

रा. रा. राघोबा रतीराम,
क्यांप नंबर १०
दिल्ली दरबार.

का० ज० लालकाका.
डिपुटी पोस्ट मास्तर जनरल,
मध्यप्रांत आणि वऱ्हाड,

### नोटीस

मी खालीं सही करणार या जाहिर नोटिसीनें कळविते ते खालीं लिहिलेल्या प्रमाणें:-माझा नवरा नामें मारोती वल्लद जानजी पुंडकार राहणार मौजे पुंडा तालुके आकोट हा सुमारे १ १॥ वर्षांपासून देहभानावर नसून तो पिसा झाला आहे, सबब तो कोणत्या समयीं मजला बुडवील याचा नेम नाहीं, याजकरितां या जाहिराती नोटिसीनें कळविण्यांत येते कीं त्याचेसी साहुकार, भाऊबंद वगैरे सर्वत्र लोकांनीं घेण्या देण्याचे संबंध कोणत्याच प्रकारचा व्यापार करूं नये जर केला तर तो कोर्टात बातल समजला जाईल. माझे घेण्या देण्याची व शेतीची रकम भरण्यास माझा नवरा देहभानावर नसलेमुळें मी गोविंद जैराम भुईभार यास मुकत्यार नेमिले आहे. हें कळावें तारीख १६।१२।१९०२ इ.

सही
[illegible]जाई मर्द मारोती पुंडकरीण
चा कां[illegible] निशाणी बांगडी.

यांतील कलम ७ व
विद्यमान [illegible]
हेब सिव्हिल जज्ज अ

### NOTICE

The Indian Police Commission will visit Amraoti in January next. Any person resident in Berar who desires to furnish evidence to the Commission on the subject of its enquires is requested to apply to the undersigned, who will forward to him a copy of questions on the subject of the Commission's enquires. The replies to these questions should be forwarded to the Secretary with the least possible delay, and they should, in any case, reach him not later than the 25th December 1902. If, on a perusal of these replies, the Commission consider that it is desirable to examine the witness orally he will be informed in due course of the date of such examination.

All communications for the Commission should be addressed "The Secretary, Indian Police Commission, Camp" without the addition of any post-town.

Indian Police Commission Camp 24-11-1902 } (Sd.) H. A. Stuart. Secretary, Indian Police Commission.

( १००० चे वर दर आठवड्यास पाठविले जाते. )

### १० आणे ते किं० रु० १५ चें फुकट.

कंपनीचें दहा आण्याचें तिकीट विकत घ्या. त्याबरोबर रु० २॥ पाठवून ४ तिकिटांसह हक्काचे सरटीफिकीट मिळवा. ( किंवा एकदम तीन रुपये दोन आणे पाठवा. ) तीं चार तिकिटें दुसऱ्यास विकून आपले अडीच रुपये वसूल करून घ्या. विकत घेणारांकडून अगर तुमचे मार्फत प्रत्येक तिकिटासह रु० २॥ प्रमाणें एकंदर रु० १० पाठवून तिकिटांसह ४ सरटीफिकिटें व फुकट चांदीचे पॉकेट वॉच किंवा भिंतीस लावण्याचे ८ दिवसाच वाजणारे मोठ क्लॉक मागवा. अर्थात दहा आण्यांत १९ रु० चें फुकट !!!

जी. बी नाईक आणि कंपनी.
ठाकूरद्वार रोड मुंबई.

अति स्वस्त ! **ज्ञानविलास** अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभीं उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही. पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास,
खणदाळ, पो० गडइंग्लज;
इ० कोल्हापूर.

विक्रीसतयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

### कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड-आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी, सुद्धा रु. ३,

क्रिमिनल प्रोसिजर कोड - ( सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें ) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट ( सन १८८२ चा १० वा ) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८८४.

दिवाणी आक्टसंग्रह- ( यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चासुद्धां २८८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.
नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

K. N. ESMAYAL & Co.

यांची अनेक रोगांवरील जग प्रसिद्ध ३७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहुन कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजापुरा इस्मायल
आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.

### खरेदी करा !
### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस
### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसुन या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

होल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें
१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.
१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.
रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेलें ................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

आर्मन्ड स्टेल ३ वर्षांच्या ग्यारंटीचें
१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग....................२०
१४ ,, रिस्टवॉच....................१०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे
१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग............................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ....................४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी.
ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे
सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नाव्हेल्स, सं० नाटकें व तत्त्ववाईक विषयांसह येत्या मासांत निघेल,

नांवें नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० हं० सह आगाऊ १।.

पत्ता- के. डी. फोटो आर्टिस्ट
वर्धा सी. पी.

[illegible]५ सपेल
[illegible] मदरशाचा सरथा काढली आहे.

REGISTERED N. No. 4

सहामाही „ ३ „ ८
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास........................६४

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस........ ४१ ८१
दुसरे खेपेस.... ........८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as
Six monthly .........3 ............... 8 a
Single copy .......................... 4 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 29 DECEMBER 1902 NO 50

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २९ माहे डिसेंबर सन १९०२ इ० अंक ५०

### POSTAL NOTICE

*DELHI CORONATION DURBAR*

In order to facilitate the early delivery of postal articles intended for persons residing in any of the camps at Delhi during the Coronation Durbar, the public are requested to specify clearly in the address the name of the particular camp in which the addressee is residing and to add the words "Delhi Coronation Durbar" or "Delhi Durbar" as the *last* words of the address. It is particularly requested that the name of the post town "Delhi" may not be added as the last word of the address, as articles intended for the camp which are so addressed will in the first instance have to be sent to the permanent post-office at Delhi and will consequently be delayed.

H. M. Kisch,
Calcutta, 27/11/1902 } *Offg. Director-General of the Post Office of India*

---

### पोष्टाची जाहिरात.

दिल्ली येथील राज्यारोहण निमित्त भरणाऱ्या दरबारांत जे जे लोक जातील त्यांचीं पत्रें वगैरे लवकर व बिनचूक त्यांस मिळावीं ह्मणून सर्व लोकांस खालील सूचना करण्यांत येत आहे.

पत्रावर पत्ता लिहिते वेळीं ज्यास ते मिळावयाचें असेल ते गृहस्थ ज्या कँपांत रहावयाचे असतील त्यांचें नांव किंवा नंबर चांगलें सुवाच्य असून शेवटीं गांवाचें नांव "दिल्ली कॉरोनेशन दरबार" ( Delhi Coronation Darbar ) किंवा "दिल्ली दरबार ( Delhi Darbar ) असें असावें. कारण नुसतें दिल्ली असें लिहिल्यानें पत्रें तेथील मुख्य टपालांत पाठविलीं जाऊन तकसिमीस विलंब होईल. उदाहरणः—

रा. रा. राघोबा रतीराम,
कँप नंबर १०
दिल्ली दरबार.

का० ज० लालकाका.
डिपुटी पोस्ट मास्तर जनरल,
मध्यप्रांत आणि वऱ्हाड.

---

दिवाणी दावा नं. ७ क्लास नं. २१
१९०२

कोणी स्थावरनात्या होतो तेव्हां त्यानला कर्ज वसूल करण्या बद्दल सर्टिफिकिट देण्याचा कायदा. आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हिल जज्ज अ[illegible]ंचे कोर्टात

अर्जदार— गोरजाई उर्फ जीजी जवजे आपाजी राहणार कळंब बुा तालुके बाळापूर

सर्वांस या नोटीशिनें कळविण्यांत येतें कीं, वरिल अर्जदार यानें मयत बाळकृष्ण सिताराम याचे रघुनाथ नारायण वस्ती डोंगरगांव तालुके बाळापूर याजकडेस येणे असलेले कर्ज रुपये १६९८१० याचें कर्ज वसूल करण्याकरितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून तारीख १० माहे डिसेंबर सन १९०२ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व या अर्जाचे चौकशीची तारीख २४ माहे जानेवारी सन १९०३ इसवी रोजीं मुकर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजता तुह्मी अपले दस्तऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटीफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें म्हणे सहीनिशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख १० माहे १२ सन १९०२

V. N. Dandekar.
सिव्हिल जज्ज
आकोला.

---

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य ३० शके १८२४

---

### सुविचार

[ राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांच्या भाषणाचा भावार्थ ]

मि० फेरोजशहा मेथा यांनीं अध्यक्षाच्या नेमणुकी विषयीं पहिली सूचना केली. ही सभा ह्मणणे राज्याभिषेक सभाच होय. राज्यें मिळविण्याला जसें लष्कर पाहिजे तसे राजभक्तीची प्रेरणा करणारी या सभेसारखी विद्यादात्री पाहिजे. अशा या राज्याभिषेकाच्या मंगल प्रसंगाला अनुरूप असे अध्यक्ष बाबू सुरेंद्रनाथ बानरजी हे एकटेच आहेत. नंतर या सूचनेला अनुमोदनें व संमोदनें पुष्कळशी मिळाल्या नंतर अध्यक्ष आपल्या जागीं विराजमान झाले.

राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांची निवड टाळ्यांचा गजर व आनंदोद्गारांचा जयघोष चालूं असतांना झाली. अध्यक्षांच्या निवडणूकी विषयीं एक वाक्यताच नव्हे तर तिचा स्वीकार हर्षनिर्भरानें मी प्रथम केला असें दर्शविण्यासाठीं जणु कांहीं सर्व सभासदांमध्यें एक विलक्षण ईर्षा दिसत होती. या नंतर अध्यक्ष बाबू सुरेंद्रनाथ बानरजी यांची ती काळी सावळी वृद्ध मूर्ती बोलण्यास उभी राहली त्यावेळीं असा विचित्र भास झाला कीं वाग्देवीच त्या मुखांतून आपली अमृतवाणी बोलवीत आहे. हृदयंगम वाक्यरत्नें कर्णपथावर फार विरळा शोभतात. ती उत्कृष्ट विचारांची श्रेणी मनाला तल्लीन करून सोडते. देशाभिमान या विचारा बरोबर अंगांत संचरूं लागतो आणि राष्ट्रीय सभेच्या कार्यभारांत एक दिवस तरी घालवावा व आपल्या जन्माची सार्थकता करावी असा मनोमय सिद्धन्त ठरतो. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी याचें संभाषण ह्मणजे साक्षात् प्रेरणाशक्तीच होय अशा या उत्कृष्ठ भाषणाचा भावार्थ आह्मी आमच्या स्थलावकाशाप्रमाणें आज देणार आहों.

### अध्यक्षपणा

राष्ट्रीय सभेचा अध्यक्षपणा मजकडे आपण दिला हा माझा बहुमान होय, या बद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. आपल्या राष्ट्रबंधूचा प्रेमा, पूज्यभाव व विश्वास यांचा पूर्ण ठेवा ह्मणजे हा बहुमान होय. ऐहिक श्रेष्ठ बहुमान या पेक्षां अन्य इंडियनास उपलब्ध नाहीं. अधिकार वैभवाचें सर्वस्व या अध्यक्षपणांत आहे. ही ईश्वरी सत्ताच होय.

त्या नंतर या अध्यक्षपणाला स्वतांची पात्रता फार कमी असें विनयानें दर्शवून बानर्जी साहेब ह्मणाले कीं अमदाबादेस हा पहिलाच समारंभ होय. गुजराथ प्रांताच्या अडचणी फार होत्या. १८९९ च्या दुष्काळाच्या भयंकर संहारा नंतर ही सभा भरणार होती. पण आपण सर्व संकटें दूर केलीं, दृढ निश्चयानें, देशाभिमानानें व सार्वजनिक संकल्पानें आपण हा समारंभ इतका उत्कृष्ट केला ही गोष्ट आपल्या बहादरीची होय.

### संस्मरण

राष्ट्रीय सभा मुंबई इलाख्यांत शेवटीं भरली होती तेव्हां ती पुण्याला भरली होती. पुणें शहर ती दक्षिणची राजधानी. पश्चिम इलाख्याच्या बुद्धिमत्तेचें तें मूळपीठ होय. तेथूनच सार्वजनिक मोठमोठ्या कार्यांचे आरंभ होतात आणि सर्व कार्यांची चालक शक्ती तेथेंच आहे. पूर्वीची पेशवाई नष्ट झाली तरी लोकांच्या मनोभूमीवरील पेशवाई पुण्याकडेच आहे आणि विचारांचें साम्राज्य याच नगरीकडे आहे. या साम्राज्याचा मुख्य ईश्वर ह्मणजे कै० महादेव गोविंद रानडे होत! राम मोहनराय याच्या पश्चात् हेच होऊन गेले. त्यांचा देह मृत झाला पण ते आह्माला अमरच आहेत. मोठे लोक कधींच मरत नाहींत. त्यांच्या सत्क्रिया ही सर्व लोकांची इस्टेट होय. यांचें चरित्र मंगल प्रेरणा सदोदित करीत असतात. त्यांचा सदुपदेश आकाशवाणी प्रमाणें एक सारखा कानांत गुणगुणत राहतो.

### अनुरूपता

अमदाबादेला राष्ट्रीय सभा भरविण्यांत कांहीं विशेष आहे. या इलाख्यांतील शेवटची सभा पुण्यास भरला होती. तें शहर बुद्धिमत्तेचें मुख्यस्थान होय. आमदाबाद हें उद्योगधंद्यांचें मुख्य स्थान होय. औद्योगिक शाखा आह्मी राष्ट्रीय सभेच्या कार्याला जोडली आहे आणि ही नवी मेळवण पूर्णपणें प्रदर्शित करण्याला ही सभा अमदाबादेलाच भरविणें यथायोग्य होतें. राजकीय व औद्योगिक या दोन्ही चळवळी एकांत एक मिळालेल्या आहेत. त्या पृथक् वेगळ्या करितां येण्या सारख्या नाहींत. त्या परस्पराला परिपोषक आहेत व दोन्हींचा जोर एकवटला तर दोन्हींची अभिवृद्धी चांगली होईल. औद्योगिक संस्था आह्मी स्थापित केली नाहीं तरी तिच्या शक्ती आह्मी बहुगुणित केल्या आणि तिच्या संबंधाच्या विचारांस मोठा जोर दिला आहे. राजकीय उन्नती व औद्योगिक उन्नती या एकमेकींच्या मागून पुढून होत असतात. इंग्लंडांत औद्योगिक उन्नती प्रथम झाली. इंडियांत हा क्रम व्युत्क्रम दिसतो. राष्ट्रीय सभेनें सर्व राष्ट्राला संजीवनी औषधींच दिली आहे; आणि त्या योगानें उत्तरोत्तर राष्ट्रांत एक प्रकारचा जीव व जोम येऊं लागला आहे.

औद्योगिक चळवळ राजकीय चळवळी प्रमाणेंच जोरदार बनली आहे. देशी कलाकौशल्याचें कलकत्त्यास प्रदर्शन ज्यांनीं केलें त्यांनीं देशी जिन्नसांची एक वखारच घातली आहे. देशी उद्योग व कला वाढण्याला कांहीं विशिष्ट धरबंद पाहिजे आहेत. परंतु सरकार आपल्या अप्रतिबंध व्यापाराच्या तत्वाला सोडणार नाहीं व इंडियाला कायद्याची मदत देणार नाहीं. तथापि सर्व राष्ट्रवाल्यांनीं एकच संकल्प केला पाहिजे कीं होता होईल तों देशी चीजवस्तुच सर्वजण वापरीत जाऊं. असा संकल्प करूं आणि तो दृढ निश्चयानें चालवूं तरच देशी उद्योग धंद्याला तेजी येईल. देशी वस्तु ज्या मिळण्यासारख्या आहेत त्यांच्या याद्या गांवोगांव जाहिर करण्यांत आल्या पाहिजेत अशा कार्यांत पैशाच्या मानानें आपला तोटा आहे खरा परंतु असा स्वार्थत्याग केल्याशिवाय आपले बुडालेले धंदे उर्जित दशेला येणार नाहींत. स्वार्थयज्ञ हीच भावी कल्याणराशीची गुरुकिल्ली आहे. राजकीय गोष्टींत आह्मी कुचकामाचे आहों आणि त्यापेक्षां औद्योगिक गोष्टींत आमचे नादानी फारच फार आहे. तिकडे आपला प्रयत्न वळला पाहिजे; आणि याच दृष्टीनें राष्ट्रीय सभेला जोडीदार अशी प्रदर्शनाची संस्था काढली आहे.

अमदाबादेचें प्रदर्शन फार उत्कृष्ट आहे. श्रीमान गायकवाड सरकारांनीं ही संस्था लोकांस खुशी करून दिली आहे. अशा यशस्वी व विद्वान् संस्थानिकांकडून या कार्याला प्रारंभ झाला आहे या अर्थी औद्योगिक विषयांत आपली प्रगती चांगली होईल असें सुलक्षण दिसतें. राजकीय उन्नती औद्योगिक संपदा वरीं आणिते आणि ज्या लोकांना राजकीय हक्क नाहींत त्या लोकांच्या हातून सांपत्तिक उन्नती काडीमात्र होणार नाहीं.

## दिल्ली दरबार.

आमच्या लोकांची मुख्य मनोवृत्ति म्हटली म्हणजे आपल्या बादशहा विषयीं व देशा विषयीं त्यांची भक्ति होय. या देशाचा उत्कर्ष व ब्रिटिश राज्याचा चिरस्थायीपणा या दोन्ही गोष्टी आम्हांस सारख्याच महत्वाच्या आहेत किंबहुना त्यांचा परस्पर संबंध समवायी आहे. आमचे बादशहा आजारी झाले त्या मुळें आम्ही दुःखी होतों. पुढें त्यांस राज्याभिषेक झाला तेव्हां आमचा आनंद त्रिभुवनांत दुमदुमत होता. आमचे चक्रवर्ती बादशाहा स्वतंत्रतेचे पुरस्कर्ते आहेत व त्यांच्या हातून सर्व राज्यभर स्वतंत्रता वाढविण्यांत येईल. हा दरबार पाहिजे होता कीं नको हा प्रश्न आतां राहिला नाहीं. या दरबाराच्या टोलेजंग शोभेला फारशी किंमत लोकांच्या दृष्टीनें नाहीं. १८७७ चा दरबार फारसा लोकांच्या लक्ष्यांत नाहीं. दरबाराचा डामडौल व श्रीमंतांचें वैभव यांनीं तो खरा चिरस्मरणीय होत नाहीं. अशा प्रसंगाला मोठीशी देणगी दिल्यानेंच लोक तो दरबार चिरकाल स्मरतात. मागील आख्यायिका अशीच आहे. जात किंवा धर्म यांचा भिन्नपणा पाहून सरकारी कृपा किंवा अवकृपा होणार नाहीं अशा आश्वासनाचा मोठा हक्क दिला. हा हक्क कसा राखला जातो हें पाहणें नाहीं. सरकारी देणगीनेंच या दरबाराचें साफल्य होईल असें राष्ट्रीय सभेचें मत आहे.

या नंतर बाबू सुरेंद्रनाथ बानरजी यांनीं युनिव्हरसिटी कमिशनाच्या संबंधानें आपले विचार प्रदर्शित केले. हा विषय फार मोठा आहे आणि तो सभेपुढें ठरावाच्या रूपानें येणार आहे. हा शिक्षणा संबंधाचा विषय असून इंडियाला याच्या सारखा महत्वाचा दुसरा प्रश्न नाहीं. यावरील विचार स्वतंत्रपणें निबंधरूपानें निराळे देण्या सारखे आहेत म्हणून तो विषयच आम्ही दुसऱ्या एखाद्या प्रसंगानें घेण्याचा विचार केला आहे. युनिव्हरसिटीच्या प्रश्नानंतर सांपत्तिक स्थितीचा प्रश्न, दुष्काळाचा प्रश्न, उद्योगधंदे, जमिनीचा सारा, करांचा बोजा, दारिद्र्य दूर करण्याचे उपाय, नेटिव लोकांस अधिकाधिक द्यावयाच्या चाकऱ्या, लष्करी खर्च, पोलीस खात्याची सुधारणा, इंडियनांचे कालनींतील हक्क इत्यादि विषयाची परिस्फूटता बानर्जी साहेबानीं फार उत्कृष्ट प्रकारें केली. हें विषय स्वतंत्रपणें एकएकटे घेण्या सारखे आहेत म्हणून ते आम्ही स्थल संकोचा मुळें सध्यां बाजूला ठेविले आहेत.

## ईश्वरी संकेत.

आज आपण अठराव्या राष्ट्रीय सभेला प्रारंभ केला आहे, तर असा प्रश्न सहजी निघतो कीं आमच्या या सभेचा इत्यर्थ तरी कोणता? मूळ गोष्टीकडे आपलें मन जातें. आपण प्रयत्न पुष्कळ केले, आपल्या निराशा वारंवार होत गेल्या व कधीं कधीं जयश्रीही लाभली. परंतु राष्ट्रीय सभेच्या कार्यमालेची इतिश्री लिहिण्याची सुवेळा इतिहासकारांस पुढें अजून यावयाची आहे. हा प्रवास फार लांबीवरचा आहे. आपल्या पैकीं कित्येक मृत्युंगत झाले व पुढेंही कांहीं जण होतील भाग्योदयकाल दृष्टीस पडण्यापूर्वीं सांप्रतची रात्र धैर्यानें कंठली पाहिजे. या गोष्टीला आपल्या पैकीं कित्येकांची आयुर्मर्यादा थोडी होईल तथापि आमच्या आशांची व मनोरथाची दृष्टी फारच पुढें आहे. ही दृष्टी खरा चितारी होय. तो भावी कल्याणतपदांचें चित्र उत्तम रेखाटतो. राष्ट्रीय सभेनें मंगल कार्य ईशकृपेनें सर्व विघ्नांतून पार पडेल, आम्ही राजकीय उन्नतीला पोचूं, आणि असा उत्क्रांतीचा काल येईल कीं, आम्हांस सर्व राजकीय हक्क प्राप्त होतील व आमच्या योग्यतेची खरी किंमत होईल. मला तर वाटतें कीं, राष्ट्रीय सभेला ईश्वरी संकेतच पुरा करावयाचा आहे इंडियन लोकांस राष्ट्रवाला पोंचविण्याचा व इंडियांतील ब्रिटिश राज्याला चिरस्थायी करण्याचा ईश्वरीच संकेत दिसतो. आपण राष्ट्रीय सभेच्या मंडपांत बसलों आहों पण येथील चालक शक्ती व उत्तेजक प्रेरणा त्या जगत्प्रभूच्या मंदिरां कडूनच आपणाकडे येत आहेत. या गुजराथ प्रांतांतील द्वारकेंतला निवास करणारा श्रीकृष्ण अर्जुनाला कुरुक्षेत्रीं काय उपदेश सांगत होता कीं सत्कर्म हाच धर्म होय. आपल्या जन्मभूमीचें ऋण देणें ही गोष्ट आपल्या सर्व कर्तव्यांची मुख्य ग्रंथी आहे आणि हें कर्तव्य करण्यहून पवित्र अशी अन्य क्रिया तरी कोणती, उत्तम असा धर्म कोणता आणि याहून निराळी अशी ईश्वराची आज्ञा ती कोणती! या अशा पवित्र कर्तव्या पुढें आपणाला संकटें तीं कसचीं, विश्वाचा तो अर्थ काय, आपल्याला निराशा तरी कोणत्या, कोणत्या प्रयत्नामुळें आपली ती कंबर खचणार आहे! आपणाला कर्तव्याची लढाई मारावयाची आहे तेव्हां या तापत्रयाच्या वेढ्यांतून गेलेंच पाहिजे.

या नंतर नवीन बादशाही राजपद्धतीचें धोरण किती घातुक आहे हें सांगून बाबू सुरेंद्रनाथ बानरजी यांनीं निराशा दूर करण्याविषयीं व उत्साह धरण्याविषयीं मोठा कळकळीचा सद्बोध केला. ते म्हणाले कीं चैतन्य, नानक, तुकाराम, रामदास यांचीं चरित्रें पहा, इंडियाचा इतिहास पहा, ज्ञानसूर्य इंडियांत प्रथम उगवला हें स्मरा आणि गत ज्ञानवैभवाची आठवण ठेवा, म्हणजे पुढील मार्ग चांगला दिसेल आणि राजकीय हक्क आपल्याला आपोआप प्राप्त होतील.

राष्ट्रीय सभेच्या दुसरे दिवशींच्या बैठकींत निरनिराळे ठराव पास करण्यांत आले. या ठरावांची यादी आम्ही मागेंच प्रसिद्ध केलेली आहे. प्रत्येक ठरावाचा विषय स्वतंत्र आहे. तिसरे दिवशीं सर्व काल सामाजिक परिषदे कडे गेला. चौथे दिवशीं म्हणजे शुक्रवारीं राष्ट्रीय सभेची अखेरची बैठक झाली. पुढील वर्षाची सभा मद्रासेस भरावी असा निर्णय ठरला. जपानचे प्रोफेसर टोकिओ हे राष्ट्रीय सभेला येत असतात आणि त्यांनीं सभेच्या कार्यासंबंधानें आपली पूर्ण संमती दर्शविली.

## सामाजिक परिषद्.

डाक्टर रामकृष्ण गोपाळ भांडारकर एम. ए. डाक्टर आफ फायलॉलजी यांच्या अध्यक्षते खालीं गेल्या बुधवारीं व गुरुवारीं सामाजिक सभा भरली होती. गुजराथी कवी महाशुक्र यांनीं कांहीं कविता म्हटल्या आणि त्या नंतर खालील विषयावर निरनिराळे ठराव करण्यात आले:—

(१) विधवा विवाह. (२) पोट जातींतील भेदाभेद मोडणें. (३) लग्नाच्या वयाची इयत्ता वाढविणें. (४) बहुपत्नीत्वाचा निषेध. (५) रानड्यांचें स्मारक करणे (६) लग्नादि कार्यांचा खर्च कमी करणें (७) समुद्र पर्यटन. (८) नैतिक व धार्मिक शिक्षण शाळांतून सुरू करणें, (९) हीन जातींची सुधारणा करणें.

बाबू सुरेंद्रनाथ बानरजी यांनींच रानडे स्मारकाचा विषय सभेपुढें मांडला तेव्हां त्या संबंधानें लोकांचा मनोनिग्रह पक्का ठरला. इतर प्रसिद्ध वक्त्यांमध्यें मि. सुब्रह्मणी अय्यर श्रीमती सौ० विद्यागवरी रमणभाई बी. ए. नामदार श्रीनिवासराव, राव बहादूर मराठे आणि स्वामी नित्यानंद यांनीं निरनिराळ्या विषयावर संभाषणें केलीं.

या शिवाय स्त्री शिक्षणाचा प्रसार, मद्यपानाचा निषेध, पवित्र आचरण, प्रांताप्रांताला सामाजिक सभेची स्थापना, मृता करितां छाती बडविण्याच्या भाडोत्री प्रकारचा निषेध आणि बाटलेल्या हिंदूस पुनः स्वजातींत पंक्तिपावन करणें या विषया संबंधानें उत्कृष्ट उहापोह झाला.

विधवा विवाह संबंधानें चर्चा चालू असतांना पुष्कळांनीं निषधाची ओरड ओरड केली तेव्हां श्रीमती रमाबाई नीळकंठ या बोलल्या कीं, तम्हाला मत देण्याचा अधिकार नाहीं. या बरोबर पुष्कळ गोंगाट झाला तेव्हां नामदार न्यायमूर्ती चंदावरकर यांनीं कायदेशीर बंदोबस्त करूं अशी दहशत घातली. नामदार चंदावरकर यांस जनरल सेक्रेटरी व रा. रा. भाजेकर यांस असिस्टंट सेक्रेटरी नेमण्यांत आले.

वरील संक्षिप्त हकिकती वरून सामाजिक परिषदेच्या मुख्य मुख्य सुधारणा चांगल्या लक्ष्यांत येतील. या गोष्टी सांप्रतच्या समाजाला पाहिजे आहेत आणि त्या प्रचारांत आणण्या संबंधानें लोकमत अनुकूल करण्या विषयीं परिषदेचे प्रयत्न चालू आहेत. कृतीमध्यें फरक पडण्यापूर्वीं विचारांतच क्रांती व्हावयाला पाहिजे असते; आणि ती होण्यापूर्वीं कोणत्या सुधारणा रूढ होतच नाहींत. जुन्या लोकसमुहाला आपल्या बरोबर ओढून नेण्याची गोष्ट मोठ्या प्रयासाची आहे आणि त्या संबंधांत यश येण्याला सुधारकांचीं वर्तनें चांगलीं निर्मळ व पवित्र पाहिजेत इतकेंच नाहीं तर त्यांनीं आपल्या सौमन्यानें व विनयानें विरुद्ध पक्षीय लोकसमुहा विषयीं आदरबुद्धिच व्यक्त केली पाहिजे. सामाजिक परिषद् चांगली आहे. आणि तिचे भक्त तिची खरी योग्यता निदर्शनाला आणितील तेव्हांच सुधारणा लोकांस आवडूं लागतील.

## राजनिष्ठेचें प्रदर्शन.

इंडियन राजनिष्ठा कितीहि खरी असो, तरी तिला इंग्रजांच्या राजनिष्ठेची योग्यता नाहीं. सापत्नभावानें हा कमीपणा आला आहे. हा सापत्नभाव राज्यकर्त्यांच्या मनांत रात्रंदिवस वास करितो व त्यामुळें ते कधींही इंडियनांविषयीं खरा प्रेमभाव ठेवीत नाहीं. इंडियनांच्या सर्व गोष्टी विषयीं त्यांची वृत्ती साशंक असते. संशयानें संशय वाढतो आणि खऱ्या चांगल्या मनोवृत्तीला देखील तिलांजली मिळते. या संशयानेंच इंडियनांच्या राजभक्ती सभोंवतीं विषारी द्रव्यांचें आळें केलें आहे. या आळ्यांत आम्ही प्रेमाने पाट आणून सोडले आहेत आम्ही तेथील विषारी द्रव्यें दूर दूर करीत आहों, पण यश येईल तो दिवस सोन्याचा होय.

पहिल्या जानेवारीला इंडियांत जो आनंदोत्सव होणार आहे तसा पूर्वीं कधींच झाला नसेल. कोट्यावधी रुपयांचा फन्ना उडणार आहे. आनंदाची बाह्य चिन्हें सर्वत्र दिसतील, आनंदोल्हासाच्या जितक्या खाणाखुणा असूं शकतील तितक्या सर्वांचें उत्कृष्ट प्रदर्शन होईल, आतषबाजी, दरबार नाना विध खेळ, गायनवादनाचे उत्सव, इत्यादि गोष्टी आमच्या राजनिष्ठा व्यक्त करितील व तिची प्रेरणा नवीन पिढीमध्यें चांगली करितील; आणि या गोष्टींची परमावधी ही जर राजनिष्ठेची उच्च पायरी असेल तर आम्ही त्या पदवीला पोचणार आहों असें आम्ही निःसंशय म्हणतो. या श्रीमंतीच्या विविध प्रकारांनीं, वैभवसूचक उत्कृष्ट देखाव्यांनीं आणि राजभक्तीच्या आनंदोत्सवांनीं आम्ही श्रीमान चक्रवर्ती बादशहाच्या कृपेला पात्र होऊं तर ईश्वरानें आमच्या या सर्व खर्चाचें चिज केलें असें होईल.

राजभक्तीनें लोक वर्गणी देतात आणि राज्यारोहणाचा अप्रतिम उत्सव करितात हें खरें, परंतु या वर्गणीच्या बुडाशीं सरकारी जोर कसा खेळता असतो हें ध्यानांत धरण्या सारखें आहे. राज्यारोहणाच्या वर्गण्या पुष्कळ जमतात आणि त्या फार लवकर जमतात ही गोष्ट सरकारी अंमलदारांनी होय कित्येक अधिकारी समजतात कीं, वर्गणीचा आंकडा पहूनच त्यांची वाहवा होईल. त्यांची वहा खरोखर होईल हें आम्ही निश्चयानें कळवितों. कार्यांच्या महत्वाप्रमाणें प्रस्तुतच्या वर्गण्या फार मोठ्या आहेत आणि खर्चही फार मोठा आहे असें आम्ही समजतों. या सर्व खर्चाच्या गोष्टी क्षणिक आहेत. चिरकाल राहणाऱ्या अशा गोष्टीकडे या खर्चाचा विनियोग होत नाहीं ही खेदाची गोष्ट होय. हल्लीं औद्योगिक शिक्षणा संबंधानें सर्वत्र खळ-

सां

चालूं आहेत आणि त्याच्या जरूरी इतकी जरूरी दुसऱ्या कोणत्याच गोष्टीची नाहीं तरी या गोष्टीसाठीं वर्गणी कशी ती जमाच होत नाहीं. पण आतषबाजीच्या व क्षणभंगुर ऐषआरामाच्या गोष्टीकडे एवढा प्रचंड खर्च होत आहे हा खुद आमचे चक्रवर्ती एडवर्ड बादशहा यांसहीं मान्य होणार नाहीं. परंतु इंडियांत सर्व गोष्टी शोभतात! असो. अशा या खर्चाचा चांगलासा मोबदला मिळो म्हणजे आम्ही धन्यता मानूं.

## शिक्षणाच्या सोयी.

शाळा व पाठशाळा पुष्कळ आहेत, परंतु या संस्थांतून जें शिक्षण मिळतें त्यांतील पुष्कळसा भाग लोक समुदास जरूरीचा नसतो. अगदीं कनिष्ट प्रतींचें शिक्षण म्हटलें म्हणजे साधारण लिहितां वाचतां येणें व साधारण हिशोब करितां येणें. इतक्या गोष्टी आल्या म्हणजे जनसमाजापैकीं मोठ्याशा समूहाला शिक्षण पुरें असतें. मध्यम प्रतीचें शिक्षण म्हटलें म्हणजे इंग्रजी चांगलं लिहितां वाचतां येणें, साधारण भूमिती व गणित, व देशीभाषा इत्यादि गोष्टी होत. हल्लीं शाळांच्या शिक्षणांतून नानाविध विषय शिकवितात; पण तितके विषय पुष्कळ वर्गांतील लोकांस नको असतात या लोकांच्या साठीं निराळ्या शिक्षणाच्या, सोयी शाळांतून नसतात. विद्यार्थ्यांचा काल व परिश्रम फुकट जातात. आणि शाळेंतील शिक्षणाची री री पो पो करितां करितां त्यांच्या उमेदीही खचतात. ज्यांचीं मुलें शाळेला जातात त्या पितृवर्गापाशी निराळ्या प्रकारचें शिक्षण देण्याचें द्रव्यबळ नसतें आणि सरकारी ठरीव शिक्षणक्रमाला सोडून देण्याचें धाडसही करवत नाहीं, धोपट मार्ग धरावा आणि जें पुढें होईल तें पहता येईल अशा धर्तीवर आईबाप आपलीं मुलें शाळेला पाठवितात. सालेसालच्या परिक्षांच्या यंत्राखालीं विद्यार्थी चिरडले जात असतात ही गोष्ट डोळ्यापुढें आली तरी दुसरा उपायच नाहीं म्हणून तशीच डोळेझांक करावी लागते. सरकारी चाकरी, इंजिनिअरी, डाक्टरी, वकिली इत्यादि ठळक धंद्या पलिकडे सांप्रतच्या उच्च नीच शिक्षणाचा फारसा उपयोग नसतो. आणि ह्या धंद्यांत फारच गर्दी झाली असल्यामुळें तिकडे विद्यासंपन्न लोकही उपाशी मरण्याच्या राहटावर विरल्या घेत असतात. औद्योगिक व यांत्रिक शिक्षण पाहिजे म्हणून सर्व बोलतात परंतु या विषयांकडे विद्यार्थ्यांस जाण्याला तशा शाळाच उपलब्ध नाहींत; आणि जें शिक्षण नको असतें त्या शिक्षणानें विद्यार्थ्यांची कंबर मात्र ढिली होत चालली आहे.

अशा प्रसंगीं आम्हाला एक उपाय बरा दिसतो; आणि तो शाळाखात्याच्या हातून सहजीं सिद्धीला जाण्यासारखा आहे. तो उपाय असा कीं ज्या विद्यार्थ्यांस सरकारी पद्धतीनें शिकावयाचें असेल त्यांनीं तसें करावें परंतु ज्यांस सर्व विषय शिकण्याची इच्छा नसेल त्यांना जेवढे विषय पाहिजे असतील तेवढेच शिकूं द्यावेत आणि त्यांची तेवढ्या विषया संबंधानेंच त्याची वार्षिक परिक्षा घेण्यांत यावी. विषयांची निवड विद्यार्थ्यांचे पालक करितील. अशी व्यवस्था डायरेक्टर साहेब चालूं करितील तर त्यांचे लोकांवर उपकार होतील आणि शाळांचा उपयोग लोक यथायोग्य करून घेतील. या रितीनें विशिष्ट गोष्टी शिकणारे विद्यार्थी आपला अवशिष्ट वेळ दुसऱ्या उपयुक्त गोष्टींचें ज्ञान करून घेण्यांत खर्चतील. आम्ही म्हणतो तशी सोय शाळाखात्यानें करून दिली तर ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें विद्यमान शिक्षणक्रमाचा लाभ करून घेतां येईल; आणि त्या खेरीज शिक्षण विषयांत फेरफार करण्याची जबाबदारी पुष्कळांस चांगली ओळखता येईल चालूं पद्धतीतील दोष लवकर दिसतात परंतु ते दूर करण्याचे उपाय अनुभवानेंच सुचणार आहेत आम्हांस आशा आहे कीं आमचे डायरेक्टर साहेब या सूचनेचा यथायोग्य विचार करितील.

---

The Berar Samachar

MONDAY DECEMBER 29 1902

The National Congress at Ahmedabad was a grand success. In point o. grandeur, and magnificence it put in the back ground its preceding seventeen sessions. The feeling of unity was supreme and the harmony which existed amongst the different nationalities of this vast empire pointed to the splendid welding of all peoples into one nation. The proceedings of the Congress will be in themselves a book of master—pieces of eloquence. They embody in themselves the wide range of Indian problems. There they are cloaked in a language which speaks highly to the statesmanship of the Congress—leaders. All questions will find therein a clear expression of the pros and cons of the opposing arguments. A calm reading of the Congress—literature is itself a political education. No Indian can brush it aside unless he shuts his eyes to the new life that is to dawn upon him in the immediate future. The Congress inspires noble sentiments of loyalty, teaches higher duties that we owe to our country and points to the road that we have to take in our constitutional battles with the ruling people. Our past trials have been great, & the chastening discipline of the past is a stepping-stone to our future success. We give below the eloquent suggestive remarks which Babu Surrendranath Bannerjee makes in connection with the desponding situation of the present time.

"The triumphs of liberty are not won in a day. Liberty is a jealous goddess, exacting in her worship and claiming from her votaries prolonged and assiduous devotion. Read history. Learn from it the inestimable lesson of patience and fortitude and the self—sacrificing devotion which a constitutional struggle for constitutional liberty involves. Every page of Indian history is resplendent with the touch of self—abnegation. Chaitanya and Nanak, Tukaram and Ram Das lift the mind high up to the sublimer eminence of the divine ideal. India of the past is rich in these examples. May we not hope for their successors in the India of the present, in the India of the Congress, in the India under British rule, with all the stirring influences of Western life and civilization? The responsibilities of the present, the hopes of the future, the glories of the past ought all to inspire us with the noblest enthusiasm to serve our country. Is there a land more worthy of service and sacrifice? Where is a land more interesting, more venerated in antiquity, more rich in historic traditions, in the wealth of religious, ethical and spiritual conceptions which have left an enduring impress on the civilization of mankind? India is the cradle of two religions. It is the holy land of the East. Here knowledge first lit her torch. Here in the morning of the world, the Vedic Rishis sang those hymns which represent the first yearning of infant humanity toward the divine ideal. Here was developed a literature and a language which still excites the admiration of mankind— a philosophy which pondered deep over the problems of life and evolved solutions which satisfied the highest yearnings of the loftiest minds. Here man first essayed to solve the mystery of life, and the solution wrapped in the rich colours of the poetic imagination and clothed with the deeper significance of a higher spiritual idea, bids fair, thanks to the genius of the greatest Hindoo scientist of the age, to be accepted by the world of science. Such indeed has not been the royal road to political enfranchisement. The triumphs of liberty have not thus been won. Japan is an object—lesson which thrust itself upon the view. Read her history; note her wonderful self—sacrifice, her marvellous power of adaptation, her patience, her fortitude, her indomitable energy and let the most ancient of Eastern nations derive inspiration and guidance from the youngest which has solved the riddle of Asiatic life and has harmonized the conservatism of the Eas with the progressive forces of the West."

Our rulers will mark in red pencil the transition in the programme of the of the National Congress. The industrial development of India shall henceforth be the principal plank in the work of the Congress. Our political movement will be the solid means of securing the new object. The whole nation is now bent upon the revival of its past industries and commerce. All efforts will be directed to put down western competition and nothing will come in the way of the people that will dissuade them from the task which they have willingly imposed upon themselves. Our nascent industries need protection. Protection is not inconsistent with the various principles of free—trade in so far as it will promote these industries. It is a good augury that the necessity of technical education is admitted on all hands, official as well as non-official. The regeneration of India will depend upon it as it will lead to re—organize our industries and commerce on Indian lines. The English policy has annihilated our once flourishing arts and industries and it is now a high time that our rulers must afford protection to them and restore our people to some old footing whence they have dethroned us in the most unjust and iniquitous manner. The Ahmedabad Congress sends forth a prayer to the ruling nation to undo the acts of past injustice and we hope that the Government will immortalize the Indian Coronation by conceding to the people their just demands. Such a royal gift will have a special grace and excellence. therein and will be consecrated by the devout prayers of the people for long life, sound health and undying prosperity of His Majesty the King Emperor of India, Edward VII.

## वऱ्हाडवृत्त

हवामान—थंडीचा कडाका फारच फार आहे. सध्यां हवा चांगली रूक्ष व आरोग्य कारक आहे. जेथें रोगराई आहे तेथें म्हणजे, शेगांव, खामगांव, धामणगांव सारख्या ठिकाणीं प्लेगाचा आजार चालूच आहे. पण जेथें प्लेगाचा रोग नाहीं तेथें हवापाणी आरोग्याला सुखावह असें आहे.

मि. जी. सुब्रायल नायडू एक्स्ट्रा असि. कमिशनर बुलढाणा यांनीं आपल्या कामाचा चार्ज मेजर प्लोडन असि. कमिशनर यांस दिला. आणि त्यांची बदली वाशिमास झाली असून तेथलि आफि. एक्स्ट्रा असि. कमिशनर मि. सैफुद्दीनखान लालखान यांस इलिचपुरास तहशिलदार नेमिलें. आणि इलिचपूरचे आक्टिंग तहशिलदार मि० दवलत झावाजी यांस केळापुरास नायब तहशिलदार नेमण्यांत आलें.

दर्यापूर, मंगरूळपीर, पुसद, मेहेकर, आकोट, इत्यादि तालुक्यांच्या मुख्य मुख्य ठिकाणीं येत्या पहिले तारखेला व त्या नंतर राज्याभिषेकाचे उत्सव, आतषबाजी वगैरे टोलेजंग प्रमाणावर होणार आहेत. उमरावतीचा जलसा सर्व जिल्ह्यांमध्यें उत्कृष्ठ होईल असा रंग दिसतो.

श्री शृंगेरी मठाचे श्रीशंकराचार्य जगद्गुरु यांची स्वारी येथें येऊन बरेंच दिवस झाले. येथील ब्रह्मवृंद या सत्पुरुषाच्या गादीचा योग्य सन्मान राखतील अशी आम्हांस आशा आहे.

---

## राज्याभिषेक दरबार

आकोला येथें टाऊनहालांत तारीख १ जानेवारी १९०३ गुरुवार रोजीं दुपारीं १२ वाजतां दरबार भरविण्यांत येईल सर्व लोकांनीं या दरबाराला अगत्य येण्याचें करावें. दरबाराला येण्याची कोणासही मनाई होणार नाहीं. फक्त टाऊनहालामध्यें जितकी मंडळी बसतील त्यापेक्षां अधिक मंडळी आल्यास ज्यांस जशी जागा मिळेल त्या मानानें बसण्याची अगर उभें राहण्याची तसदी सोसावी लागेल. कारण इतक्या मंडळीपुरती व्यवस्था अगोदरपासून करण्यास सवड नाहीं. कळावें

तारीख २७।१२।०२ इसवी.

K. G. Damle.
सेक्रेटरी
राज्यारोहण-उत्सव-कमिटी.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९।॥ |
| सोनें | २४।= |
| चांदी | ६१ |
| जवस | १०९ |
| जवारी | ९६ |
| गहू | ९७॥ |
| बाजरी | ६९ |
| मीठ | ३॥।≈ रु. मण |
| चणे | ३॥ रु. मण |
| तूप | ७८= रु. मण |
| तेल | ६ रु. मण |
| रुई | ९२- ६० |
| सर्कि सट्टा | ९॥।= |
| जवारी सट्टा | ४४ |
| बोजा सट्टा | ९१ |
| कपासी | ३६ - ३६॥ |

## राष्ट्रीय सभा

### ( १८ वा वार्षिक समारंभ )

पूर्ण संकेताप्रमाणें अमदाबादेंत हा समारंभ फार उत्कृष्ठ झाला. पूर्वींच्या समारंभांच्या मानानें हाही मोठा वर्णनीय होता. सर्व पाहुण्यांचें आदरातिथ्य अगदीं नामी झालें असून इतकी उत्तम उठावणी होईल असें प्रथम वाटलेंही नव्हतें. अमदाबादेला गेल्या सोमवारीं बाबू सुरेंद्रनाथ बानरजी पोंचले तेव्हांचा त्यांचा सत्कार तर मोठाच अपूर्व झाला. दोन्ही बाजूंनीं व्हालंटीअर मंडळींच्या दुतर्फा रांगा त्यांच्या नांवानें जयघोष करीत होत्य. दोन दोन मैल पर्यंत एक सारख्या गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. श्रीमान् नृपश्रेष्ठांचा जसा त्यांच्या राजधानींत सन्मान होतो तद्वत् लोकनायक सुरेंद्रनाथ बानरजी यांचें स्वागत टोलेजंग थाटावर करण्यांत आलें. त्यांच्या रथाचे घोडे सोडून तो रथ बहु सन्मानानें लोकांनींच ओढला. या राष्ट्रीय संतश्रेष्ठांचें दर्शन घ्यावें ह्मणून सर्व अमदाबाद शहरचें शहर एकाच मार्गाला लोटलें होतें.

मंगळवारीं दिवसा दोन वाजतां राष्ट्रीय सभेच्या कार्याला प्रारंभ झाला, तेव्हां सर्वत्र जयघोष, मंगलकारक टाळ्यांचा गजर, व आनंदोद्गार यांनीं सभामंडप दणाणून दिला. गुजराथ प्रांत झोंपेंतून जागा झाल्या प्रमाणें दिसतो, राष्ट्रीय सभाही संजीवनी मात्राच दिसते. सर्वत्र गर्दी, चळवळ व धांदल उडाली आहे; आणि अमदाबाद शहर इंडियांतील उत्तम उत्तम गृहस्थांनीं गजबजून गेल्यासारखें दिसलें. सभागृहांत सहा हजारावर लोकसमूह जमला होता. एवढा प्रचंड समूह क्वचित्च दृष्टीस पडतो. सभेचा तो देखावा मोठा मनोहर व रमणीय असा होता. प्रत्येकानें आपापल्या घरीं याचें चित्र जरूर ठेवावें ह्मणजे नुसत्या चित्रानेंही विलक्षण स्फुर्ती चढणारी आहे. इंडियांतील अनेक धर्माचे, जातीचे व उद्योग धंद्याचे लोक एकत्र गोळा झाले होते. बंगाली बाबू, मद्रासी, नायर, विशाळ छातीचे रजपूत, धिप्पाड पंजाबी, आग्रा, आल्हाबाद, कराची, नागपूर, वऱ्हाड, पुणें, सातारा, इत्यादि सर्व ठिकाणचीं निरनिराळीं माणसें त्या सभागृहांत चमकूं लागलीं तेव्हां त्याचे पेहराव, त्यांच्या बोली, नाना मुखचर्या यांनीं मनाला विलक्षण आल्हाद वाटला. असा तो अनुपम देखावा पाहून हिंदू, मुसलमान व पार्शी हे तिन्ही धर्म या राष्ट्रीय कार्यांत एकजीव झाले कीं काय असें वाटे.

राष्ट्रीय सभेला प्रारंभ एका गुजराथी गाण्यानें झाला. श्रीमती सौ० विद्या नीलकंठ बी. ए. शारदा मेथा इत्यादिकांनीं हें गाणें सुस्वर ह्मटलें.

राष्ट्रीय कार्यमाला उत्कृष्टपणें शेवटास जावी ह्मणून देशाभिमानी लोकप्रतिनिधींच्या अंगांत विलक्षण वीरश्री आली होती आणि परस्परांचें अभिनंदन चालू असतांना स्वागत कमिटीचे अध्यक्ष दिवाण बहादूर अंबालाल साकरलाल देसाई एम. ए. एल. एल. बी. व बडोदा संस्थानचे माजी मुख्य न्यायाधीश यांनीं आपल्या प्रेमळ संभाषणानें सर्वजणांचें उत्कृष्ट स्वागत केलें.

त्यांच्या भाषणावर सारांश असा कीं इतिहासप्रसिद्ध आमच्या या गुजराथ प्रांताच्या राजधानींत आपलें स्वागत असो. आपल्या सारख्यांचें स्वागत करण्याचा हा मोठा बहुमान क्वचित्च मिळतो. उभ्या शतकांत पूर्वीं न आलेला असा भयंकर दुष्काळ नुकतांच येऊन गेला व प्लेगानें आह्मी घेरीला आलों आहों तरी आमच्या होतकरू तरुण पुढाऱ्यांनीं मोठा नेट धरला, वर्गणीच्या रकमा भराभर जमूं लागल्या, आणि सरकारी वृत्ति तटस्थपणाची आहे तरी आमच्या राष्ट्रीय संस्थेची जी प्रदर्शनाची स्वतंत्र शाखा आहे तिला नामदार लेली साहेब कमिशनर यांचा मोठा आश्रय असून खुद्द गव्हरनर साहेब लार्ड नार्थकोट हे स्नेहभावानें या प्रदर्शनाचे मुख्य आश्रयदाते आहेत, अशी अनुकूलता होती तथापि आपल्या पाहुणचारांत पुष्कळ उणिवी आहेत त्या आपण आमच्या अंतःकरणाचा प्रेमळपणा व आदरभाव यांनीं पुऱ्या करून घेतल्या पाहिजेत. आमचा पाहुणचार आपण गोड व पुरा करून घेतला पाहिजे.

हा आमचा गुर्जर देश व्यापारी पेठे संबंधानें सुप्रसिद्ध आहे. गुजराथी लोक शांत स्वभावाचे, मोठे उद्योगी व व्यापार धंदेवाले आहेत. ब्रिटिश राज्याच्या शांततेनें व स्वस्थतेनें गुजराथेच्या उद्योगधंद्याला मोठीच चढती कळा आली, शेती, उद्योग व व्यापार या मध्यें गुजराथ अगदीं मग्न असे. राजकीय चळवळी पासून हा प्रांत अलिप्त व निराळा राहिला, परंतु आमच्यांतील जुन्या मंडळीला व इंग्रजी विद्या शिकलेल्या लोकांस वाटूं लागलें आहे कीं राजकीय उन्नतीच्या वाटा बुजविणें उपयोगाचें नाहीं.

(१) एक तर, हल्लीं पाश्चिमात्य राष्ट्रांमध्यें मोठी स्पर्धा चालू आहे. ज्या त्या राष्ट्राला वाटतें कीं आपलाच व्यापार पुढें सरसावला पाहिजे. या स्पर्धे मुळें पुष्कळ राष्ट्रांनीं आपली राजसत्ता पुढें केली आणि बाहेरच्या राष्ट्राचा माल आपल्या देशांत येऊं नये ह्मणून नाना प्रकारचे प्रतिबंध घातले. ही प्रतिबंधाची गोष्ट आमच्या गुजराथेंत चांगली निदर्शनास आली आहे.

( २ ) राजकीय चळवळीचें महत्व गुजराथेला कळण्याला सरकारी नाण्याचा कायदा दुसरें कारण झाला आहे. या एका सरकारी कायद्यानें आमच्या लोकांचा जीवनरस शोषला जात आहे. ४० कोट रुपये सरकारी कारभाराला लागतात ही प्रचंड रक्कम भरून काढण्या साठीं आमच्या उद्योग धंद्यावर व व्यापारावर करांचा बोजा अधिक बसला आहे.

( ३ ) विलायती जिनवस्तूंनीं आमच्या देशी कला व हुन्नर हीं सर्व बुडविलीं तेव्हां पक्कें समजून आलें कीं औद्योगिक संपदा पुष्कळशा राजकीय उन्नतीवर अवलंबून असतात.

( ४ ) राजकीय चळवळींत हात घालण्याला गुजराथेला चवथेंही एक कारण घडलें. तें असें कीं, गुजराथी लोक केपकॉलनी नेटल, ट्रान्सव्हाल, व दक्षिण आफ्रिकेंतील इतर भागांत पसरलेले आहेत. ते मजुरी, व्यापार, कारागिरी व सावकारी करून पोट भरतात. या लोकांस गोरे लोक पायाखालीं तुडवूं पाहत आहेत. ही मानखंडणा व पायमल्ली पाहून असें वाटूं लागलें आहे कीं राजकीय गोष्टींत आपलें पाऊल पुढें पडल्या शिवाय नीट दाद मिळणार नाहीं.

( ५ ) पांचवी गोष्ट आमच्या शहरच्या गिरण्यांची व कारखान्यांची होय. इतकीं वर्षें चांगली भरभराट होती परंतु सरकारांनीं देशी सुतावर वगैरे जी जकात बसविली आहे तिनें मोठें नुकसान झालें आहे. राजकीय चळवळी पासून ठेविलेला अलगपणा घातुक आहे आणि सरकारी दृष्टी अनुकूलशी करण्याला राजकीय चळवळींत पडलेंच पाहिजे असें आमचा प्रांत शिकून चुकला आहे.

( ६ ) सहावें कारण असें कीं आमच्या प्रांतांतील १ कोट लोकां पैकीं गेल्या दुष्काळांत २५ लक्ष लोक मृत्यूच्या जाभाड्यांत पडले, आणि ही गोष्ट धान्याचे ढिगांचे ढीग डोळ्यापुढें असतांना घडली. कारण लोकांच्या जवळ धान्य विकत घेण्याला पैसाच नाहीं. खानगी धर्मादाय, सरकारी धर्मादाय व दुष्काळाचीं कार्यालयें यांनीं देखील कांहींच निभाव लागेना; माणसें मशा प्रमाणें पटापट मरत होतीं, लोकांची ही घोर दरिद्रावस्था असण्याचें कारण काय हा प्रश्न डोळ्यापुढें सारखा खेळत असतो; व तोच प्रश्न राष्ट्रीय सभेच्या कामासाठीं आमचा प्रांत पुढें करीत आहे.

( ७ ) साठवें कारण शेतकऱ्यांचें दैन्य होय. सरकारी सारा आमच्या प्रांतांत पराकाष्ठेला पोंचला आहे; आणि तो वसूल करितांना मोठेच जिल्ह्यांत जुलूम झाल्याचा शिरस्ता अद्याप पडलेला नाहीं. साऱ्याची माफी सरसकट द्यावी आणि व्यक्तिशः चौकशी नको असें मुंबई सरकार अलिकडे कबूल करीत आहे, आमच्या प्रांताच्या या गोष्टीच आह्माला राजकीय चळवळींची जरूरी कळवितात. आणि पूर्वींचा उदासीनता सोडून आमचे गुजराथी लोक राष्ट्रीय सभेच्या कार्यासाठीं आज एका पायावर उभे आहेत.

राष्ट्रीय सभे विषयीं आमच्या प्रांतांत अशी कळकळ अलिकडे उत्पन्न झाली आहे. तथापि आमच्या मधील जे दीर्घदृष्टी मुत्सद्दी आहेत त्यांचें धोरण मुळापासून असें आहे कीं राष्ट्रीय सभा ह्मणजे सर्व प्रकारच्या उत्क्रांतीचें मूळ पीठ होय. प्रारंभीं आंग्लो—इंडियन या सभे विरुद्ध अगदीं तुटून पडले. राष्ट्रीय सभा ह्मणजे अराजक पक्षवाल्यांची आहे असा अपवाद होता पण तो यथाकाल दूर झाला. राजभक्ती आमच्या विचाराचा मूलगर्भ आहे. आमच्या वास्तविक व निरंतरच्या उन्नतीची इमारत त्या राजभक्तीच्या मक्कम पायावर उभारलेली आहे. या तात्विक विचारांतच राष्ट्रीय सभेची खरी रमणीयता आहे; किंबहुना राजभक्ती ही त्या सभेचे पंचप्राण आहेत. प्रत्येक प्रश्नाला जसे पक्ष प्रतिपक्ष असतात त्याप्रमाणें ब्रिटिश राज्यकारभारांतील गोष्टीं विषयीं इंडियन बाजूही विचारांत घ्यावयाला पाहिजे आणि ही बाजू राष्ट्रीय सभा आपल्या वार्षिक नानाविध ठरावांनीं पुनःपुनः स्पष्ट करीत आहे. विद्येचा प्रसार होत चालला तसतशी इंडियन विचारांची बाजू अगदीं नेटानें पुढें येऊं लागली आहे.

राष्ट्रीय सभेची कार्यमाला सुसिद्धीला लवकर गेली नाहीं तरी त्यांत विषाद मानण्याचें प्रयोजन नाहीं. अशीं कामें पिढ्यानपिढ्या नेटानें चालावीं लागतात तेव्हां कोठें आशावृक्ष फलपुष्पांनीं शोभूं लागतो. माझ्या मतें निराशेला येथें बिलकुल स्थळ नाहीं. माझ्या उमेदी अगदीं निराळ्या आहेत. जयश्री आपल्या कार्यापासून फार दूर नाहीं आमच्या प्रयत्नांचें साफल्य निःसंशय ती करील असा माझा पक्का भरंवसा आहे. आमच्या तरुण पिढीमध्यें जी वीरश्री दिसून येत आहे ती आपल्या आशा सफळ करणार हें खचित होय. त्या शिवाय आमच्या पक्षाला मि. ह्युम, सर वेडरबर्न, मेसर्स केन, डिग्बी काटन सारखे थोर गृहस्थ मिळाले आहेत. आमचे अग्रणी मि. दादाभाई, बानर्जी रमेशचंद्रदत्त प्रभृति राष्ट्रीय संत मंडळी आहे. या गोष्टीला जोड ब्रिटिश सरकारची उदार राजनीति, धुरंधरपणा, व उत्कृष्ट मुत्सद्दीपणा यांची आहे. तस्मात्‌च शेवटीं जय होणार आहे व नैतिक उत्क्रांती होतच आहे तेव्हां तो भवी सोन्याचा दिवस केव्हां तरी उगवणार आहे हें खचितच खचित होय. इंडियन राष्ट्राला तो मुळसमृद्धीचा उदयकाल लवकर येवो आणि ब्रिटिश कीर्तिध्वज निरंतर फडकत राहो !

---

## नोटीस.

गोविंदा बल्लद मनाजी खनपटे वस्ती खेरखेड तालुके इंगोली जिल्हे परभनी मोगलाई. यास.

नोटीस देणार गंगु भर्द गोविंदा वस्ती मालसेलु तालुके अकोले इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचे बरोबर माझे लग्न झाले असून ते वेळीं माझे वय ७।८ वर्षाचें होतें. लग्न झाल्यावर तुमचे येथें थोडे दिवस राहून मालसेलूस परत आले उपर तुह्मी मजला नेले नाहीं हल्लीं माझे वय तुमचे येथें राहण्या सारखे झाल्यास ५।६ वर्षें झालीं. माझा बाप तुमचेकडे आला असतां तुह्मी जरूर नाहीं असे बोलला तथापी मी तुमचे नांवावर बसले, आणि मोठा भयंकर दुष्काळ गेला तथापि कर्ज काढून निर्वाह केला. तुह्मी दुसरी बायको केल्यामुळें तुह्मास मझी जरूर नाहीं. असो. जर तुह्मी मज नेत नाहीं तेव्हां माझा नाईलाज झाला करितां नोटीस देण्यांत येते कीं दुष्काळांत मी कर्ज झाले ते द्यावें आणि मजला घेऊन जावें. माझे बापास जरूर नाहीं असें तुह्मी ह्मटले तत्रापि ह्या नोटिशी द्वारे तुह्मास सूचना दिली जाते कीं तुह्मी पंधरा दिवसांत माझें कर्ज देऊन मजला घेऊन जावे असें न कराल तरी मजवरील तुह्मी हक्क पूर्वींच सोडला आहे. आणि या नोटिशीनें जबाब न द्याल तरी तुमचा लग्नाचा हक्क बिलकूल राहिला नसून हीच नोटीस फारकत समजून दुसरा विचार करीन. तत्रापि मी तुमचे नावावर राहिले या दिवसांत केलेलें कर्ज तुह्मांस द्यावे लागेल. हें समजून या नोटिशीचें उत्तर द्यावे. कळावे. ता. २२।१२।१९०२

सही

गंगु भर्द गोविंदा इचे हातची खुद्द निशाणी बांगडी.

## Kadi. हें काय आहे ?

डाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्काळिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणें, ससनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यास एक हजार रुपयांच्या किंमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम ।<br>
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुश्क कदर करती हे ।<br>
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

मोठी डबी.... १ रु.<br>
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडे तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

पत्ता— नंदलाल वर्मा म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

**K. N. ESMAYAL & Co.**

यांची अनेक रोगांवरील जग प्रसिद्ध ३७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहुन कळवा म्हणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता— खोजानुरा इस्मायल आणि कंपनी. जी. बी. वर्धा. सी. पी.

## मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नाव्हेल्स, सं० नाटकें तद्वेवाईक विषयांसह येत्या मार्चात निघेल.

नांवें नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० हं० सह आगाऊ १।.

पत्ता- के. डी. फोटो आर्टिस्ट वर्धा सी. पी.

ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अभ्रा सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ मुळीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांनीं धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ≈६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील प्रमाणावर मिळतील. दर:—

३१ गो० १ रु०; ७१ गो० २ रु० ११५गो० ३ रु० १६१गो० ४ रु०; २७१गो० ६ रु० ५५०गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षे आंग्रजलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.

मु० मुर्डी ता. दापोली जि० रत्नागिरी.

( १००० चे वर दर आठवड्यास पाठविले जाते. )

## १० आणे ते किं० रु० १५ चें फुकट.

कंपनीचें दहा आण्याचें तिकीट विकत घ्या. त्याबरोबर रु० २॥ पाठवून ४ तिकीटांसह हक्काचें सरटीफिकीट मिळवा. ( किंवा एकदम तीन रुपये दोन आणे पाठवा ) तीं चार तिकिटें दुसऱ्यास विकून आपले अडीच रुपये वसूल करून घ्या. विकत घेणारांकडून अगर तुमचे मार्फत प्रत्येक तिकिटासह रु० २॥ प्रमाणें एकंदर रु० १० पाठवून तिकिटांसह ४ सरटीफिकिटें व फुकट चांदीचे पॉकेट वॉच किंवा भिंतीस लावण्याचे ८ दिवसांच वाजणारे मोठ क्लॉक मागवा. अर्थात दहा आण्यांत १६ रु० चें फुकट !!!

जी. बी नाईक आणि कंपनी. ठाकुरद्वार रोड मुंबई.

अति स्वस्त ! **ज्ञानविलास** अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभीं उपयुक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. त्वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही. पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास खणदाळ; पो० गडइंग्लज; इ० कोल्हापूर.

विक्रीसतयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड-आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्यांची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड - ( सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा अक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें ) किंमत ५ रुपये व टपालखर्च ≈१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट ( सन १८८२ चा १० वा ) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ≈१० आणे.

जुनें व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८≈४.

दिवाणी आक्टसंग्रह- ( यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चा सुद्धां २≈८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी, सदाशिवपेठ, पूना सिटी.

नारो अपाजी गोडबोले बुकसेलर बुधवार पेठ.

## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटंट वॉचेस


### नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका !!!

रेलवेच्या व इतर अवजड कामास हें घड्याळ अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याकरितां ज्यास आपली वेळ

बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची

**रास्कोपच्या पटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरुरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवुन तें वेळबरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

**सूचनाः**—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ...........२५०

**मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह...........२०
१९ ,, मध्यभागी सेंकंद कांटा असलेलें ...............२२
१९ ,, हाफ़ हंटिंगचें..............२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच .................२०

**इनगन्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ऑपनफेस............२०
१९ ,, हंटिंग........................२०
१४ ,, रिस्टवॉच...................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस ..........३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागीं सेंकंद कांटा असलेलें ..................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ......................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**

ओरिजनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई.

## नोटीस

बेशमी 'प्रतापचंद आशाराम ' दुकानचे मालक गोपीलाल व राधाकिसन उभयता अज्ञान पालन करणार गेनचंद फत्तेसिंग व 'मोजीराम चुनीलाल ' मालक चुनीलाल दुकान बाळूगांव ता. आकोट, पोस्ट तेल्हारा यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, तळेगांव प्रगणें पातुर्डा येथील सर्व्हे नंबर ३६ पैकीं हें शेत सुमारें ६ वर्षे होत आलीं मला ८०० रुपयांत खरेदी देण्याचें ठरलें व त्या प्रमाणें शेत माझे ताब्यांतहि आहे. ८०० रु. चार सालबंद्यांनीं ह्मणजे दर वर्षी २०० रुपये प्रमाणें मीं देऊन टाकले. त्यास आज दोन वर्षे होत आलीं. परंतु ह्या शेताचें खरेदीखत करून नोंदवून देण्याचें काम अद्यापपर्यंत झालें नाहीं. प्रतापचंद, आशाराम आणि मोतीराम हे उद्यां खरेदीखत करून देतो ह्मणतां ह्मणतां मयत होऊन गेले. नंतर तुह्मी त्यांचे वारसदार या नात्यानें तें खरेदीखत करून देतों असेंच ह्मणतां पण तें काम उरकून टाकण्याचें तुमच्या मनांत दिसत नाहीं. ह्मणून कळवितो कीं ही नोटीस पोचल्यापासून आठ दिवसांत खरेदीखत करून नोंदून द्यावें. असें न झाल्यास कोर्टांत फिर्याद करून नोंदवून घेतलें जाईल व या कामास जो खर्चवेच लागेल तो सर्व तुह्मांवर पडेल. ह्मणून अगाऊ या नोटिशीनें कळविलें आहे. कळावें तारीख २३ माहे दिसेंबर सन १९०२ इ०

सहीची निशाणी
गणपती वल्लद केशवजी शजुले वस्ती
तळेगांव ता० आकोट,
पोस्ट तेल्हारा याचे हातची
रेघ.

---

## नोटीस

नोटीस बेशमी सोनाई मर्द भवानजी भोयर राहणार सेलगांव तालुके मंगरूळपीर जिल्हे वाशीम यासः—

नोटीस देणार रेवजी वल्लद रामजी भोयर राहणार मौजे सेलगांव तलुके मंगरूळ पीर जिल्हे वाशीम नोटीस देण्यांत येतें कीं तुझा नवरा भवानजी हा साक्षात माझे बापाचा सख्खा भाऊ होता तो हल्लीं मरण पावला आहे तरी तू आपची चुलती आहेस तुला मुलगा नसून तूं एकटी आहेस व वडिलोपार्जित शेत

| सर्व्हे नंबर | एकर | आकार रुपये |
|---|---|---|
| ३९ | १२८३५ | १२ |
| ४४ | १८१० | ८ |
| | २८३९ | |

चे शेत खाते माझे नांवानें असून वहीतीस ⅓ हिस्सा माझा चुलता भवानजी वाहत होता तो हल्लीं मरण पावला आहे तरी आपली मर्जी असल्यास मागील वहीवाटी प्रमाणें वहीत करून निर्वाह करावा अगर तशी मर्जी नसल्यास जनरीती प्रमाणें अन्न वस्त्र मी देण्यास कबूल आहों मात्र माझ्या चुलत्याची जिनगी ह्मणजे जंगम माल व स्थावर माल विकण्यास किंवा कोणास बक्षीस करण्यास किंवा वरील जिनगीची अफरातफर करण्यास तुह्मास मुळींच अधिकार नाहीं कारण मालक मी आहें. व खरीदी वगैरे करून देण्यास तुह्मास अधिकार नाहीं इतकेंवर कोणी खरिदी घेतल्यास त्याचा पैसा वापस मिळणार नाहीं व शेतही कायद्या प्रमाणें मिळणार नाहीं ह्मणून नोटीस करणें भाग पडले आहे कळावें. तारीख २२·१२·०२ इ०

सही
रेवजी वल्लद रामजी राहणार
भोयार सेलगांव निशाणी खुद्द.

---

## नोटीस

बेशमी गणू वल्लद बाबू कापसे कुणबी राहणार टाकरखेड ता, मलकापूर. पोस्ट बोराखडी यांस :—

मी खालीं सही करणार या लेखानें कळविते कीं, मी तुमची लग्नाची स्त्री आहे, तुह्मी मला ७–८ वर्षपासून वागवीत नाहीं. मी माझ्या भाईच्या घरीं राहत आहे व कांहीं मोलमजुरी करून व कांहीं कर्ज काढून कसेंतरी पोट भरतें. गेल्या काळांत तर मला कर्ज जास्त झाले व आतां तर मला कोणी कर्जहि देत नाहीं. तुह्मी मला घरीं घेऊन जाऊन मजशीं संसार करीत नाहीं, यामुळें माझे फार हाल होतात. या पूर्वीं मी ही हकीकत हस्तलिखीत नोटिशीनें कळविली होती पण त्यास तुह्मी जुमानलें नाहीं. असो आतां मला झालेलें कर्ज अदनास रु. २०० देऊन मला घेऊन जावें. असें करण्यास आठ दिवसांची अवधी मी देते. या वेळांत असें तुमच्याकडून होत नसल्यास फारकती द्यावी. तुह्मी फारकत न दिल्यास हीच नोटीस फारकत समजून मी दुसरी माझी योग्य ती सोय पाहीन. मग मजवर तुमचा नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं. शिवाय वरील कर्जाबद्दल कोर्टांत दावा करून सर्व खर्चासह रकम भरून घेतली जाईल. ह्मणून अगाऊ ह्या जाहीर नोटिशीनें सुचवीत आहे. कळावें ता. २२ दिसेंबर सन १९०२ इ.

सहीची निशाणी
तुळसाई मर्द गणू राहणार
माटरगांव हिचे हातची बांगडी.

---

## नोटीस

बेशमी रामजी कानू पाटील राहणार खडतगांव प्रगणें पिंपळगांव राजा ता. मलकापूर, पोस्ट नांदुरा यास :—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितों कीं, मी तुमचे खडतगांव येथील एक शेत बिजाप्त्यानें घेतलें होतें पण त्याच सालीं दुष्काळ पडला होता त्यामुळें मला थोडबहुत तुमच्याशीं पैशाची देवघेव करणें भाग पडलें. तुमच्या पैशाच्या फेडी साठीं मी २॥ वर्षे तुमची नोकरीहि केली. व मध्यंतरी थोडा फार वसूलहि दिला तरी सुद्धां तुह्मी माझ्या नांवावर बरीचशी रक्कम काढतां हें पाहून मला अचंबा वाटतो. मला तुमचे कांहीं एक देणें राहिलें नाहीं. असें असतां तुह्मी लबाडीनें मजवर खोटी फिर्याद वगैरे कराल व मला गरिबाला बिनाकारण पेंचांत पाडाल तर मी बिलकुल जबाबदार नाहीं. पण या कामीं माझें जें नुकसान होईल तें तुमचे कडून मात्र भरून घेतलें जाईल. ह्मणून अगाऊ नोटिशीनें कळविलें आहे. कळावें ता. २३।१२।०२ ई.

सहीची निशाणी
सखाराम कृष्णाजी सोनार राहणार
वाडी प्रगणें वडनेर भोलजी
ता. मलकापूर पोस्ट नांदुरा
याचे हातची रेघ ——

---

पं. नादारी मुकदमा नंबर $\frac{६}{१९०२}$

नादारी नियमा अन्वयें नादाराला नादार ठरविणें विषयीं त्याचे सावकारास नोटिशीचा नमुना जी.

विद्यमान सिव्हील कोर्ट वासीम यांचे कोर्टांत.

सर्वत्रास नोटीस देण्यांत येते कीं विठोबा वल्लद जिवनाजी राहणार घाट हा नादार आहे असा आज तारीख ११ माहे दिसेंबर सन १९०२ इसवी रोजीं ठराव झाला आहे आणि तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १९०३ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराला तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्यांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या अधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीदारांस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारिखेच्या दोन तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यांस नादाराचे [illegible] नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकिकत लिहून द्यावी. व ते दावे खरें असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एकाद्या जुडिशियल ऑफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ करावी, आणि ती यादी टपालामार्फत कोर्टास पाठवावी. ह्मणजे दावा रजिष्टरांत दाखल होईल. कळावे ता. १९।१२।०२

S. H. King
सिव्हिल जज्ज
वाशीम.

---

☞ हे पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.